**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५०३

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

१ श्री. मनोज सुवालालजी गुंदेचा, : अपिलार्थी
कोना पार्लर, शहाजी रोड, घासगल्ली,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण, सदोष, विचारलेल्या मूळ प्रश्नाला छेद देणारी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने व त्यांना खरी माहिती उपलब्ध झाली नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर व तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथील पोलीस निरीक्षक यांच्यावर दंडात्मक कारवाईचे आदेश व्हावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००० ते १०-०३-२००८ पर्यंत त्यांच्या कार्यक्षेत्रातील तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये भा. द. वि. कलम ३५३ नुसार दाखल झालेल्या गुन्ह्यामध्ये किती जणांवर चॅप्टर केसेस दाखल केल्या त्यांची नावे व कारणे आणि किती जणांवर दाखल केल्या नाहीत याच्या संपूर्ण यादीची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

यानंतर अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त होण्याचा विहित कालावधी व्यपगत होण्याआधीच अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०५-२००८, १७-०३-२००९, ०४-०४-२००९ व २८-०४-२००९ या चार दिवशी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी ठेवली होती, तथापि या चारही सुनावण्यामध्ये अपिलार्थी हे गैरहजर राहिले त्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांनी दिनांक १५-०५-२००९ रोजी निकाली काढले. तथापि अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी उपस्थित न राहता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०२-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली असल्याने त्यांचे अपील जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०५-२००९ रोजी निकाली काढले. अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीची त्यांच्याकडील असलेली पोच पावती देखील त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर विनामूल्य मिळाली असल्याचे दिसून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करतांना त्या अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती सत्य नाही, सदोष आहे व ती दिशाभूल करणारी आहे असे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांनी निर्देशित केलेले हे दोष कशाच्या आधारे निर्देशित केले आहेत हे आयोगास स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच त्यांच्या अभिप्रायाप्रीत्यर्थ त्यांनी कोणताही लेखी सबळ पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने व्दितीय अपील आयोगाकडे केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सिध्द केल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील, आवश्यक त्या पुराव्याअभावी, फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोज सुवालालजी गुंदेचा, कोना पार्लर, शहाजी रोड, घासगल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५०४

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

१ श्री. शेख सईद मोहम्मद इब्राहीम, : अपिलार्थी
घर. नं. ५१८२ - अ, महानगरपालिका ऑफिस रोड,
पांचपीर चावडी, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा डी. एस. पी. , डी. एस. पी. कार्यालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा डी. एस. पी. , डी. एस. पी. कार्यालय, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०३-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत माहिती न दिल्याने अपिलार्थीने आयोगाकडे अपील केल्याचे या अर्जामध्ये म्हटले आहे व पुढे असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-११-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय झालेला नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण, दिशाभूल करणारी व जाणुनबुजून चुकीची माहिती देण्याचा प्रयत्न

झाला.  तथापि एवढे असूनही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही.  या प्रकरणी त्यांनी तोफखाना पोलीस स्टेशनकडे दिनांक १०-०९-२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही त्यांना अद्यापपावेतो कळू शकली नाही.  या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची एक प्रमाणित प्रत त्यांना देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची विनंती अपिलार्थीने आयोगास या अर्जाच्या अखेरीस केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे पोलीस उप अधीक्षकाकडे त्यांनी तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १०-०९-२००७ रोजी मुख्याध्यापिका व व्यवस्थापन प्रमुख ऑक्झिलीयम कॉन्व्हेंट स्कूल, सावेडी यांच्याविरुध्द केलेल्या तक्रार अर्जावर संबंधित पोलीस स्टेशनने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.  अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पोलीस उप अधीक्षकाकडे उपलब्ध नव्हती, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा दिनांक २४-१०-२००७ रोजीचा अर्ज दिनांक ३१-१०-२००७ रोंजी संबंधित पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकाकडे पाठविला.  अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित पोलीस स्टेशनने तदनंतर परस्पर अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे कळविली.  या पत्रामध्ये पोलीस निरीक्षक, तोफखाना पोलीस स्टेशन यांनी अपिलार्थीस असे कळविले की, त्यांच्या अर्जावर तोफखाना पोलीस स्टेशनकडून चौकशी चालू आहे व चौकशी पूर्ण होताच अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविण्यात येईल.  तथापि आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-११-२००७ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही अथवा यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार अपिलार्थीशी केला नाही.  अशा प्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून

प्राप्त झालेल्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांच्या लेखी म्हणण्याप्रमाणे युक्तिवाद केला. त्यांना आजही या माहितीची आवश्यकता असल्याचे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे ऑक्झिलीयम कॉन्व्हेंट स्कूल, सावेडी, अहमदनगर येथे शिक्षक या पदावर कार्यरत होते. संस्थेने त्यांना प्रशासकीय कारणास्तव सेवेतून कमी केले होते. अपिलार्थीस सेवेमध्ये परत सामावून घेण्याकरिता हा अर्ज संबंधित पोलीस स्टेशनकडे केला होता व ही बाब पोलीसांच्या अखत्यारितील नसल्याचे चौकशीअंती निष्पन्न झाल्याने, त्यांनी अपिलार्थीचा दिनांक १०-०९-२००७ रोजीचा तक्रार अर्ज दप्तरी दाखल केला, मात्र अपिलार्थीस त्यांनी तसे कळविले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती पूर्णत: प्रशासकीय स्वरुपाची आहे. अपिलार्थीस त्यांना सेवेत परत सामावून घेण्यासाठीचे त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी शाळा न्यायाधिकरण हे वेगळे सक्षम प्राधिकरण अस्तित्वात आहे, कारण अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या प्रशासकीय बाबींशी संबंधीत तक्रारी अर्जावर पोलीस स्टेशन कोणतीही कारवाई करु शकत नाही. त्यांच्या कार्यालयीन कार्यपध्दतीनुसार त्यांनी अपिलार्थीच्या मूळ तक्रार अर्जावरील चौकशी केली असता वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे परिस्थिती स्पष्ट झाली आहे. यासंदर्भात तोफखाना पोलीस स्टेशन निरीक्षकाकडून जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविलेला अहवाल आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविला आहे. वास्तविक पाहता जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस त्यांच्या तक्रार अर्जावरील ते करत असलेले चौकशीची स्थिती अपिलार्थीस अवगत करण्याचे त्यांनी आश्वासीत केले होते, मात्र ते त्यांनी पाळल्याचे दिसून येत नाही, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या प्रथम अर्जामध्ये संदर्भित केलेल्या त्यांच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांना संबंधित पोलीस स्टेशनकडून दिनांक ३१-०३-२००८ रोजी प्राप्त झालेल्या प्रथम अहवालाची प्रत त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत अपिलार्थीस व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीच्या या अपील प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील काही उणीवा दिसून आल्या आहेत. या प्रकरणामध्ये असे दिसून आले आहे की, अपिलार्थीचा दिनांक २४-१०-२००७ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज पोलीस अधीक्षक कार्यालयाने संबंधित पोलीस स्टेशनकडे पाच दिवसाच्या आत पाठविणे हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे आवश्यक होते, मात्र हा अर्ज पोलीस उप अधीक्षक, अहमदनगर यांनी माहिती अधिका-याकडे २ दिवसाच्या विलंबाने पाठविला आहे. अपिलार्थीने दिनांक २७-११-२००७ रोजी प्रथम अपील केले असता या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) मधील तरतुदीप्रमाणे कोणतीही कार्यवाही न करता आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, इतःपर त्यांनी त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे माहितीसाठीच्या प्राप्त अपील अर्जांवर अधिनियमातील कलम १९ (६) व्दारे विहित केलेल्या मुदतीत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस प्रकरणाची पुढील स्थिती कळविण्यासाठी दिलेले आश्वासन या प्रकरणी त्यांनी न पाळून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून त्यांना वंचित ठेवल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

प्रसंगावशात् माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने ज्या जन माहिती अधिका-याकडे माहितीची मागणी केली आहे त्यांच्याच सहीने अर्जदारास माहिती देणे अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी संबंधित पोलीस स्टेशनला अर्जदाराला परस्पर माहिती देण्याचे सूचित केल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर आहे. इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या सहीने व पदाचा उल्लेख करुन ही माहिती संबधितांना पुरविण्यात यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख सईद मोहम्मद इब्राहीम, घर. नं. ५१८२ - अ, महानगरपालिका ऑफिस रोड, पांचपीर चावडी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५०५

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. चंद्रकांत उध्दवराव कुक्कडवाल,<br>सिताराम सारडा विद्यालयाजवळ, तोफखाना,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी श्री. सतीश उध्दवराव कुक्कडवाल यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावर काय कारवाई झाली याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांना मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी चौकशी केली नाही व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - श्री. सतीश उध्दवराव कुक्कडवाल यांनी केलेल्या तक्रार अर्जाची छायांकीत साक्षांकीत प्रत, त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कारवाई व संबधितांवर कोणते गुन्हे दाखल केले आहेत याची कायदेशीर माहिती - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात त्यांना हवी ती माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनीही विहित कालावधीमध्ये निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उशिराने व अपूर्ण माहिती प्राप्त झाली. यावर अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली असता अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा गेले यासंदर्भात अपिलार्थीस आवश्यक तो पुरावा अपिलार्थीकडे उपलब्ध आहे काय असे आयोगाने विचारले असता अपिलार्थीने त्यांचा नकारात्मक प्रतिसाद दिला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १५-०८-२००८ रोजी प्रथमतः माहिती दिली. तदनंतर दिनांक ०७-०३-२००९ व दिनांक २०-०४-२००९ रोजी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादास अपिलार्थीने सहमती दर्शविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदाराने व्यक्तिशः माहिती अपेक्षिल्यानंतर अर्जदारास आवश्यक ती माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही, ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी, ते व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला नाही, तसेच त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १५-०८-२००८, दिनांक ०७-०३-२००९ व २०-०४-२००९ रोजी विनामूल्य पुरवली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ३ व्दारे संबंधितांवर कोणता गुन्हा दाखल केला त्याचा एफआयआर ही माहिती मागितली होती, मात्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा खुलासा केला की, त्यांच्या कार्यालयाने केलेल्या चौकशीअंती अर्जदाराच्या तक्रार अर्जावर दिवाणी स्वरुपाची कार्यवाही होणे अपेक्षित आहे व त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात दिलेल्या अहवाल प्रतीमध्ये तसा उल्लेखही केला आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ३ ची माहिती वेगळ्याने पुरविली नाही. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादात त्यांना मुद्दा क्रमांक ३ ची माहिती न मिळाल्याने त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे असे आयोगास अवगत केले आहे. तेव्हा यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधितांवर कोणता गुन्हा दाखल केला आहे त्याचा एफआयआर क्रमांक ही संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या दिनांक २५-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०४-२००९ रोजी निर्णय घेऊन अपील

सुनावणीपूर्वीच माहिती पुरविली असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय जरी बरोबर असला तरी तो माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये घेतला नाही ही बाब प्रामुख्याने आयोगाच्या निदर्शनास येत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत उध्दवराव कुक्कडवाल, सिताराम सारडा विद्यालयाजवळ, तोफखाना, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५०६

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भागिनाथ गोरक्षनाथ शिरसाठ,<br>मु. वरखेड पो. हसनापूर, तालुका शेवगांव,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,<br>पुणे - ०१ | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>अपंग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड,<br>पुणे - ०१ | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही. तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही आदेश पारित केलेला नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी सुनावणीसाठी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना

आयोगाच्या औरंगाबाद येथील कार्यालयाने दिनांक २९-०५-२००९ रोजी त्यांच्या कार्यालयातील श्री. गवंडे, स्वीय सहायक यांच्यामार्फत संदेश देऊनही समाजकल्याण विभागाचे कोणीही अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे समाजकल्याण संचालनालयाचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, संचालनालयामार्फत सेवाभावी संस्थेअंतर्गत अपंगाच्या विकासासाठी कोणकोणत्या प्रशिक्षण योजना राबवत आहात, प्रशिक्षण घेणा-या संस्थेचे नांव व पत्ता, प्रशिक्षण ठिकाण, लाभार्थ्यांची नावे, प्रशिक्षणासाठी संस्थेला दिलेले अनुदान, संस्थेने प्रशिक्षणासाठी मान्यता व अनुदानासाठी सादर केलेल्या प्रस्तावांची झेरॉक्स सत्यप्रत, या संदर्भात काही माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपंग आयुक्तालय, पुणे येथे दिनांक ०१-११-२००८ रोजी प्रथम अपील केले, मात्र या अपील अर्जावर देखील संबंधितांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही हजर नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाच्या व प्रथम अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवरुन त्यांनी मूळात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे हे अर्ज व अपील अर्ज पाठविले होते किंवा कसे याचा खुलासा आयोगास होत नाही. यासंदर्भात अपिलार्थीने संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या रजिस्टर्ड पोस्टाची किंवा अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविलेल्या पावतीच्या प्रती देखील पुरावा म्हणून जोडल्या

नाहीत. यावरुन अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती किंवा कसे हे आयोगास कळण्यास कोणताही मार्ग नाही. आज रोजीच्या सुनावणीसाठी अपिलार्थी हे आयोगासमोर सदर बाब स्पष्ट करण्यासाठी उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भागिनाथ गोरक्षनाथ शिरसाठ, मु. वरखेड पो. हसनापूर, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, अपंग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५०७

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विष्णू रामभाऊ शिंदे,<br>रा. खडकवाडी, तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, श्री मलवीर विद्यामंदिर, पळशी,<br>तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना श्री मलवीर विद्यामंदिर, पळशी या शाळेच्या मुख्याध्यापकाविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्याची आणि संबंधित मुख्याध्यापकावर अधिनियमातील कलमाप्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. धनराज रामभाऊ शिंदे यांच्या संदर्भात त्यांच्या सेवा अभिलेख्याविषयी व संस्थेसंदर्भात एकूण आठ मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्या दिनांक १५-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे आगाऊ शुल्क रुपये १०,००० इतके विद्यालयाच्या खात्यामध्ये डिमांड ड्राफ्टव्दारे अथवा मनीऑर्डरव्दारे भरण्याचे त्यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे या प्रकरणी आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्या स्तरावर नाही ती माहिती संस्थेकडून घेण्याबाबत अपिलार्थीस सूचना देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या सूचनेनुसार मुख्याध्यापकाने अपिलार्थीस दिनांक ०२-०८-२००८ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली, अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना पुरविली. उर्वरित चारही मुद्दयावरील माहिती संस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीस संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहिती मागविल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस

माहितीपोटीचे शुल्क रुपये १०,००० इतके भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा न केल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत, मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ ते ८ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. ही माहिती त्यांच्या शाळेची संस्था श्री हरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ यांच्याकडे उपलब्ध आहे. संबंधित संस्था प्रशासनाकडे वेळोवेळी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची तोंडी विचारणा केली असता संस्थेच्या कार्यालयाने त्यांना ही माहिती कोणत्याही आदेशाशिवाय देण्याचे नाकारले आहे, त्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे एकूण आठ मुद्दयावर माहिती मागविली होती. त्यापैकी त्यांच्या मुद्दा क्रमांक १ ते ४ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती. ती त्यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार विनामूल्य दिली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ ते ८ शी संबंधित माहिती जर त्यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत त्यांच्या शाळेच्या संस्थेकडे पाठवून त्या पत्राची एक प्रत अपिलार्थीस अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे देणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही या प्रकरणी केली नाही व संस्थेकडून अपिलार्थीस माहिती घेण्याकरिता ते स्वतः प्रयत्नशील राहिले. परंतु दुर्दैवाने त्यांच्या प्रयत्नांना संबंधित संस्थेने योग्य प्रतिसाद दिला नाही, परिणामी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहावे लागले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस मागणी केलेली उर्वरित माहिती देखील आता विनामूल्य द्यावी लागेल. सबब

जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा कमांक ५ ते ८ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांच्या शाळेच्या संस्थेकडून स्वतः प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात या कालावधीमध्ये पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः हस्तगत करावी. अपिलार्थीने ज्या शाळेकडे माहितीची मागणी केली आहे त्या शाळेस शासनाचे नियमितपणे अनुदान प्राप्त होत असल्याने ही शाळा अधिनियमातील कलम २ (ज) (घ) (दोन) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण होत आहे त्यामुळे त्यांना ती द्यावी लागेल.

प्रसंगावशात् आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश सर्व शिक्षण संस्थांनी त्यांच्या शाळेतील मुख्याध्यापकास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे, मात्र या मुख्याध्यापकाकडे सदर शिक्षण संस्था त्यांच्या कार्यालयाशी प्रत्यक्ष संबंधित कोणतेही अभिलेखे हस्तांतरीत करत नाहीत किंवा आवश्यकतेनुसार त्यांना उपलब्ध करुन देत नाहीत त्यामुळे प्रत्येक वेळी संस्थेविषयी माहिती मागितली असता बहुतांश प्रकरणी मुख्याध्यापक हे अर्जदारास संस्थेविषयी माहिती देऊ शकत नाहीत. माहिती अधिकार अधिनियम हा सार्वजनिक प्राधिकरणाच्या कारभारामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी निर्माण केलेला कायदा आहे, मात्र बहुतांश शिक्षण संस्था या मूळात, त्यांनी ज्यांना माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे त्यांच्याकडे संस्थेविषयीची कोणतीही माहिती न ठेवता जनसामान्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देत नाहीत अथवा ती उघड करण्याचे टाळण्यासाठी अशा प्रकारचे मार्ग शोधतात. माहिती अधिकार अधिनियमाच्या निकोप वाढीस संस्थाचालक त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीव्दारे खीळ घालत आहेत, असे आयोगाचे मत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, त्यांचे शिक्षण संस्थेवर सरळ नियंत्रण नसून या

संस्थेवर धर्मादाय आयुक्तांचे नियंत्रण असते. शाळासंहितेमध्ये देखील संस्थेवर कारवाई करण्याचे अधिकार त्यांना नाहीत. संबंधित शिक्षण संस्थांच्या अशा प्रकारचे वाढीस लागलेले वर्तन व माहिती अधिकार अधिनियमाची निकोप वाढ हे दोन मुद्दे दृष्टीपथामध्ये ठेऊन सचिव (शालेय शिक्षण) यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार) नुसार असे सूचित करण्यात येत आहे की, जनसामान्यांना शिक्षण संस्थासंदर्भात जास्तीत जास्त माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने व त्याव्दारे या संस्थांच्या कारभारातील पारदर्शकता स्पष्ट होण्यासाठी त्यांनी शासनस्तरावरुन आदर्श माहिती व्यवस्थापनाच्या संदर्भात, या संस्थांनी कोणत्या प्रकारची किमान माहिती मुख्याध्यापकांकडे ठेवणे आवश्यक आहे हे स्पष्ट करणारे परिपत्रक त्वरीत जारी करावे. जेणेकरुन माहिती अधिकार अधिनियमाचा मूळ उद्देश सफल होण्यास मदत होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विष्णू रामभाऊ शिंदे, रा. खडकवाडी, तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री मलवीर विद्यामंदिर, पळशी, तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५०८

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

१ श्री. जोशी प्रसाद पांडुरंग, अपिलार्थी
फ्लॅट नं. ०६, व्यंकटेश अपार्टमेंट,
स्वामी विवेकानंद चौक, गुजरगल्ली, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी
गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,
अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्राचार्य, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : मानद कार्यवाह, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २७-०५-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास

सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना विचाराधीन अपील प्रकरणी आवश्यक असलेली माहिती दिनांक ०४-०५-२००९ रोजी प्राप्त झाली असून यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही. अपिलार्थीस आता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण माहिती प्राप्त झाली असली तरी ही माहिती अपिलार्थीस विलंबाने प्राप्त झाल्याचे व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेतल्याचे या टप्प्यावर सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाची कारणे उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगासमोर स्पष्ट करु शकले नाहीत. सबब संबंधित संस्थेच्या अध्यक्षांना त्यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ५०८/२००८, दिनांक २५-११-२००८ खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर

दिनांक ०१-०६-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जोशी प्रसाद पांडुरंग, फ्लॅट नं. ०६, व्यंकटेश अपार्टमेंट, स्वामी विवेकानंद चौक, गुजरगल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मानद कार्यवाह, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५०९

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुनिल दयाकिसन बजाज,<br>जंगमगल्ली, राहुरी, तालुका राहुरी,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक संचालक, नगर रचना,<br>अहमदनगर | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप संचालक,<br>नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील सुनावणीमध्ये माहिती देण्याचे आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी विचारलेल्या माहितीचा खुलासा अपिलार्थीस केला नाही, माहिती न दिल्याचे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले असतानाही अपिलार्थीचे अपील त्यांनी फेटाळले असल्याने त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कार्यवाही करावी व या प्रकरणी अपिलार्थीस झालेल्या खर्चाची नुकसानभरपाई त्यांना प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - राहुरी नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या सी. स.नं. १ मधील बांधकामाचे ज्योत्यापर्यंत बांधकाम नकाशातील नियमाप्रमाणे झाले आहे असा दाखला दिलेल्या पत्राची प्रमाणित प्रत - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने अपेक्षिलेल्या जोत्यापर्यंतचे बांधकाम सर्टिफिकेट देण्याचे काम त्यांचे नसून नगरपरिषदेच्या कार्यालयाचे असल्याचे त्यांना कळविले. तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०५-२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील या आदेशाव्दारे फेटाळून लावले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थीस तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद आयोगाकडे लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, जोत्यापर्यंतचे बांधकाम नियमाप्रमाणे झाले नाही, ज्योत्यापर्यंतचे बांधकाम नियमाप्रमाणे झालेल्या दाखल्याची प्रत ही नगरपरिषद, राहुरी यांनी सदरच्या नगररचना विभागाकडून घेणे आवश्यक आहे. कारण बांधकाम परवानगीचे पत्र नगरपरिषदेकडून देण्यात येते. या पत्रामध्ये ज्योत्यापर्यंतचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे बरोबर असल्याचे प्रमाणपत्र स्थानिक प्राधिकरणाकडून घेणे आवश्यक राहिल, असे आदेश असतात. या प्रकरणी नगररचना विभाग हेच नगरपरिषदचे स्थानिक प्राधिकरण असतांना जाणीवपूर्वक त्यांना माहिती देण्यासाठी नाकारण्यात येत आहे. जर जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये म्हणतात त्याप्रमाणे त्यांनी जर माहिती व्यक्तिशः स्वीकृत केली नाही तर ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पोस्टाने पाठविणे आवश्यक होते, तथापि त्यांनी ही माहिती पोस्टाने पाठविली नाही, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयातील या अभिप्रायाची सत्यता लक्षात येते.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मूळात अपिलार्थीने नगर रचना विभागाकडे माहिती मागविली. नगर रचना विभाग बांधकाम परवानगी देत नसून नगरपरिषद क्षेत्रातील बांधकामांना स्थानिक नगरपरिषदा एम. आर. टी. पी. ॲक्टनुसार मंजूरी देत असतात. मूळात या प्रकरणी राहुरी नगरपरिषदेच्या बांधकामाला मंजूरी राहुरी नगरपरिषदेने द्यावयाची आहे व इमारतीचे जोत्यापर्यंत केलेले बांधकाम हे नकाशाप्रमाणे आहे किंवा कसे हे तपासण्याची जबाबदारी देखिल राहुरी नगरपरिषदेची आहे. नगर रचना कार्यालयातर्फे काही अपवादात्मक प्रकरणी बांधकामाच्या परवानगीची शिफारस देण्यात येत असते, परंतु अंतीमतः एम. आर. टी. पी. ॲक्ट नुसार बांधकामास मान्यता नगरपरिषदेने द्दयावयाची असते. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे मूळात अस्तित्वातच नाही, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात एका पत्राव्दारे त्यांनी ही वस्तुस्थिती कळविली असून अपिलार्थीस सदर पत्र त्यांनी त्यांच्या कार्यालयातील

जावक क्रमांक ६०५, दिनांक ३१-०३-२००८ अन्वये पोस्टाने पाठविले आहे. अपिलार्थीस ही माहिती प्रथम अपील सुनावणीच्या वेळी देऊ केली असता अपिलार्थीने ती घेण्याचे नाकारले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, राहुरी नगर परिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या ज्योत्यापर्यंतचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असल्याचा दाखला देण्याचे अधिकार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात नसल्याने त्यांनी तसे प्रमाणपत्र देखील दिलेले नाही, त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती मूळात त्यांच्याकडे अस्तित्वात नाही. एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली आहे व यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. या संपूर्ण घटनाक्रमा-मध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही असद्‌हेतूने माहिती नाकारल्याचे दिसून येत नाही. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता अपिलार्थीने ती स्वीकारण्याचे नाकारले असे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केला आहे. तथापि अपिलार्थीस दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या पत्राची पुनश्च प्रत देणे गरजेचे आहे असे आयोगाचे मत आहे. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक ६०५, दिनांक ३१-०३-२००८ ची एक साक्षांकीत प्रत, अपिलार्थीने हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून हस्तगत करावी, यानंतर अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल दयाकिसन बजाज, जंगमगल्ली, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५१०

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अभिजित सी. पुप्पाल,<br>२२५१, आडत बाजार,<br>अहमदनगर | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा संशोधन अधिकारी, कार्यालय सह आयुक्त,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सह आयुक्त,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती पुरविली असून प्राप्त झालेली माहिती अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक २१-०१-१९८८ ते २१-०१-२००८ या

वीस वर्षाच्या कालावधीतील माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व इतर मुद्दासंदर्भातील अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या माहितीच्या प्रतीकरिता अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क २१४ रुपये इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अभिजित सी. पुप्पाल, २२५१, आडत बाजार, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, कार्यालय सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५११

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, अपिलार्थी
मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दखल न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागविली असता, अपिलार्थीस

प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे आढळल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे दिनांक २७-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेऊन निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक व जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती, कोपरगांव हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती सहा ग्रामसेवकांशी संबंधित आहे. या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगाव यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २७-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

अहमदनगर

दिनांक ०१-०६-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, पोहेगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर व संबंधित यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि), पंचायत समिती, कोपरगांव, जिल्हा अहमदनगर व संबंधित यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५१२

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

१ श्री. अशोक दादा देवखिळे, अपिलार्थी
मु. पो. वडाळी, तालुका श्रीगोंदा,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, बेलवंडी, तालुका श्रीगोंदा,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, कर्जत विभाग, तालुका
कर्जत, जिल्हा अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली असता त्यांनी ती दिली नाही म्हणून त्यांनी दिनांक १७-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनीही माहिती दिली नाही व त्यांच्या अपिलावर कोणतीही चौकशी केली नाही त्यामुळे

त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे असेही म्हटले आहे की, कोटेशन नसतांना वीज वापरणा-या लोकांना स्थानिक वीज मंडळाचे लोक मदत करतात व विद्युत कंपनीच्या अनेक कर्मचा-यांवर अपिलार्थीने अशा प्रकारचे विविध आरोप या अपिलामध्ये केलेले आहेत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास एका शपथपत्राव्दारे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास अवगत केले आहे. मूळात अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यासंदर्भात किंवा अपिलार्थीने माहितीसाठीचा व प्रथम अपील अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे सादर केल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे त्यांनी सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबतच्या कागदपत्रामध्ये समाविष्ट नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्याकरिता अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक दादा देवखिळे, मु. पो. वडाळी, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बेलवंडी, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कर्जत विभाग, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५१३

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

१ श्री. कुमार भाऊसाहेब पा. डावखर, अपिलार्थी
तहसील कचेरीसमोर, राहुरी, तालुका राहुरी,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, राहुरी, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी,
जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-१०-२००८ रोजी लिहिलेल्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांना अद्यापपावेतो माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व तत्कालीन आणि सध्याचे अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक १५-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे विनामूल्य पाठविल्याचे आयोगास अवगत केले व ही १४९ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस दिनांक १८-१२-२००८ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोच पावती आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००८ रोजी व्दितीय अपील अर्ज नोंदविल्यानंतर प्राप्त झाली आहे असे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीसाठी त्यांना प्राप्त माहितीच्या दर्जाविषयी अभिप्राय व्यक्त करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, अथवा यासंदर्भात त्यांनी आयोगास कोणत्याही पत्राव्दारे काहीही अवगत केलेले नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १८-१२-२००८ रोजी प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले असावे, असे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कुमार भाऊसाहेब पा. डावखर, तहसील कचेरीसमोर, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५१४

निर्णय दिनांक ०१-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. तनपुरे अशोक एकनाथ,<br>मु. पो. नवयुग कॉलनी, स्टेशन रोड, राहुरी,<br>तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, पुरवठा विभाग, राहुरी,<br>तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी,<br>तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे राहुरी तालुक्यातील सर्व किरकोळ रॉकेल विक्रेत्यांना एप्रिल २००८ ते मे २००८ या कालावधीत केलेल्या रॉकेल वितरणाबाबत एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये विक्रेत्यांना दिलेला रॉकेल कोटा, रॉकेल विक्रीच्या कॅशमेमोच्या छायांकीत प्रती, रॉकेल विक्रेत्यांच्या या कालावधीतील स्टॉक रजिस्टरच्या छायांकीत प्रती व रॉकेल विक्रेत्यांना रॉकेल टॅंकर व्दारे उतरवित असतांना पंचासमक्ष उतरविलेल्या पंचनाम्याच्या जानेवारी २००८ ते मे २००८ या कालावधीतील छायांकीत प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती पुरविली व अपिलार्थीस असे अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ४ बाबतची माहिती संबंधित रॉकेल दुकानदारांकडून प्राप्त करुन घेण्यात येत असून ती प्राप्त होताच त्यांना पुरविण्यात येईल. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-१०-२००८ रोजी आपला निर्णय पारित करुन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २, ३ व ४ शी संबंधित माहिती मोफत पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, तत्कालीन व सध्याचे जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण चार मुद्दयांशी संबंधित माहिती मागितली होती. त्यापैकी मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती ही प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित आहे, ती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०७-२००८ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली असून उर्वरित मुद्दा क्रमांक २, ३ व ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात नसून ही माहिती संबंधित किरकोळ व अर्धघाऊक विक्रेते यांच्याकडे उपलब्ध असते. त्याप्रमाणे या प्रकरणाशी संबंधित एकूण १०१ दुकानदारांपैकी ७३ दकानदारांची माहिती त्यांनी अपिलार्थीस अनुकमे दिनांक ०६-०२-२००९ व २४-०५-२००९ रोजी पुरविली असून उर्वरित २८ दुकानदारांची माहिती ते अपिलार्थीस एका महिन्याच्या आत विनामूल्य पुरविण्याच्या तयारीत आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही पूर्णतः त्यांच्या ताब्यात असलेली माहिती नव्हती. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना संबंधित दुकानदारावर अवलंबून राहावे लागणार आहे. रॉकेल पुरवठा करणारे संबंधित दुकानदार हे सार्वजनिक प्राधिकरणाचे केवळ एक परवानाधारक असतात. त्यामुळे त्यांना सार्वजनिक प्राधिकरण असे संबोधता येणार नाही व त्यांना माहिती अधिकार अधिनियम लागू करता येणार नाही. एवढे असूनही या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १०१ दुकानदारापैकी ७३ दुकानदारांसंदर्भात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविली आहे व उर्वरित माहिती देण्याबाबत ते प्रयत्नशील आहेत. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून कोणतीही माहिती कोणत्याही असद्हेतूने दडविलेली नाही. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती

देण्यासाठी वेळोवेळी सकारात्मक प्रयत्न करुन अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०६-०२-२००९ रोजी ५११९ पृष्ठांची व तदनंतर दिनांक २४-०५-२००९ रोजी ९०९ पृष्ठांची माहिती विनामूल्य दिली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोच पावती त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. मूळात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली असल्याने व उर्वरित माहिती त्यांच्या प्राधिकरणाचा भाग नसलेल्या त्रयस्थ पक्षाकडे आहे हे पाहता, अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर

दिनांक ०१-०६-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. तनपुरे अशोक एकनाथ, मु. पो. नवयुग कॉलनी, स्टेशन रोड, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७८
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

१ श्री. शरद कुलकर्णी, : अपिलार्थी
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप कार्यकारी अभियंता,
निम्न दुधना प्रकल्प सेलू,
जि.परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
जायकवाडी प्रकल्प मंडळ,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता,
निम्न दुधना प्रकल्प विभाग सेलू,
जि.परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेळेत माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी पुढे असे नमूद केले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी केंद्रीय माहिती अधिकार अधिनियमाच्या कालमर्यादेत माहितीही दिली नाही व प्रतिसादात्मक पत्रव्यवहारही केला नाही व आपल्या कर्तव्यात कसूर व बेजबाबदार वर्तन केले असल्याचे या प्रकरणी सिध्द होत असल्याने संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर

अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) नुसार कायदेशीर कारवाई करावी व अधिनियमातील कलम ७(६) नुसार त्यांनी विचारलेली माहिती प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील एआयबीपी योजनेअंतर्गत घेतल्या गेलेल्या कामाची, माहे एप्रिल, २००४ ते नोव्हेंबर,२००७ या कालावधीशी संबंधित, एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - एआयबीपीची चालू झालेली कामे, कामाची प्रशासकीय,तांत्रिक व अंदाजपत्रकीय मान्यता, कामाच्या खर्चापोटी दाखल केलेले डिमांड लेटर/डिमांड फॉर्म चा तपशील, कामासाठी प्राप्त निधी व खर्चाचा तपशील आणि अंदाजपत्रकीय मान्यता व प्राप्त निधीसह झालेला खर्च यातील वाढीव डबल तफावत यांची सबळ व सक्षम कारणे - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता, त्यांच्याकडील दि. ३०.०१.२००८ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.०२.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस काही माहिती व दि. ०७.०६.२००८ रोजी उर्वरित माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली. तथापि दि. १४.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०२.२००८ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १४.०२.२००८ व ०७.०६.२००८ अशा दोन वेगवेगळया पत्राद्वारे दोन टप्प्यात माहिती प्राप्त झाली असून, त्यांना प्राप्त झालेली माहिती ही अत्यंत अस्पष्ट आहे व ती माहिती त्यांना वाचता येत नाही. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमाचा नेहमीच अनादर करीत असल्याची उदाहरणे आयोगासमोर दाखवून या संबंधी संबंधित जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी शास्ती लावण्याची, आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस दि. १४.०२.२००८ व ०७.०६.२००८ रोजीच्या पत्रान्वये विनामूल्य माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती पुरविताना लागलेल्या विलंबाची कारणे त्यांना सांगता येणार नाहीत, कारण ते या पदावर त्यावेळी कार्यरत नव्हते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती मागविली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.५ मधील -"-----वर झालेला खर्च यातील तफावतीची सबळ व सक्षम कारणे" या भागावर मागविलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, कारण अपिलार्थीने या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींशी पूर्णतया विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाबद्दल अथवा त्यांच्या कृतीबद्दल त्यांच्याकडून कारणे मागणे किंवा खुलासे वा स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे त्यांनाअनुज्ञेय नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी

केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे, हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती देय असणार नाही. अपिलार्थीने आज रोजी आयोगापुढे केलेल्या युक्तिवादामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अस्पष्ट माहिती पुरविल्याचे नमूद केले आहे, यावर उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती परत वाचनीय व स्पष्टपणे दिसेल अशा स्वरुपात तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.११.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी ज्या भागातील माहिती अस्पष्ट स्वरुपात आहे, त्या भागातील माहिती अपिलार्थीस स्पष्ट स्वरुपात हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २८.११.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना उशिरात उशिरा दि. २७.१२.२००७ रोजी अगर तत्पूर्वी देय होत असताना अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०२.२००८ रोजी, प्रथमतः अपूर्ण स्वरुपात पुरविली. अपिलार्थीस या प्रकरणी माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी ४८ दिवसांचा विलंब लावल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ती माहिती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांच्या आवाक्याबाहेरचे काम होते अथवा ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती, अशातील कोणतीही बाब या ठिकाणी संभवत नसल्याने, जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० (१) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर हजर नाहीत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त

होण्यास एकूण ४८ दिवस इतक्या कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल, विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.१२०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी हेतूतः विलंब लावला हे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी यापूर्वी पुरविलेल्या माहितीतील अस्पष्ट माहिती त्यांना, स्पष्ट स्वरुपात हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून ४८ दिवस वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.१२०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शरद कुलकर्णी,फ्लॅट नं.४,आर्या टॉवर, एडीसीसी स्टेडीयमजवळ, सिडको कॅम्युनिटी सेंटर, एन-२,सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,निम्न दुधना प्रकल्प विभाग, सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,जायकवाडी प्रकल्प मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७९
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

१. श्री. मोहंमद लतीफ अहमद, : अपिलार्थी
औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रबंधक,
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेल्या दि. १७.१२.२००७ रोजीच्या पत्राच्या विरुध्द केल्याचे नमूद करुन,या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे असे नमूद केले आहे की, त्यांचे मूळ सेवापुस्तक शिवाजी महाविद्यालय, उदगीर जिल्हा लातूर येथे मागणी केली असता ते त्यांच्याकडे उपलब्ध नाही, असे उत्तर प्राप्त झाल्याने नाराजीने त्यांनी द्वितीय अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दि.

०४.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या दि. १७.११.२००७ रोजीच्या पत्राचा संदर्भ देऊन त्यांच्या स्वतःच्या निवृत्तीवेतनासाठी आवश्यक असणाऱ्या शिवाजी महाविद्यालय,उदगीर जिल्हा लातूर येथील सेवापुस्तिकेची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या शिवाजी महाविद्यालय,उदगीर जि.लातूरची मूळ सेवापुस्तिका जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे दि. ०३.०१.२००८ रोजीचे प्रथम अपील त्यांच्याकडे प्राप्त झाले नाही. या प्रकरणाची पार्श्वभूमी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्या महाविद्यालयामध्ये अधिव्याख्याता या पदावर रुजू होण्यापूर्वी शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर येथे अधिव्याख्याता या पदावर कार्यरत होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे त्यांची निवड झाल्यानंतर सन २००७ मध्ये ते जन अपिलीय अधिकारी यांच्या महाविद्यालयामध्ये रुजू झाले. अपिलार्थी जरी त्यांच्या महाविद्यालयात रुजू झाले तरी शिवाजी महाविद्यालय, उदगीर यांच्याकडून त्यांची मूळ सेवापुस्तिका शासकीय महाविद्यालयाकडे हस्तांतरित केली गेली नाही व त्याचा परिणाम म्हणून अपिलार्थीस आवश्यक ते

सेवानिवृत्तीवेतन मिळण्यामध्ये अडचण निर्माण झाली. अपिलार्थीकडे उपलब्ध असलेल्या त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेच्या झेरॉक्स प्रतीवरुन अपिलार्थीचे सेवानिवृत्तीवेतन प्रकरण जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र लेखाकार,नागपूर यांच्याकडे पाठवून अपिलार्थीस शासकीय महाविद्यालयातील त्यांच्या सेवेशी संबंधित, सेवानिवृत्तीवेतन त्यांना आता प्राप्त होत आहे. तथापि शासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी ज्या खाजगी महाविद्यालयात सेवा केली होती, त्या महाविद्यालयाचे सेवानिवृत्तीवेतन त्यांना मूळ सेवापुस्तिकेच्या अभावी प्राप्त होऊ शकत नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसलेल्या माहितीची मागणी केली आहे, त्यामुळे साहजिकच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कळविले आहे. अपिलार्थीस जर आता शिवाजी महाविद्यालय,उदगीर येथील त्यांची मूळ सेवापुस्तिका हवी असेल तर त्यांनी उदगीर येथील महाविद्यालयाशी परस्पर पत्रव्यवहार करुन ती मिळविण्याचा प्रयत्न करावा अन्यथा त्यांनी योग्य त्या प्राधिकारण/न्यायाधिकरणाकडे दाद मागावी व आपला प्रश्न सोडवून घ्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसलेली माहिती त्यांच्याकडे मागितल्याचे व अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याने आणि आज जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहंमद लतीफ अहमद, ब्लॉक नंबर ७५, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड कॉलनी, शाह बाजार, चंपाचौक,औरंगाबाद-४३१ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य ,शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४८०
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

१ श्री. उत्तमराव हरीभाऊ कमानदार, : अपिलार्थी
रा.जायकवाडी (उत्तर), ता.पैठण,जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
जायकवाडी पाटबंधारे विभाग,
नाथनगर (उत्तर),
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
औरंगाबाद.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता,
जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.१,
नाथनगर (उत्तर),पैठण,जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे समक्ष त्यांचे दि. ०२.०६.२००९ रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी, त्यांचे विचाराधीन अपील क्र.४८०/०८ ते स्वखुशीने मागे घेत असल्याने, रद्द करण्याची विनंती आयोगास केली आहे. अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र.४८०/०८, दि.२८.०२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उत्तमराव हरीभाऊ कमानदार, मु.पो.उत्तर जायकवाडी, ता.पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.१,नाथनगर (उत्तर),पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४८१
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

१ श्री. गुणवंत गणपत भारुळे, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद,जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना
त्रयस्थ पक्ष : श्री. एस.बी.खंबाळकर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविण्यासाठी पंचवीस दिवस इतका विलंब लावला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी विलंबासाठी जन माहिती अधिकारी यांना फक्त ताकीद दिलेली आहे. अपिलार्थीकडून अनावश्यकरित्या वसूल केलेली फी रु. १८६/- इतकी त्यांना सात दिवसांच्या आत परत करण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना अद्यापपावेतो हे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडून परत मिळाले नाही आणि त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये संचिकेतील पान क्र.१३ पुरविण्यात आलेले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२८.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अधिपत्त्याखालील प्राथमिक आरोग्य केंद्र, श्रेष्टी,ता.परतूर,जि.जालना येथील औषधनिर्माता श्री. एस.बी.खंबाळकर यांच्या निलंबन प्रकरणाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. खंबाळकर यांना निलंबित करण्यासाठी आधारभूत मानलेले अभिकथने, या प्रकरणाशी संबंधित सर्व टिपण्या,शेरे यासह संपूर्ण संचिकेत उपलब्ध असलेल्या सर्व अभिलेख्यांच्या छायाप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२७९/- चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केला. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने शासकीय कोषागारात दि. २३.०८.२००७ रोजी केला. या चलनाची प्रत जन माहिती अधिकारी यांना दि. २९.०८.२००७ रोजी पुरविण्यात आली व अपिलार्थीस दि.२७.०९.२००७ रोजी माहिती दिली, तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकाऱ्यास प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे शास्ती लावण्याची विनंती केली होती. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.११.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारित केले व अपिलार्थीस त्यांच्याकडून अनावश्यकरित्या वसूल केलेले शुल्क रु.१८६/- जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सात दिवसांच्या आत परत करण्याचे व उर्वरित कागदपत्रे अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे त्यांना सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून शुल्क परत मिळाले नाही, त्यामुळे व अपिलार्थीस संचिकेतील पृष्ठ क्र.१३ ची प्रत न

मिळल्याने व याप्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना फक्त ताकीद दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादामध्ये, या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून २५ दिवसांच्या विलंबाने माहिती प्राप्त झाल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावण्याची, त्यांनी माहितीपोटीचे आकारलेले जादाचे शुल्क रु.१८६/- इतके त्यांना परत मिळण्याची व पृष्ठ क्र.१३ ची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीकडून त्यांनी घेतलेले जादाचे शुल्क रु.१८६/- इतके त्यांना तातडीने परत करण्यात येईल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या मूळ संचिकेमध्ये पृष्ठ क्र.११ नंतर पुढच्या पृष्ठावर पृष्ठ क्र.१५ असा चुकीने क्रमांक टाकला गेला आहे, जो मूळात पृष्ठ क्र.१३ असा असावयास हवा आहे. परिणामी पृष्ठ क्र.१३ हे मूळ संचिकेत उपलब्ध नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांना पृष्ठ क्र.१३ ची प्रत पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. २८.०६.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती त्यांना दि. २७.०७.२००७ रोजी अगर तत्पूर्वी देय होत होती. यामध्ये अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे जन माहिती अधिकारी यांनी ज्या पत्राद्वारे कळविले आहे त्या पत्राचा दिनांक व अपिलार्थीने सदर शुल्क भरल्याचा दिनांक यातील कालावधी याचा विचार केल्यास अपिलार्थीस ही माहिती दि. २९.०८.२००७ रोजी अगर तत्पूर्वी देय होत होती. मात्र ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी

त्यांना दि. २७.०९.२००७ रोजी पुरविली असल्याने या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी, एकूण २२ दिवसांचा, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे शुल्क भरुनही, विलंब लावल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. हा विलंब पाहता, जन माहिती अधिकारी यांना आता अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी लागेल.म्हणून या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले शुल्क रु.२७९/- इतके, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी विलंबाने माहिती पुरविल्यामुळे, आता परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रु.२७९/- इतके अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

अपिलार्थीच्या त्यांना पृष्ठ क्र.१३ ची प्रत मिळाली नाही, या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, आयोगाने ही संचिका तपासली असून या संचिकेमध्ये पृष्ठ क्र.११ नंतरच्या पृष्ठावर पृष्ठ क्र.१५ टाकला गेला आहे. मूळ संचिकेमध्ये पृष्ठ क्र.१३ मूळात अस्तित्त्वात नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे व जन अपिलीय अधिकारी यांनी देखील आयोगाकडे दिलेल्या स्पष्टीकरणामध्ये यास दुजोरा देऊन पृ.क्र.१५ हा चुकीने टाकला गेला असल्याचे कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांचे पृष्ठ क्र. १३ अस्तित्त्वात नाही, हे म्हणणे आयोगातर्फे ग्राहय धरण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती विलंबाने प्राप्त झाली या मुद्यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी २२ दिवसांचा विलंब लावला आहे. या विलंबाचे कोणतेही कारण मूळात समर्थनीय असू शकत नाही, असे आयोगाचे मत आहे. कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फक्त त्यांच्या कार्यालयातील नस्तीच्या झेरॉक्स प्रती काढणे एवढेच काम त्यामध्ये होते. तथापि ते काम देखील त्यांनी २२ दिवसांच्या विलंबाने केले. ही माहिती

अपिलार्थीस देण्यास जन माहिती अधिकारी यांना विशेष कष्ट घ्यावे लागतील किंवा ती अपिलार्थीस देण्यास त्यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागेल, अशातील कोणतीही बाब आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम २० (१) तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत, असे आयोगाचे मत आहे. या मुद्यावर उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे केलेला खुलासा पाहता, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांनी हा विलंब लावल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सर्व सहायक अधिकारी/कर्मचाऱ्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी व त्यांच्या कार्यालयातील त्यांचे सर्व सहाय्यक हे या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्यासाठी जबाबदार असल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी आणि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांचे सर्व जबाबदार सहायक/कर्मचारी यांना, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या २२ दिवसांच्या विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.५,५००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

**"००७० इतर प्रशासनिक सेवा,६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१ "**

उपरोक्त शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत करुन तसा अनुपालन अहवाल आयोगास या आदेशानंतर तीस दिवसांत सादर करावा व सर्व संबंधित सदर शास्तीचा

भरणा जास्तीत जास्त पाच हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात नियमितपणे करतील असे पहावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.२७९/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना एकूण रु.५५००/- (अक्षरी रु.पाच हजार पाचशे) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांनी उपरोक्त आदेश क्र.२ प्रमाणे शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत करुन तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा व संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे शास्तीच्या रकमेचा जास्तीत जास्त पाच हप्त्यात नियमितपणे शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा करतील याची दक्षता घ्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गुणवंत गणपत भारुळे,चिटणीस, द्वारा जिल्हा सामान्य रुग्णालय, सुभाष रोड,परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. वरिष्ठ कोषागार अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४८२
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

१ श्री. अशोक एस.बुधवंत, : अपिलार्थी
रा.जिंतूर जि.परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी,
जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग जिंतूर,
जि.परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे,
जिल्हा परिषद,परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. २४.०५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत न देता ज्या-ज्या वेळी माहिती देण्यासंबंधी त्यांच्याकडे विचारणा केली, त्या-त्या वेळी त्यांनी अपिलार्थीस माहिती तयार करुन नंतर देऊ, असे बोलून वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न केला. त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. ०८.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई न करता,जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना आपल्या पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे विचाराधीन प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कठोर कारवाई आदेशित करावी, अशी त्यांनी आयोगास या अपील अर्जामध्ये अखेरीस विनंती करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-०६, २००६-०७, २००७ ते दि. २४.०५.२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित कामांसंदर्भात सर्वसाधारण स्वरुपाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सर्वसाधारण स्वरुपाची असून त्यामध्ये कोणत्याही निश्चित कामाचा उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन या अर्जासोबत कुटुंबातील श्री. शेषराव आप्पासाहेब बुधवंत यांच्या नावाचे दारिद्र्यरेषेचे प्रमाणपत्र सादर केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.१०.२००७ रोजी सुनावणी झाली असून या सुनावणीच्या दिवशी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. तथापि प्राप्त माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाली असून, त्यांनी उपस्थित मजूरांचा त्रैमासिक अहवाल मागितला असता, संबंधितांनी त्रैमासिक अहवाल उपलब्ध करुन दिला नाही. त्यांना जन माहिती अधिकारी

यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अशाप्रकारे अपूर्ण आहे. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये कामासाठी झालेला खर्च दाखविला परंतु त्रैमासिक अहवालाची प्रत त्यांना दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेले दारिद्रयरेषेचे प्रमाणपत्र अवैध आहे. ते प्रमाणपत्र त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीचे आहे. ते अपिलार्थीशी सरळ संबंधित नाही. तसेच अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात कधीही उपस्थित झाले नाहीत. परंतु तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रतिनिधीमार्फत दि. १९.१०.२००७ रोजी सुनावणीच्या वेळी त्यांना व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन दिली, त्यापृष्ठयर्थ त्यांची पोचसही देखील घेतली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत ग्राम पंचायत,पांगरी येथील ग्राम सेवकाने दि. २५.०५.२००७ रोजी दिलेले दारिद्रयरेषेचे प्रमाणपत्र त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेले आहे. हे प्रमाणपत्र अपिलार्थीच्या कुटुंबातील श्री. शेषराव आन्नासाहेब बुधवंत या व्यक्तीच्या नावावर दिले गेलेले आहे. माहिती अधिकार अधिनियमाद्वारे अर्ज करताना अर्जदार स्वतः जर ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती व सज्ञान असतील तर अशाप्रकारचे प्रमाणपत्र त्यांच्या नावाने असणे अनिवार्य आहे. उपरोक्त प्रकरणी कुटुंबातील दुसऱ्या व्यक्तीच्या नावाने दिलेले प्रमाणपत्र अपिलार्थीने दिले असल्याने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्जच मूळात अवैध ठरत आहे. याचबरोबर अपिलार्थीस द्यावयाच्या मजूर उपस्थितीच्या त्रैमासिक अहवालाबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे कामावर दाखविलेला खर्च २००५ च्या पूर्वीचा आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही २००५ सालापासून पुढील आहे, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा मुद्दा आयोगातर्फे ग्राहय धरण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीस आज सुनावणीच्या वेळी, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त

करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा गेले होते अथवा या संदर्भात त्यांच्याकडे काही पुरावा आहे काय, हे विचारले असता, अशाप्रकारचा पुरावा दाखविण्यास त्यांनी असमर्थतता व्यक्त केली. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे माहितीसाठी केलेल्या अर्जाद्वारे व्यक्तीशः माहितीची मागणी केली तर ती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व अर्जदाराचे असते. या प्रकरणी हे उत्तरदायित्त्व आवश्यक त्या रीतीने अपिलार्थीने पार पाडल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त सर्व बाबींचा एकत्रितपणे, विशेषतः अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या अवैधतेचा व देय माहिती मिळाल्याच्या मुद्याचा विचार करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक एस.बुधवंत,रा.गुरुकृपा सदन,भूमि अभिलेख कार्यालयासमोर,आमदार कॉलनी,जिंतूर, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग जिंतूर,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे,जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४८३
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

१ श्री. उदयसिंह प्रकाशराव निंबाळकर, रा.उस्मानाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद. : प्रतिवादी
२ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन विभाग), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ४४ दिवस इतक्या विलंबाने माहिती प्राप्त झाली. सदर माहिती विलंबाने दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे अधिकार माहिती आयुक्त यांना असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. तसेच सुनावणीच्या वेळी त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र.२,३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणले, परंतु ही माहिती देण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेशित न केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील बांधकाम परवानगीशी संबंधित एकूण ४ मुद्यांद्वारे सन

२००५ ते २००७ या कालावधीतील माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००५ ते २००७ या कालावधीमध्ये उस्मानाबाद नगरपरिषदेमध्ये बांधकाम परवानगीसाठी दाखल झालेल्या अर्जांचा तपशील, बांधकाम परवानगीसाठी अर्ज मिळाल्यापासून साठ दिवसांच्या आत बांधकाम परवानगी न दिलेल्या अर्जांची संख्या व अर्जदारांची नावे, ६० दिवसांत परवानगी न मिळालेल्या अर्जदाराने प्रत्यक्षात बांधकाम केले आहे का नाही, याचा तपशील व परवानगी न दिल्यामुळे नगरपरिषदेचे बुडालेल्या उत्पनाचा तपशील - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दि. ०७.१२.२००७ रोजी विनामूल्य माहिती पुरविण्यात येत असल्याचे या पत्राद्वारे कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१)च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा हा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०१.२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस ही माहिती सुनावणीपूर्वी पुरविण्यात आली असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांना आवश्यक असलेली

माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दि. ०४.०१.२००८ रोजी विनामूल्य प्राप्त झालेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस दि.०४.०१.२००८ रोजी विनामूल्य माहिती प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२,३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नाही, ती त्यांना देण्याचे आदेशित करण्यात यावे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२,३ व ४ चे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मुद्दा क्र. ३ व ४ द्वारे मागणी केलेली माहिती काल्पनिक स्वरुपाची (hypothetical) असून अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची दैनंदिन व विहित कार्यपध्दती लक्षात घेता, त्यांच्याकडे उपलब्ध असणे कोणत्याही प्रकारे संभवत नाही. अपिलार्थीस मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी, नगर परिषदेकडे अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या कालावधीमध्ये, ६० दिवसांच्या आत, बांधकाम परवानगी न दिल्याचे त्यांना एकही प्रकरण आढळून न आल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र.२ च्या संदर्भात ही माहिती मूळ माहिती बरोबर देणे अपेक्षित होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही केली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई आयोगाने आदेशित करावी, अशी आयोगास विनंती केली आहे. या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, अपिलार्थी हे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन स्वतः आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचा हा मुद्दा आयोग मान्य करीत आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तीशः माहितीची मागणी केल्यानंतर ही माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात पुढील संपूर्ण घटनाक्रमामध्ये सर्व टप्प्यावर माहिती प्राप्त करुन घेण्याची, माहिती देण्यासाठी आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्ञात करुन घेण्याची, संपूर्ण जबाबदारी ही अर्जदाराची असते. या प्रकरणी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा गेले होते, याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जोडलेला नाही. हे पाहता अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची मागणी आयोग मान्य करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०२-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उदयसिंह प्रकाशराव निंबाळकर, मेनरोड,निंबाळकर गल्ली, उस्मानाबाद, ता. जि. उस्मानाबाद -४१३ ५०१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन विभाग),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४८४
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

१ श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, : अपिलार्थी
मुदखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,हिमायतनगर,जि.नांदेड.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,हिमायतनगर,जि.नांदेड.

त्रयस्थ पक्षः १. श्री. संतोष शेषेराव शिंदे
२. श्री. शंकर पळशीकर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.०५.२००७ रोजी पाठविलेल्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील, अर्धघाऊक केरोसिन विक्रेते श्री. संतोष शिंदे व शंकर पळशीकर यांच्याशी संबंधित दि. ०१.०४.१९९८ ते १५.०५.२००७ या कालावधीशी संबंधित

काही माहिती मागविली होती. मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०७.२००७ रोजी केलेले प्रथम अपील त्यांना प्राप्त झाले असल्याचे दिसून येत असल्याने, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. १४.०७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन,तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आपला अंतिम निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१४.०७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य

विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला नि-

र्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०२-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, तालुका सर चिटणीस, लोकभारती पार्टी, नवी आबादी,मुदखेड,ता.मुदखेड,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,हिमायतनगर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,हिमायतनगर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४८५
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा वक्फ अधिकारी,नांदेड<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : १. श्री. महंमद चाऊस
२. श्री. सय्यद सलीम सय्यद मोहीयोद्दीन

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वक्फ बोर्डाच्या अधिकार क्षेत्रातील दर्गाह हजरत सय्यद मस्तानशावली महंमदअली रोड या दर्ग्याच्या मिळकतीसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

दि. ०३.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे अथवा आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रात आढळून येत नाही.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०३.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन सुनावणी घेऊन निर्णय घेणे न्यायोचित राहील, असे आयोगास वाटते. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन,तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०३.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक,सा.सत्यवृत्त,मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४८६
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

१ श्री. राजाभाऊ देविदास राऊत, : अपिलार्थी
रा. आंबेवाडी, ता.जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,जलस्वराज्य विभाग
जिल्हा परिषद,उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती,
मौजे आष्टा कासार ता.लोहारा,जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी,जलस्वराज्य विभाग, जिल्हा परिषद,उस्मानाबाद
(सुधारित आदेशानुसार):
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,लोहारा,जि.उस्मानाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसांत माहिती दिली नाही. अपील सुनावणीस दि.१७.१२.२००७ व १०.०१.२००८ रोजी माहिती अधिकारी अनुपस्थित राहिले. माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या पत्रावर त्यांच्या सहया नाहीत व त्यांनी चुकीची माहिती दिली असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील

केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे आष्टा कासार ता.लोहारा, जि.उस्मानाबाद येथील जलस्वराज्य प्रकल्पाची माहिती मागविली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे व यापृष्ठयर्थ त्यांच्या कुटुंबातील श्री. देविदास भरगा राऊत या व्यक्तीच्या नावाचे प्रमाणपत्र जोडले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती,मौ.आष्टा कासार, ता.लोहारा, जि.उस्मानाबादच्या अध्यक्ष/सचिवांना अपिलार्थीस, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे सिध्द झाल्यास विनामूल्य व न झाल्यास प्रतिपृष्ठ रु.२/- प्रमाणे माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली.  तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२६.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आदेश पारित करुन या आदेशाद्वारे अपिलार्थीस सात दिवसांच्या आत मोफत माहिती देण्याचे सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, मौ. आष्टा ता.लोहारा यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी ,यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधितांकडे तयार असून ती अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सचिव,ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, पो.आष्टा कासार यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेशित केले. संबंधित सचिव हे सार्वजनिक प्राधिकरणाचे सेवक नाहीत, त्यामुळे त्यांची माहिती अधिकारी म्हणून नेमणूक करता येणार नाही तथापि मा. राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.०४.१२.२००८ रोजी अपील क्र.१९६३/०७ या प्रकरणात दिलेल्या निर्णयानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.उस्मानाबाद यांनी त्यांच्या दि. ०१.०६.२००९ रोजीच्या आदेशाद्वारे, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जलस्वराज्य प्रकल्प,जिल्हा परिषद,उस्मानाबाद कार्यालयात प्राप्त होणाऱ्या अर्जासंदर्भात ग्राम पंचायत स्तरावर जन माहिती अधिकारी म्हणून संबंधित ग्रामसेवकाची तर संबंधित गट विकास अधिकाऱ्याची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केलेली असून, जिल्हास्तरावर गट प्रमुख तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.उस्मानाबाद यांच्या नेमणूका अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी म्हणून केलेल्या आहेत, असे आयोगास अवगत केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने स्वतः माहिती मागितली असताना दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र मात्र त्यांच्या कुटुंबातील इतर व्यक्तीच्या नावाचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केले आहे. जे पूर्णतः अवैध आहे. त्यामुळे अपिलार्थीस जर आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती आवश्यक असेल तर त्यांनी, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे, त्यांचे स्वतःच्या नावाचे वैध प्रमाणपत्र, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत आष्टा कासार,ता.लोहारा यांच्याकडे सादर करावे. सदर प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती, त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य द्यावी, जर अपिलार्थीने, ते

दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे वैध प्रमाणपत्र त्यांना सादर केले नाही, तर या माहितीसाठी त्यांना प्रतिपृष्ठ रु.२/-प्रमाणे शुल्क आकारणी करावी,असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्राम पंचायत आष्टा कासार,ता.लोहारा,जि.उस्मानाबाद यांनी, अपिलार्थीने, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे वैध प्रमाणपत्र सादर केले नाही, तर त्यांना आवश्यक असलेली त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना, प्रतिपृष्ठ रु.२/-प्रमाणे शुल्क आकारणी करावी आणि अपिलार्थीने त्यांचे स्वतःचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे वैध प्रमाणपत्र सादर केल्यास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजाभाऊ देविदास राऊत,रा. आंबेवाडी, ता.जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्राम पंचायत मौ.आष्टा-कासार, ता.लोहारा, जि. उस्मानाबाद (ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट प्रमुख तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,जलस्वराज्य विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४८७
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

१ श्री. संजय महादेवराव सोनवणे, : अपिलार्थी
रा.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन कार्यालय,उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय नियंत्रक
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन कार्यालय,उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन कार्यालय,उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आजपर्यंत माहिती न दिल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ चे पालन न केल्याने कलम २० नुसार शास्ती लावण्यात यावी. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये विभाग नियंत्रक,राज्य परिवहन कार्यालय,उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित त्यांच्या मुख्य कार्यालयातून जेष्ठ नागरिकांच्या तिकीटाच्या आकारणीबाबत व जिल्हयात उपलब्ध व

आयुष्य संपलेल्या बसगाडयांच्या संख्येबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१६.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी् सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज मूळात त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ अर्जाचे अवलोकन केल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती २० दिवसांच्या आत देणे शक्य असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे माहितीसाठीचा प्रथम अर्ज व अपील अर्ज दाखल केल्यापृष्ठयर्थ विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, उस्मानाबाद यांच्या कार्यालयातील संबंधित आवक-जावक लिपीकाच्या दि.२६.०९.२००७ व १६.११.२००७ रोजीच्या दोन पोचसहया आयोगास उपलब्ध करुन दिल्या आहेत. हे पाहता जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा, अपिलार्थीचा, त्यांना मूळ अर्ज व अपील अर्ज प्राप्त झाला नाही, हा युक्तीवाद आयोग अमान्य करीत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधितांस अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व अपील अर्जाची एक जादा झेरॉक्स प्रत आयोगातर्फे देण्यात आली असून जन माहिती अधिकारी यांना असे

आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे शास्ती लावण्याची मागणी केली आहे. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता,ही माहिती अपिलार्थीपासून हेतुपूरस्सर लपवून ठेवण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांना कोणतेही स्वारस्य असणार नाही व तसेच त्यांनी आज अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आयोगासमोर कबूल केले असल्याने अपिलार्थीची जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची मागणी आयोगास मान्य करता येणार नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे या प्रकरणी सक्त ताकीद देण्यात येत आहे की, इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे,राजे संभाजीनगर (प.).तुळजापूर,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन कार्यालय,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४८८
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

१ श्री. संजय विश्वासराव शिंदे, : अपिलार्थी
रा.शेळगाव,ता.परंडा,जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
महात्मा फुले विद्यालय,पारगाव(मोटे),
ता.वाशी,जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
बंकटस्वामी,
शिक्षण संस्था,खडकी घाट,ता.जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांच्या दि. १३.०७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी घाट, ता.जि.बीड या शिक्षण संस्थेच्या स्थापनेसाठी वापरलेल्या मूळ कागदपत्रांच्या अभिलेख्यांची संपूर्ण प्रती साक्षांकित स्वरुपात मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०.०९.२००७

रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संस्थेकडून मागवून घ्यावी, असे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने हे अपील सचिव, बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी घाट यांच्याकडे केले आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.१०.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या संदर्भातील कोणतेही आदेश त्यांनी पारित केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, अपिलार्थीच्या दि. १३.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे आयोगास आवश्यक वाटते. तसेच शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक:संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांची आता जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. हे पाहता, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. १३.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१३.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय विश्वासराव शिंदे,रा.शेळगाव,ता.परंडा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,महात्मा फुले विद्यालय,पारगाव (मोटे), ता. वाशी, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.उस्मानाबाद यांना अपिलार्थीच्या दि.१३.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४८९
निर्णय दिनांक ०२-०६-२००९

१ श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, : अपिलार्थी
रा.टेंभुर्णी, ता.अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा कृषि अधिकारी, लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,लातूर.
प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि उपसंचालक,
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,
लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिदिनी रु. २५०/- या प्रमाणे दंड लावावा व रु. २०००/- इतका वेगळा दंड आकारण्यात यावा, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष श्री. अशोक पिराजी सोळंके, कृषि सहायक यांच्या नेमणूकी संदर्भात काही माहिती मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींचे ओळखपत्र त्यांच्या अर्जासोबत सादर केले आहे. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ

अर्ज जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे केला होता, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर यांच्याकडे दि. २९.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पाठविला. तो तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर यांच्याकडे दि. ०३.०९.२००७ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाला. यानंतर संबंधित तालुका कृषि अधिकाऱ्याने अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १४.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु. २२/- त्यांच्या कार्यालयात किंवा शासकीय कोषागारात भरणा करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणा न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे त्यांनी त्यांच्याकडील दि. १४.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले होते. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जरी ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केला असला तरी यासंबंधीचा वैध पुरावा अर्जासोबत जोडला नाही. अर्जासोबत त्यांनी त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींचे ओळखपत्र जोडले आहे, हे ओळखपत्र ग्रामपंचायत टेंभुर्णीतर्फे देण्यात आले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी

यांच्याकडे पुरविलेल्या या ओळखपत्राची प्रत इतकी अस्पष्ट आहे की, त्यावरुन ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे सिध्द होत नाही. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस शुल्क कळविले आहे त्यानंतर अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले व माहिती पाहून नंतर शुल्काचा भरणा करतो, असे जन माहिती अधिकारी यांना सांगितले पण नंतर अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात शुल्काचा भरणा करण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत.अपिलार्थीने आता दि. ३१.०५.२००९ रोजी, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करुन ही माहिती प्राप्त झाल्याचे लिहून दिले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीची पोचसही असलेले पत्र आयोगास दाखविले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला होता व या अर्जासोबत त्यांनी ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबत कोणताही वैध पुरावा सादर न करता कुटुंब ओळखपत्राची झेरॉक्स प्रत सादर केली आहे, ही प्रत इतकी अस्पष्ट आहे व त्यामुळे अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा निश्चित बोध होत नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत तयारी दर्शविली आहे. मात्र अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२२/- त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याची अथवा त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे वैध प्रमाणपत्र सादर करण्याची कधीही तयारी दर्शविली नाही. फक्त जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन माहिती पाहून, "माहिती मिळाली"असे जन माहिती अधिकारी यांना दि. ३१.०५.२००९ रोजी लेखी दिले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तीशः माहितीची मागणी केली होती, हे सर्व मुद्दे लक्षात घेता, विशेषतः अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करुन, त्यांना माहिती प्राप्त झाल्याची कबूली त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. ३१.०५.२००९ रोजी दिली असल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जावरील विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे

कोणतेही प्रयोजन आयोगास आज आढळून येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे या घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, मु.टेंभूर्णी पो.तालुका अहमदपूर,जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक,जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४९०

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

१ श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल, : अपिलार्थी
५-११-२०, पदमपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक संचालक, नगर रचना, औरंगाबाद
महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून CTS 18235 संबंधात अपूर्ण व चुकीची माहिती मिळाली व त्यांना अपील निर्णय प्राप्त झाला नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व (२) प्रमाणे कार्यवाही करावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे महानगरपालिका क्षेत्रातील CTS 18235 खरेदीसंदर्भात एकूण दोन मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये वीस इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील काही भाग वेगळ्या प्राधिकरणाशी संबंधित असल्याने त्या भागाशी संबंधीत माहितीकरिता संबंधित प्राधिकरणाशी संपर्क साधण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीने दिनांक २५-०४-२००७ रोजी महानगरपालिकेकडे या शुल्काचा भरणा केला व माहिती प्राप्त करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊनही कोणतेही लेखी आदेश पारित न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी मागणी केल्याप्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये वीस इतके त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी भरले. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व चूकीची होती तसेच ती साक्षांकीत केली नव्हती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ही माहिती साक्षांकीत करुन मागितली. परंतु ही माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, महानगरपालिकेने औरंगाबाद शहरामधील पदमपुरा परिसरातील CTS नं.

18235/1 या जागेच्या खरेदी प्रकरणामध्ये भ्रष्टाचार केला असून या जागेच्या मालकाने एकच जागा मनपास दोनदा विकलेली आहे. CTS नं. 18235 या चर्मकारांच्या पुनर्वसनाप्रीत्यर्थ भूसंपादन केलेल्या तीन एकर दहा गुंठे जागेतून परत ०.९ गुंठे जागा महानगरपालिकेने संबंधित जागा मालकाकडून खरेदी केलेली आहे व त्याव्दारे लाखो रुपयांचा घोटाळा महानगरपालिकेने जाणुनबुजून केलेला आहे. या प्रकरणी त्यांना संपूर्ण तपशील हवा आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर दिनांक २६-०६-२००७ रोजी माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद शहरातील CTS नं.18235 च्या खरेदी विक्रीसंदर्भात एकूण दोन मुद्दयाव्दारे व्यापक स्वरुपाची माहिती मागविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित केल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार असे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी दिलेल्या निर्णयाबाबत अपिलार्थीस देणे मूळात अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांना यांच्या निर्णयाबाबत जे स्पष्टीकरण विचारले आहे ते अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती ही, या जमिनीच्या खरेदी विक्री व्यवहाराच्या प्रती व या संदर्भात वेळोवेळी मनपाने घेतलेल्या ठरावाच्या प्रती अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थीस आवश्यक ती देय माहिती प्राप्त होऊ शकेल. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी या ठरावाच्या प्रती व जमिनीच्या खरेदी विक्री व्यवहाराच्या प्रती यापूर्वीच पुरविल्या आहेत. परंतु अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना त्यांनी परत दिलेली असून ती त्यांना अद्यापपावेतो मिळाली नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसाच्या आत परत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या युक्तिवादामध्ये त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची असल्याप्रीत्यर्थ आयोगासमोर युक्तिवाद केला आहे. त्यामध्ये त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, मनपाने केलेल्या ठरावामध्ये भूखंडाचा क्रमांक 18325 असा दाखविला आहे, मात्र 18235 ची मंजूरी यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी ही टंकलेखनाची चूक असल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे व ही चूक अपिलार्थीस नवीन देण्यात येणा-या माहितीमध्ये दुरुस्ती करुन दिली जाईल असे त्यांनी आयोगास अवगत केले. यावरुन आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०६-२००७ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने दिली आहे. हा विलंब पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय असल्याचे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये वीस इतके त्यांना परत करावे लागेल.

वरील सर्व बाबी पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य, व्यक्तिशः व साक्षांकीत करुन पुरवावी व याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये वीस इतके त्यांना परत करावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् अपिलार्थीने महानगरपालिकेच्या सर्व्हे नंबर १८२३५ च्या खरेदीच्या व्यवहारा-संदर्भात घेतलेल्या आक्षेपाचे गंभीर स्वरुप पाहता, आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका,

औरंगाबाद यांनी या प्रकरणी त्यांच्या स्तरावर चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य, व्यक्तिश: व साक्षांकीत करुन पुरवावी व अपिलार्थीचे माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये वीस इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

३. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. विष्णू, उप अभियंता) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल, ५-११-२०, पदमपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४९१

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

१ श्री. गलांडे शिवाजी नामदेवराव, : अपिलार्थी
मु. पो. तालुका वडवणी,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०३-०१-२००७ रोजी पाठविलेल्या अपील अर्जावर त्यांना कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही अथवा यासंबंधाने त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. (अपिलार्थीने सुनावणी वेळी ही तारीख ०३-०१-२००८ आहे अशी दुरुस्ती केली)

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रासंबंधी एकूण अकरा मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-११-२००७ रोजीच्या रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असून हा अर्ज दिनांक २३-११-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी हे त्यांना आयोगाच्या कार्यालयातून दिनांक ०१-०६-२००९ रोजी दुपारी ०१-५० वाजता दूरध्वनीव्दारे संदेश देऊनही ते सुनावणीसाठी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय

अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे माहितीसाठीचा प्रथम अर्ज व त्यावरील अपील अर्ज सादर केल्यापृष्ठ्यर्थ आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला असून त्यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज दिनांक ०३-०१-२००८ रोजी तहसील कार्यालय माजलगाव येथे प्राप्त झालेला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. मुद्दा क्रमांक ९ व १० मधील काही भाग वगळता उर्वरित संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे त्यांना अनिवार्य आहे. सदर माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब सचिव (महसूल) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन त्यांच्या कार्यशैलीमधील स्पष्ट केलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाची व बेपर्वा कार्यशैलीची नोंद महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गलांडे शिवाजी नामदेवराव, मु. पो. तालुका वडवणी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४९२

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

१ श्री. लहु रामभाऊ घुमरे, : अपिलार्थी
मु. पो. पारगांव (घु.), तालुका पाटोदा,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, महात्मा फुले माध्यमिक व उच्च
माध्यमिक विद्यालय, पारगांव (मोटे), तालुका वाशी,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट),
तालुका जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही व यासंदर्भात त्यांनी दाखल केलेले प्रथम अपील, जन अपिलीय अधिकारी यांनी, गुणवत्तेवर निकाली काढले नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे " श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट), तालुका जिल्हा बीड " या संस्थेच्या संस्था स्थापनेसाठी वापरलेल्या मूळ घटना, दस्तऐवजाची एक ते शेवटच्या पानापर्यंत सत्यप्रतीत माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संस्थेशी संबंधित असल्याने त्यांना श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट) यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट) यांच्याकडे दिनांक १३-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-११-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संस्थेकडे उपलब्ध नसल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करतांना असा युक्तिवाद केला की, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट), तालुका - जिल्हा बीड ही १९६० साली मूळात स्थापन झाली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे संस्थेच्या स्थापन सालाची म्हणजे अंदाजे ४९ वर्षापूर्वीची जुनी माहिती या अर्जाव्दारे मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या

संस्थेच्या घटनेसंदर्भात त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाही, कारण मध्यंतरीच्या काळात सचिव पदावरील व्यक्ती बदलल्या गेल्या, सदर संस्था १२ वर्षे कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात होती व तदनंतर आलेल्या सचिवांनी सर्व रेकॉर्ड त्यांच्याकडे घेऊन देखील त्यांच्याकडून अद्यापपर्यंत त्यांना पूर्ण कार्यभार मिळाला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांनी धर्मादाय आयुक्त यांच्याकडे देखील संस्थेच्या मूळ घटनेसंदर्भात त्यांनी विचारणा केली असता धर्मादाय आयुक्तांकडे देखील संस्थेची मूळ नोंदणी संचिका, घटना नियमावली उपलब्ध नसल्याचे त्यांना धर्मादाय आयुक्तांनी दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अवगत केले आहे. आता त्यांच्या संस्थेने दिनांक २८-१२-२००७ रोजी नव्याने घटना तयार केली असून त्या घटनेस त्यांनी धर्मादाय आयुक्तांची आवश्यक ती मान्यता प्राप्त करुन घेतली आहे. अपिलार्थीने नवीन घटनेच्या प्रतीची मागणी केल्यास ती अपिलार्थीस देण्यास ते तयार आहेत. या प्रकरणी ज्या सचिवांनी शाळेचे संपूर्ण रेकॉर्ड स्वतःकडे ठेवले होते त्यांच्याविरुध्द पोलीसांकडे व धर्मादाय आयुक्ताकडे तक्रारी केल्या आहेत, तथापि अद्यापपावेतो सदर रेकॉर्ड अप्राप्त आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, या संस्थेकडेच मूळात त्यांच्या मूळ स्थापनेच्या सालची घटनेची प्रत उपलब्ध नाही. परंतु नवीन घटनेची प्रत ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. अपिलार्थीस माहिती उपलब्ध न करुन देण्याचे कारण जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे हे पाहता, आता अपिलार्थीस संबंधित संस्थेकडून त्यांच्या मूळ घटनेची प्रत उपलब्ध होऊ शकणार नाही. जर त्यांना नवीन घटनेची प्रत हवी असेल तर त्यांना ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेगळ्या अर्जाव्दारे प्राप्त होऊ शकेल. अशा परिस्थितीत

अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लहु रामभाऊ घुमरे, मु. पो. पारगांव (घु.), तालुका पाटोदा, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पारगांव (मोटे), तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट), तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४९३

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

१ श्री. अमरराजे कदम परमेश्वर, : अपिलार्थी

परमेश्वर वाडा, मु. पो. तालुका तुळजापूर,

जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

उपविभाग, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

विभाग, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाची दखल अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत घेतली नाही, सुनावणीपर्यंत ५६ दिवस होऊनही १४,००० रुपये इतक्या शास्तीची कार्यवाही जन अपिलीय अधिकारी यांनी केली नाही व त्यांना कोठलीच माहिती न देण्यात आल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी चुकीचा निर्णय दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सावरगांव, खडकी तालुका तुळजापूर येथील झालेल्या साठवण तलावासंदर्भात सन २००० ते २००६ या कालावधीशी संबंधित एकूण आठ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी १३-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक १५-०५-२००७ पर्यंत माहिती देण्याचे कबूल केल्याने, अपिलार्थीचे अपील दिनांक २४-०४-२००७ रोजी निकाली काढले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०५-२००७ रोजी काही माहिती दिली, तथापि कसलीच माहिती प्राप्त झाली नाही असे नमूद करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०३-०५-२००७ रोजी काही माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने अर्ज करते वेळी श्री. हाशमी नावाचे उप अभियंता (सध्या उस्मानाबाद येथे कार्यरत) हे कार्यरत होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील

तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस संपूर्ण माहिती देय आहे परंतु अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस त्यांनी पूर्ण माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक ०३-०५-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले आहे की, " संदर्भिय माहिती मुद्दा क्रमांक १ ते ८ अन्वये मागणी केलेली माहिती आपल्या माहिती पत्राअन्वये आपणकडेच असल्याचे दिसून येते " जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अशा प्रकारच्या अभिप्रायाव्दारे काय म्हणावयाचे आहे व त्यांना कोणती माहिती घ्यावयाची आहे याचा आयोगास बोध होत नाही. या पत्राबरोबर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ अंशतः व ७ शी संबंधित माहिती पुरविली आहे. मुद्दा क्रमांक ५ अंशतः मधील खडकी पाझर तलावाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नाही किंवा सुधारित अंदाजपत्रकाची तत्कालीन स्थितीही त्यांनी अपिलार्थीस कळविली नाही. अशा प्रकारे अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, अद्यापही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४, मुद्दा क्रमांक ५ अंशतः, व मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित माहिती दिल्याचे आढळून येत नाही. अशा प्रकारे आजपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती न पुरविल्याने ते अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी हजर नाहीत हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत

होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे कोणतेही समर्थन त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ४, मुद्दा क्रमांक ५ अंशतः (खडकी) व मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ४, मुद्दा क्रमांक ५ अंशतः (खडकी तलावासंदर्भातील) व मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याप्रीत्यर्थ त्यांनी लावलेल्या विलंबाबद्दल त्यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अमरराजे कदम परमेश्वर, परमेश्वर वाडा, मु. पो. तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४९५

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

१ श्री. प्रशांत नानासाहेब पंडित, : अपिलार्थी
व्दारा, पंडित जॉबवर्क सेंटर, कोर्टाशेजारी, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, वर्ग-१
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिली, तथापि ही माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व तत्कालीन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती, स्वरुप व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेली माहिती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रशांत नानासाहेब पंडित, व्दारा, पंडित जॉबवर्क सेंटर, कोर्टाशेजारी, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, वर्ग-१ उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४९६

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

१ श्री. प्रशांत नानासाहेब पंडित, : अपिलार्थी
व्दारा, पंडित जॉबवर्क सेंटर, कोर्टाशेजारी, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, वर्ग-१
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना चुकीची व अपूर्ण माहिती पुरवून, माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने व अपिलार्थीस कोणताच निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०८-२००७ ते २१-०९-२००७ या कालावधीशी संबंधित - "दिनांक २८-०८-२००७ ते २१-०९-२००७ पर्यंत दुय्यम निबंधक कार्यालय भूम येथे नोंदणी झालेल्या दस्तऐवजाची सूची क्रमांक २ च्या सहीसूद नकला मिळाव्या " - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटी प्रत्येक सूची क्रमांक २ च्या नकलेसाठी रुपये वीस या प्रमाणे त्यांच्या कार्यालयात फी जमा करण्याचे व तसेच प्रत्येक सूची क्रमांक २ च्या नकलेसाठी वीस रुपये कोर्ट तिकीट सदर अर्जासोबत सादर करण्याचे त्यांना सूचित केले. याच पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीचा नकला मागणी अर्ज मुदतीत प्राप्त झाला नाही तर त्यांचा माहितीसाठीचा अर्ज निकाली काढण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली व त्यांना अपेक्षित असलेली मूळ अर्जातील माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली. अपिलार्थी यांनी आपले म्हणणे लेखी स्वरुपात आयोगास सादर केले असून, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी

जाणुनबुजून दिशाभूल करणारी माहिती देऊन, माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० च्या तरतुदीअन्वये व जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास पाठीशी घालून दिशाभूल केल्यामुळे त्यांना दंडात्मक कारवाई करण्याची विनंती केली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे दस्तऐवजाच्या सूची क्रमांक २ च्या सहीसूद प्रमाणित नकला मागितल्या होत्या. त्यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित नकला करुन घेण्याची एक निश्चित अशी कार्यपध्दती प्रचलीत आहे. त्या पध्दतीने, ज्या व्यक्तीला दस्तऐवजाच्या प्रमाणित नकला आवश्यक आहेत त्या व्यक्तीने एका विशिष्ट पध्दतीने व विशिष्ट स्वरुपात त्यांच्याकडे अर्ज केला पाहिजे, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी त्यांच्या कार्यालयाकडे अर्ज करण्यास व त्यांच्या कार्यालयाने निश्चित केलेले शुल्क भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयातील दस्तऐवजाच्या प्रमाणित नकला मागितल्या होत्या. येथे असे नमूद करण्यात येते की, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे कोणतीही उपलब्ध माहिती जर संबंधित प्राधिकरणाकडे आधीच छापील स्वरुपात उपलब्ध असेल तर ही माहिती त्या त्या विभागाने निश्चित केलेले शुल्क आकारुन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त करुन घेणे हे अर्जदारास अनुज्ञेय आहे. याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या अर्जाव्दारेच अर्जदाराने अपेक्षित मागणी करणे, हे अर्जदारास अनिवार्य नाही, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विभागाने निश्चित केलेले शुल्क आकारुन जन माहिती अधिकारी यांना देता आली असती, तथापि त्यांनी त्यांच्या विभागाने निश्चित केलेल्या विहित प्रपत्रामध्ये अपिलार्थीस अर्ज

करण्याचे सूचित केले, ही त्यांची कृती चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास सार्वजनिक प्राधिकरणाकडून छापील माहिती मागता येते. आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती देण्याचे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा करणारे पत्र अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पाठविले होते, मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देतांना घेतलेली भूमिका, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. यावरुन ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतूपूरस्सर टाळाटाळ केली असे म्हणता येणार नाही. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोग पारित करीत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रशांत नानासाहेब पंडित, व्दारा, पंडित जॉबवर्क सेंटर, कोर्टाशेजारी, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, वर्ग-१ उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४९७

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

१ श्री. दीपक पिराजी सातोरे, : अपिलार्थी

रा. पक्कीचाळ, शाळा मैदानासमोर,

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (पुरवठा),

तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर,

जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर,

तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे काही माहिती मागविली होती. परंतु सदर माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील

अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगास सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २०००-०१ ते ३०-११-२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सर्व किरकोळ रॉकेल हॉकर्स व स्वस्त धान्य दुकानदार यांच्या रॉकेल विक्री रजिस्टर, स्टॉक रजिस्टर व डायरी यांच्या सत्यप्रतीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नसल्याने त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधित किरकोळ रॉकेल हॉकर्स व स्वस्त धान्य दुकानदार यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०३-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, सुनावणीच्या दिवशी अपिलार्थीस सर्व संबंधितांकडून माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीने सदर माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे व प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ०१-०३-२००८ रोजी लिहून दिले. तथापि यापुर्वीच अपिलार्थीने दिनांक २८-०२-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील सादर केले होते.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सहज उपलब्ध नव्हती. त्यांना ही माहिती संबंधित दुकानदारां-कडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावयाची होती, त्याचबरोबर अपिलार्थीस ही

माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०२-२००८ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक ०१-०३-२००८ रोजी प्राप्त झाली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अर्जदारास देणे अनिवार्य आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी विशेष प्रयत्न करुन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ०३-०६-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दीपक पिराजी सातोरे, रा. पक्कीचाळ, शाळा मैदानासमोर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४९८

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मिर्झा रहेमतउल्लाबेग पिता पीरबेग,<br>रा. खुबा कॉलनी, अर्धापूर, तालुका अर्धापूर,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर,<br>जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर,<br>तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी या अर्जामध्ये असेही नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २९-१०-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १९-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये

९७५८ इतके  शासकीय कोषागारात भरणा करण्याचे सूचित केले व कोषागाराचे चलन संबंधित अर्धघाऊक विक्रेत्यांना दाखवून त्यांच्याकडून परस्पर माहिती घेण्याचे सूचित केले.  तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षित असल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास ही चूक लक्षात आणून दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-११-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस परत संबंधित अर्धधाऊक विक्रेत्याकडून परस्पर माहिती घेण्याचे सूचित केले.  त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावर सुनावणी घेऊन त्यांचा कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्धापूर येथील अर्धघाऊक विक्रेते यांचे साठा रजिस्टर व व्हिजीटबुकची झेरॉक्स प्रत दिनांक ०१-०१-२००० ते ३१-१०-२००७ या कालावधीशी संबंधित, अर्धापूर येथील अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांना शासनाकडून मिळालेल्या केरोसीन टँकरची नोंद असलेले टँकर पोच पावती बुकाची जानेवारी २००० ते ३१-१२-२००५ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे चुकीचा प्रतिसाद दिला त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. मात्र अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही अथवा कोणताही निर्णय पारित न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज तहसीलदार, अर्धापूर यांच्याकडे न आल्याने त्यांनी विहित कालावधीत सुनावणी घेतली नाही. अपिलार्थीच्या अपील अर्जावर श्री. वडदकर तहसीलदार यांनी दिनांक १४-०३-२००८ रोजी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना सुनावणीसाठी बोलाविण्याचे अभिप्राय त्या अर्जावर दिले आहेत. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. एल. भुताळे व सहायक जन माहिती अधिकारी श्री. व्ही. टी. भालेराव यांनी तहसीलदार यांच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊ शकली नाही. जन अपिलीय अधिकारी यांचा हा युक्तिवाद, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घ्यावी व त्यावर आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झ ााल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २८-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला

व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घ्यावी व त्यावर आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मिर्झा रहेमतउल्लाबेग पिता पीरबेग, रा. खुबा कॉलनी, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४९९

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

१ श्री. धर्मेंद्र गिरमाजी धुतमल, : अपिलार्थी

रा. प्रभातनगर, नागसेन हायस्कूल जवळ,

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

कार्यालय जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

कार्यालय जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : क्रीडा उपसंचालक, लातूर विभाग, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना वेळेत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधितांनी कोणताही निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जिल्हा क्रीडा अधिकारी या कार्यालयाचे माहिती अधिकारी हे स्वत: जिल्हा क्रीडा अधिकारी असून, उपसंचालक, क्रीडा, लातूर यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली गेली आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असे नमूद केले की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे काही माहिती मागविली होती व यासंदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे प्रथम अपील केले आहे हे त्यांना आयोगाची सुनावणीची नोटीस प्राप्त झाली त्यावेळी प्रथमत: ज्ञात झाले. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व तदनंतरचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे आज रोजी प्राप्त नाही. यासंदर्भात त्यांनी आपल्या कार्यालयातील सर्व अभिलेख्यांची कसून तपासणी केली असता देखील हे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत, त्यामुळे त्यांना माहिती पुरविता आली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करतांना त्यांच्या मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. या प्रतीवर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणाच्याही कार्यालयातील लिपिकाची सही व शिक्का आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीने

आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील अर्ज केल्यासंदर्भात इतर कोणताही पुरावा त्यांनी व्दितीय अपील अर्जासोबत जोडला नाही. तसेच आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या सर्व बाबी विशेषतः जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहिला असता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. धर्मेंद्र गिरमाजी धुतमल, रा. प्रभातनगर, नागसेन हायस्कूल जवळ, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा क्रीडा उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५००

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

१ श्रीमती सुर्यवंशी ज्योती गंगाराम, अपिलार्थी
व्दारा, गोरे गोपाळ मारोतीराव,
सौदर्या ब्युटी पार्लर, भवानी चौक, महाकाली मंदिराजवळ,
मु. पो. तालुका उमरी, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),
जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २७-०५-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक ती माहिती दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्या पत्राव्दारे प्राप्त झाली असल्याने त्यांच्या व्दितीय अपील अर्जावरील सुनावणी रद्द करावी अशी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची केलेली विनंती आयोग मान्य करीत असून अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ५००/२००८, दिनांक २२-०२-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती सुर्यवंशी ज्योती गंगाराम, व्दारा, गोरे गोपाळ मारोतीराव, सौदर्या ब्युटी पार्लर, भवानी चौक, महाकाली मंदिराजवळ, मु. पो. तालुका उमरी, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५०१

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

१ श्री. सिक्कलवार दिपक रामराव, अपिलार्थी

रा. पो. सरस्वती विद्यामंदिर, बसस्टॅण्ड जवळ, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (पुरवठा),

तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट,

जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ३०-०५-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक ती माहिती नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांनी दिली असल्याने त्यांचा विचाराधीन अपील अर्ज दिनांक ०५-०२-२००८ निकाली काढण्यात यावा अशी आयोगाकडे विनंती केली आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती मिळाली असल्याने व खुद्द अपिलार्थीने त्यांचे अपील

निकाली काढण्याची आयोगास विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ५०१/२००८, दिनांक ११-०२-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सिक्कलवार दिपक रामराव, रा. पो. सरस्वती विद्यामंदिर, बसस्टॅण्ड जवळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५०२

निर्णय दिनांक ०३-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार,<br>रा. पो. सरस्वती विद्यामंदिर परिसर,<br>हनुमान मंदिराजवळ, किनवट, तालुका किनवट,<br>जिल्हा नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>नांदेड | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडोली, तालुका किनवट, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांचे प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी फेटाळल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सदरचे अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत वडोली येथे सन २००६-०७ सालाच्या दरम्यान झालेले हरियाली कामे व पाणलोट कामे यासंदर्भात एका मुद्दयावर व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित दुस-या मुद्दयावर अशी सन २००६-०७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी हा अर्ज त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडोली, तालुका किनवट यांच्याकडे पाठविला. तदनंतर ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडोली, तालुका किनवट यांनी त्यांच्या दिनांक १६-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वन विभागाशी संबंधित असल्याने सदर माहिती वन विभागाकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. मात्र उर्वरित माहितीबाबत कोणतेही भाष्य या पत्रामध्ये संबंधित ग्रामसेवकाने केले नाही. पूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना उद्देशून दिनांक ०८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे यासंदर्भात गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी या प्रकरणी निर्णय घेतल्याचे कळविले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जाबरोबरच गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे देखील दिनांक १२-११-२००७ रोजी प्रथम अपील अर्ज केला होता. या अपील अर्जावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी दिनांक २६-११-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयामध्ये त्यांनी ग्रामसेवक, वडोली यांना वन विभागाकडून माहिती घेऊन ती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत पुरविण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस संबंधित माहिती दिनांक २२-१०-२००७ रोजी अपिलार्थीकडून २० रुपये शुल्क प्राप्त करुन घेऊन पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात संबंधित प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज न करता पंचायत समितीच्या गट विकास अधिका-याकडे दोन मुद्दयावर माहिती मागविली होती. त्यापैकी एक मुद्दयावरील माहिती ही वन विभागाशी संबंधित आहे, त्यामुळे गट विकास अधिका-याने अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार, वन विभागाच्या माहिती अधिका-याकडे, हा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत हस्तांतरीत करणे व त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. मात्र त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही,

आणि उलट त्यांनी हा अर्ज संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाकडे दिनांक २०-१०-२००७ रोजी म्हणजेच नऊ दिवसाच्या विलंबाने पाठविला. आज रोजी अपिलार्थीस वन विभागाकडून दिनांक २६-१२-२००७ रोजी व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून दिनांक २२-१०-२००७ रोजी माहिती मिळाल्याचे दिसून येते. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीचे पृष्ठ आठ असून या खेरीज त्यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी प्रतिपृष्ठ रुपये दहा या प्रमाणे ७० रुपये इतके शुल्क अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी आकारले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देतांना आकारावयाच्या शुल्कासंदर्भात राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११-१०-२००५ रोजी अधिसूचना क्रमांक आर. टी आय. २००५/सी.आर.३१५/०५/५ नुसार त्यातील कलम ४ (१) (a) (b) नुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देतांना प्रतिपृष्ठ रुपये दोन इतके शुल्क आकारण्याचे आदेशित केले आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ रुपये दहा इतके अवाजवी शुल्क आकारल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. सबब आता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी अपिलार्थीकडून जादा घेतलेले शुल्क (रुपये ७० वजा माहितीचे शुल्क रुपये १६) रुपये ५४ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांच्याकडील माहिती पुरविल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोच असलेली कागदपत्रे आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस पूर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. सबब अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी अपिलार्थीकडून भरुन घेतलेले जादाचे शुल्क रुपये ५४ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	०३-०६-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार, रा. पो. सरस्वती विद्यामंदिर परिसर, हनुमान मंदिरजवळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२	जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडोली, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४६७
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

१. श्री. बाळासाहेब भ.मोटे, : अपिलार्थी
रा. भूम,ता. भूम, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
दुय्यम निबंधक, भूम,जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,
वर्ग-१ (नि.श्रे.), उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. किसन संतराम गायकवाड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे दि.२७.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून केलेले व नोंदणी उपमहानिरीक्षक कार्यालयाकडून दि. १७.०१.२००८ रोजी आयोगास प्राप्त झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने एकाच विषयावर दोन स्वतंत्र व एकसारखीच द्वितीय अपिले, राज्य माहिती आयोग व नोंदणी महानिरीक्षक यांच्याकडे केली असून, यापैकी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावर सुनावणी होऊन दि.१३.०१.२००९ रोजी आयोगाचे आदेश पारित केले गेले आहेत. आता अपिलार्थीचे नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडून प्राप्त झ ालेले तेच अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. एकदा आयोगाने या अपील अर्जावर निर्णय दिल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर परत नव्याने निर्णय देणे, आयोगास उचित

वाटत नसल्याने अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ४६७/२००८, दि.१७.०१.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब भ.मोटे,रा. भूम,ता. भूम, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, भूम,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१ (नि.श्रे.), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४६८
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

१. श्री. प्रशांत नानासाहेब पंडित, : अपिलार्थी
ता.भूम, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
दुय्यम निबंधक श्रेणी-१,
भूम, जि.उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक तथा
मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१,
जि.उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण १० मुद्यांद्वारे सन २००० ते २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २४.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. या माहितीमध्ये अपिलार्थीस ज्या मुद्यांसंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतींची आवश्यकता आहे, त्या प्रतीसंदर्भात अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्याचे त्यांनी सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

दि. ०५.१२.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व तत्कालीन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपला युक्तिवाद आयोगाकडे लेखी स्वरुपात सादर केला असून, या युक्तिवादामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षिलेली माहिती विनामूल्य मिळण्याची मागणी कायम ठेवली असून संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जास्तीत जास्त दंडाची कारवाई करुन शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ती सशुल्क पुरविण्यास तयार आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करुन घेऊन त्यांच्या कार्यालयाचा शिपाई दि. २८.११.२००७ पासून सतत चार दिवस अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर गेला होता, तथापि अपिलार्थी हे त्यांनी दिलेल्या पत्त्यावर आढळून न आल्याने त्यांनी दि. ०४.१२.२००७ रोजी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे माहिती पाठविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०१.११.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही त्यातील मुद्दा क्र.९ वगळता, अपिलार्थीस देय होत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नोंदणीकृत टपालाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे दि. २४.११.२००७ रोजीचे पत्र, प्रथमतः त्यांच्या

कार्यालयाच्या शिपायामार्फत अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर पाठविले. तथापि सतत ४ दिवस जाऊनही त्यांच्या कार्यालयातील शिपायास अपिलार्थी हे दिलेल्या पत्त्यावर पत्र प्राप्त करुन घेण्यासाठी उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त होऊ शकली नाही. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, अर्जदाराने माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती ज्या पध्दतीने (उदा.साध्या टपालाने/नोंदणीकृत टपालाने/व्यक्तीशः) मागितली आहे, त्याच पध्दतीने ती अर्जदारास देणे हे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे.या प्रकरणात विहित मुदतीत माहिती तयार करुनही त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातील शिपायाद्वारे पाठविण्याचा खटाटोप केला.सदर शिपाई अपिलार्थीकडे माहिती घेऊन गेले असता, अपिलार्थी माहिती घेण्यासाठी उपलब्ध झाले नाहीत.या घटनेपृष्ठयर्थ पंचनामा केला गेला नाही, त्यामुळे केवळ शिपाई म्हणतात म्हणून अपिलार्थी माहिती घेण्यासाठी त्यांनी दिलेल्या पत्त्यावर उपलब्ध नव्हते, हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद आयोग सबळ पुराव्याअभावी अमान्य करीत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम प्रतिसादाचे दि. २४.११.२००७ रोजीचे पत्र जर रजिस्टर्ड टपालाद्वारे अपिलार्थीस पाठविले असते तर अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क न भरल्याने अपिलार्थीस माहिती पुरविली नाही, हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद आयोगास मान्य करता आला असता, परंतु या प्रकरणी मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने ज्या माध्यमाद्वारे माहिती मागितली आहे, त्या माध्यमाद्वारे ती न देता दुसऱ्या माध्यमाद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केला असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देणे भाग आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ द्वारे अपिलार्थीने मुंबई मुद्रांक अधिनियम १९६८ च्या संदर्भात माहिती मागविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले आहे की, मूळात अशाप्रकारचा कोणताही नियम अस्तित्त्वात नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस या मुद्यावर माहिती देताना,"मुंबई मुद्रांक अधिनियम १९६८ कायदा लागू नाही" अशी माहिती अपिलार्थीस पुरविली आहे, ही माहिती

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी थोडी विसंगत असल्याचे आयोगास आढळले आहे. सबब या निर्णयामध्ये सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मुद्दा क्र.५ च्या संदर्भात माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी दुरुस्ती करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना सात दिवसांच्या आत देण्याचे कबूल केले आहे.सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती या निर्णयामध्ये सूचित केल्याप्रमाणे दुरुस्ती करुन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने आज रोजी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये आयोगाकडे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची व शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करण्याची विनंती केली आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, विचाराधीन प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतूतः टाळाटाळ केली असल्याचे किंवा अपिलार्थीपासून कोणत्याही असद्‌हेतूने माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांचे वर्तन आयोगास आक्षेपार्ह आढळले आहे. उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०५.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. सबब नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाची नोंद त्यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, निर्णयामध्ये नमूद केलेल्या दुरुस्त्यांसह त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रशांत नानासाहेब पंडित,द्वारा, पंडित जॉब वर्क सेंटर, कोर्टाशेजारी,भूम,ता.भूम, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१,भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत,तळमजला,कौन्सिल हॉलसमोर,पुणे-१ यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४६९
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

१. श्री. राजेंद्र बळीराम उबाळे, : अपिलार्थी
उमरगा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
विशेष प्रकल्प विभाग,उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प
मंडळ,औरंगाबाद.

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
विशेष प्रकल्प विभाग,उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
विशेष प्रकल्प विभाग,उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.२७.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना संपूर्ण माहिती न दिल्याने त्यांनी माहिती अधिकाराचा व पर्यायाने देशाचा अपमान केला आहे. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, जन माहिती अधिकारी व कर वसूली करणारे संबंधित हे संगनमताने भ्रष्टाचार करीत आहेत, यात शंका नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे राज्य महामार्ग क्र.९ वरील उमरगा येणेगुर या भागातील टोल नाक्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, - "सदर करारनामा किती वर्षांचा व कोणत्या वर्षापासून कोणत्या वर्षापर्यंत अस्तित्त्वात आहे"- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार (दिनांकाचा उल्लेख नसलेले) प्रथम अपील (दि. २२.१०.२००७ रोजी प्राप्त) केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याचे आढळून येत नाही, मात्र यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस दि.२४.१०.२००७ व २६.११.२००७ रोजी अपिलार्थीशी पत्रव्यवहार केला आणि पत्रव्यवहाराद्वारे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या असल्याचे नमूद केले आहे. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने,अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर असून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे कोणतेही लेखी निवेदन सादर केलेले नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि.०६.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला असून हा

प्रतिसाद अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीमध्ये विहित केलेल्या मुदतीत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी पूर्णपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र बळीराम उबाळे, काळा मठ,पतंगे रोड,उमरगा, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७०
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे, : अपिलार्थी
रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय पोलीस अधिकारी,
तुळजापूर,जि.उस्मानाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक,उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी योग्य वेळीच माहिती न दिल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर सुनावणी न घेतल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थी ते प्रथमतः त्यांच्या दि. १७.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दि. १८.०७.२००७ रोजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८.०७.२००७ रोजी प्राप्त झालेल्या प्रतीवर, जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात एकूण ६ मुद्याद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या दि. १८.०७.२००७ रोजीच्या पत्राची प्रत जिल्हा

पोलीस अधीक्षक यांच्याकडे पाठवून दिली असल्याचे कळविले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जिल्हा पोलीस अधीक्षक,उस्मानाबाद यांच्याकडे दि. १४.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांनी दि. १८.०२.२००८ रोजी आपले आदेश पारित केले व अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. मात्र अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय प्राप्त न झाल्याने, त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या दि.१७.११.२००७ रोजीच्या अर्जावर त्यांनी योग्य ती कार्यवाही केली असून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने, त्यांनी अपिलार्थीच्या अर्जातील दि. १८.०७.२००७ रोजीच्या संदर्भिय अर्जाची प्रत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने, अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या दि. १७.११.२००७ रोजीच्या अर्जाची झेरॉक्स प्रत पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्याकडील दि. २७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पाठविल्याचे व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत आहे

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात केलेल्या कृतीशी पूर्णतया विसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे त्यांनी मुख्य सचिवांना उद्देशून लिहिलेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात काही मुद्यांवर माहिती मागविली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी

अशाप्रकारे अपिलार्थीस माहिती न देता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्या ज्या अर्जाचा संदर्भ दिला आहे, त्या अर्जाची प्रत पोलीस अधीक्षक यांच्याकडे पाठविली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून आज रोजी सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती द्यावयाची आहे, हे आयोगातर्फे त्यांना स्पष्ट करण्यात आले असून त्यांनी ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून टाळल्याचे कोणतेही कारण आयोगास दिसून आले नाही. तसेच या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून माहिती दुष्ट हेतूने दडविली असल्याचे आयोगास आढळून येत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील मजकुराचा वेगळा अर्थ लावून अनावश्यक कार्यवाही केली, असे आयोगास दिसून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जाचा त्यांनी सखोल विचार करुन त्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दि. १४.१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी दि. १८.०२.२००८ रोजी आपला निर्णय पारित केला आहे. मात्र हा निर्णय त्यांनी अपिलार्थीस पाठविला किंवा कसे, हे कळण्यास आयोगास मार्ग नाही, सबब जिल्हा पोलीस अधीक्षक यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. १४.०१.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. १८.०२.२००८ रोजी

घेतलेल्या निर्णयाची प्रत त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे,राजे संभाजीनगर (प.),तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,तुळजापूर जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७१
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अरुण गोरोबा माने,<br>उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद,उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक,<br>लातूर. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व शिक्षण उपसंचालक, लातूर यांनी दि. २२.०१.२००८ रोजी अपिलार्थीस दिशाभूल करणारी व अपूर्ण माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,- "अध्यक्ष,उस्मानाबाद जिल्हा मागासवर्गीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांनी जा.क्र.२०९/२००७ दि. २०.०६.२००७ रोजी दिलेल्या निवेदनावर आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची सत्यप्रत मिळावी."- अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज निकाली काढला.तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०८.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) नुसार प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०१.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०४.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले.तथापि अर्धवट व सदोष माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. ०४.०८.२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाने दि. २०.०६.२००७ रोजी दिलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जामध्ये उल्लेख केलेल्या,शिक्षण संचालक यांना उद्देशून लिहिलेल्या दि. २०.०६.२००७ रोजीच्या अर्जाचे अवलोकन करता, अध्यक्ष, उस्मानाबाद जिल्हा मागासवर्गीय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संघटना, उस्मानाबाद यांनी शिक्षण संचालक यांच्याकडे

श्रीमती सत्यभामा शिंदे विद्यालय, देवळाली, ता.जि.उस्मानाबाद या शाळेतील मुख्याध्यापकाविरुध्द तक्रार केली असून, जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द कारवाईची अपेक्षा केली आहे, असे दिसून येते. हा तक्रार अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी संबंधित मुख्याध्यापकाकडे यासंदर्भात खुलासा मागविला व संबंधिताकडून प्राप्त झालेल्या खुलाशाची प्रत अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असे अवगत केले की, अपिलार्थीच्या शिक्षण संचालक यांना उद्देशून त्यांनी पाठविलेल्या दि. २०.०६.२००७ रोजीच्या अर्जावर त्यांनी संबंधित मुख्याध्यापकाचे स्पष्टीकरण मागविले व त्या स्पष्टीकरणाची प्रत अपिलार्थीस दिली. या व्यतिरिक्त त्यांनी इतर कोणत्याही प्राधिकरणाशी पत्रव्यवहार केलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तीवादाचे खंडन करण्यासाठी आणि अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी कशी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत किंवा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीविषयी कोणताही पत्रव्यवहार आयोगास लेखी स्वरुपात केलेला नाही, अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दि. २०.०६.२००७ रोजीच्या निवेदनाच्या संदर्भाने त्यांनी इतर प्राधिकरणाकडे किंवा अधिकाऱ्याकडे दि. १८.०७.२००७ पर्यंतच्या केलेल्या पत्रव्यवहाराच्या इतर काही प्रती जर त्यांच्याकडे उपलब्ध असतील तर त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण गोरोबा माने,मु.पो.अनसुर्डा, ता.जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७२
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, ता.पूर्णा जि.परभणी. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,पूर्णा, जि.परभणी. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही अद्यापपावेतो त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,एप्रिल २००७ ते जून २००७ या कालावधीतील मौ. ताडकळस येथील अधिकृत रॉकेल विक्रेत्यांसंदर्भात एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "मौजे ताडकळस येथील रॉकेल हॉकर्स, रॉकेल विक्री करणारे रेशन दुकानदारांची संख्या, त्यांची नावासह यादी व त्यांना मिळणारा दरमहा कोटा, हॉकर्स व रेशन दुकानदार यांचेकडील कार्डधारकांची संख्या,कार्डधारकास दरमहा मिळणाऱ्या रॉकेलची माहिती, किरकोळ रॉकेलचा भाव व प्रत्येक किरकोळ रॉकेल विक्रेत्याच्या माहे एप्रिल २००७ ते

जून २००७  या कालावधीत वाटप केलेल्या रॉकेलच्या पावतीबुकच्या व रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती "- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०९.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४०/- इतक्या रकमेचा भरणा चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने हे शुल्क चलनाद्वारे दि. २४.०९.२००७ रोजी भरले. तथापि शुल्क भरुनही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २२.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.११.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही पूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने  त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस मुद्यांच्या अनुक्रमानुसार दि. ३०.११.२००७, १५.०२.२००८ व ०४.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अशाप्रकारे वेगवेगळया टप्प्यात दिली आहे. अपिलार्थीने सदर माहिती त्यांना मिळाल्यापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या पोचसहयांच्या पत्रांच्या प्रती त्यांनी आयोगास दाखविल्या आहेत. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी  संपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत आहे.

तथापि या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.०८.२००७ रोजी माहिती मागितली असता,अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क कळविणारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले पत्र व प्रत्यक्षात अपिलार्थीने शुल्क भरणा केल्याची तारीख यामधील फरक लक्षात घेता, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उशिरात उशिरा दि. १०.१०.२००७ रोजी मिळणे आवश्यक होते.तथापि या प्रकरणी अपिलार्थीस मुद्दा क्र. १ ची दि.३०.११.२००७ रोजी, मुद्दा क्र.२ ची दि.०४.०३.२००८ रोजी व मुद्दा क्र.३ ची दि.०४.१२.२००७ रोजी म्हणजेच अपिलार्थीने आयोगाकडे अपील केल्यानंतर प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे दिनांक विचारात घेता, असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील कोणत्याही मुद्यावर दि. १०.१०.२००७ रोजी अगर तत्पूर्वी माहिती प्राप्त झालेली नाही.अपिलार्थीस संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि.०४.०३.२००८ रोजी म्हणजेच त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती प्राप्त होण्याचा दिनांक व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा दिनांक पाहता, या प्रकरणी असे सिध्द होत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील विहित मुदतीपेक्षा विलंबाने व सशुल्क माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता वर नमूद केलेला विलंब लक्षात घेता, अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.४०/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे आता नियत वयोमानानुसार शासकीय प्राधिकरणाच्या सेवेतून सेवानिवृत्त झाले असल्याने या प्रकरणी त्यांचेवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ४०/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे,शिवाजी रोड,मुळे गल्ली,पूर्णा,ता.पूर्णा जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,पूर्णा,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७३
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

१. श्री. मोतीराम गयबु काळे, : अपिलार्थी
ता. लोहा, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, लोहा,
जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, लोहा, जि.नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पूर्णतः पुरविल्याचे आयोगास अवगत केले, यासंदर्भात अपिलार्थीची माहिती मिळाल्याची पोचपावती त्यांनी आयोगास सादर केली आहे.अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक ९.२.२००८ रोजीच्या पत्रावर, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २२.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झाल्याचे व सदर माहितीने त्यांचे समाधान झाल्याचे अभिप्राय नोंदविले आहेत. हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून

पूर्णतः माहिती प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लागल्याचे त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दि. ०९.०२.२००८ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांचे हे समर्थन आयोग मान्य करीत असून अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ४७३/२००८, दि. ११.०२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबु काळे,मु.जानापुरी,पो.वडेपुरी,ता. लोहा, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, लोहा,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७४
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

१. श्री. राजरत्न भिमराव गायकवाड, : अपिलार्थी
मु.पो.ता.कंधार,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद उपविभाग कंधार, जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद
(बांधकाम), दक्षिण विभाग,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणत्याही विशिष्ट स्वरुपाची विनंती आयोगाकडे केल्याचे आढळून येत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित मार्च, २००५ ते ऑगस्ट, २००७ या कालावधीतील विस्तृत स्वरुपाची व व्यापक व्याप्तीची माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. तसेच अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत,त्या संदर्भातील वैयक्तिक पुरावा त्यांच्याकडे मागितला. यावर अपिलार्थीने दि. १८.१०.२००७ रोजी सदर पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अंतिम सुनावणी दि. १४.०१.२००८ रोजी घेतली, त्यावेळी माहिती अधिकाऱ्याने, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे नमूद करुन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देऊ केली. तथापि या माहितीचा स्वीकार न करता अपिलार्थीने माहिती मिळण्यासाठी विलंब झाल्याचे कारण दर्शवून माहिती घेण्याचे नाकारले व जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली. जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती न स्वीकारल्याने, तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०२.२००८ रोजी त्यांचे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः होऊन कधीही प्रयत्न केला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते दि. १८.१०.२००७ रोजीच्या व्यतिरिक्त माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीची व त्यांची भेट दि. १८.१०.२००७ नंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०१.२००८ रोजी सुनावणीच्या वेळी झाली असता, त्यांनी अपिलार्थीस माहिती देऊ केली,

तथापि अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार आहे व ते ती अपिलार्थीस देण्यासाठी ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील बहुतांशी सर्व माहिती मागविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी व स्वरुप पाहता, ही माहिती निश्चितपणे मोठया स्वरुपाची व व्यापक व्याप्तीची असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा कोणताही पुरावा जोडला नाही. सदर पुरावा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८.१०.२००७ रोजी प्रथम सादर केला. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची तारीख दि. १८.१०.२००७ हीच मानण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०१.२००८ रोजी तयार करुन ठेवली होती. तथापि माहिती देण्यास विलंब लावल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने या माहितीचा स्वीकार केला नाही. यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये कोणतेही स्वारस्य असावे, असे आयोगास वाटत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यापक व्याप्ती असलेल्या माहितीची मागणी करणे व ही माहिती एका महिन्याच्या मुदतीनंतर पुरविली गेल्यास, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आग्रही मागणी करणे, असे प्रकार आयोगाच्या निदर्शनास आता वारंवार येऊ लागले आहेत. अशा प्रकरणांमध्ये अपिलार्थी, त्यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही स्वारस्य नसताना जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आग्रही मागणी ते वारंवार करीत असतात. या प्रकरणी देखील अशाच प्रकाराची मागणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी केली होती असे जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १४.०१.२००८ रोजीच्या सुनावणीच्या दि. २१.०१.२००८ रोजी दिलेल्या निर्णयावरुन आढळून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची कोणतीही मागणी केलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे व ते ही माहिती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. मात्र अपिलार्थी, ही माहिती स्वीकारण्यास नकार देत आहेत, या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार केल्यास अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजरत्न भिमराव गायकवाड,द्वारा नामदेव ढवळे यांचे निवास,तहसील कार्यालयासमोर,सुमेधनगर,कंधार, ता.कंधार,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद उपविभाग कंधार, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद (बांधकाम), दक्षिण विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७५
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

१. श्री. सय्यद नुरअली सय्यद बाखरअली, : अपिलार्थी
अर्धापूर, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,मुदखेड,
जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,मुदखेड,
जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०१.२००८ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०१.२००५ ते ३१.१२.२००५ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रामधील मुदखेड शहर व तालुक्यामधील केरोसिन विक्रेत्यांसंबंधी,- "किती किरकोळ परवानाधारक,हॉकर्स यांची तपासणी करण्यात आली, तपासणीत दोषी आढळलेल्या किती

किरकोळ व हॉकर्स परवानाधारकांच्या विरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आणि त्याचप्रमाणे किती हॉकर्स व किरकोळ परवानाधकांवर जीवनावश्यक वस्तु कायदा,१९५५ चे कलम ३९७ नुसार कारवाई करण्यात आली, या चौकशीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी तपासणी केलेल्या किरकोळ हॉकर्स आणि अर्धघाऊक विक्रेता यांच्या तपासणी फॉर्मच्या झेरॉक्स प्रती" - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०१.२००८ रोजी आपला निर्णय पारित करुन अपिलार्थीस एका आठवडयाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी ,जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे व त्याचबरोबर त्यांनी आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार माहे डिसेंबर, २००८ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देणे अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार त्यांना अनिवार्य आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस माहिती न दिल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. व्ही.डी.जोशी (से.नि.) हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस नि:संशयपणे पात्र ठरत आहेत, मात्र आता ते सहा महिन्यापूर्वीच शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद नुरअली सय्यद बाखरअली,रा.कुबा कॉलनी,अर्धापूर,जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७६
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

१. श्री. अशोक मारोती बच्चेवार, रा.मुखेड,जि.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,मुखेड, जि.नांदेड. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,मुखेड,जि.नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,मुखेड, जि.नांदेड.

त्रयस्थ पक्ष : श्री. संजय नारायण कुंठेवाड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी फेटाळून लावल्याचे नमूद करुन, संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याचे व खातेनिहाय चौकशीचे व जनतेच्या व प्रशासनाच्या वेळेस महत्त्व देण्याबाबत आदेश व्हावेत, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दि. १४.०९.२००७ ते १५.१२.२००७ या कालावधीतील रॉकेल पुरवठयाविषयी व श्री. संजय नारायण कुंठेवाड यांनी वेळोवेळी केलेल्या

अर्जाचे संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या दि. १४.०९.२००७, १२.११.२००७,०७.१२.२००७ व २९.११.२००७ रोजींच्या अर्जावर व श्री. संजय नारायण कुंठेवाड यांनी दि. २६.११.२००७ रोजी दिलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीच्या सत्यप्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २६.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दुसऱ्या अर्जासंदर्भात दिली असल्याने, आता अपिलार्थीच्या दि. १२.०१.२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात पुन्हा वेगळयाने माहिती देण्याची आवश्यकता त्यांना वाटत नसल्याचे नमूद केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांचे अपील योग्य नसल्याने, ते दाखल करुन घेण्याजोगे नसल्याचे अभिप्राय व्यक्त करुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सरळ निर्णय देण्याचे अप्रत्यक्षपणे नाकारले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने, त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील विनंतीप्रमाणे आयोगासमोर युक्तिवाद केला व त्यांनी माहिती अधिकाऱ्याकडे

वेळोवेळी केलेल्या अर्जांच्या संदर्भात वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यास चौकशी करण्याचे आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात आयोगास सादर केला असून यामध्ये असे नमूद केले आहे की, "श्री. अशोक मारोती बच्चेवार हे राजकीय पक्षाशी संबंधित असून ते स्वतः केरोसीन परवानाधारक असून ते नेहमीच केरोसीन वितरणाबाबत इतर किरकोळ परवानाधारकांच्या तक्रारी करीत असतात, याबाबत संबंधिताला लेखी कळवूनही ते कोणतेच लेखी पुरावे सादर करीत नाहीत, ज्यामुळे प्रामुख्याने तपासपूर्ण होत नाही. अर्धघाऊक यांच्या केरोसीनच्या ऑन घेणेबाबत तक्रारदार श्री. अशोक मारोती बच्चेवार स्वतः हेच मुखेड शहरातील किरकोळ केरोसीन विक्रेते आहेत. स्वतः ऑन देतात किंवा नाही याची जबानीसुध्दा यांनी यापूर्वी दिलेली नाही, म्हणून श्री. बच्चेवार याचा तक्रारी अर्ज देणे ही नेहमीचीच सवय झाली आहे."

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये निर्देशित केलेल्या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली, याची माहिती अपिलार्थीस अपेक्षित आहे. तथापि प्रथम जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास, त्यांनी यापूर्वीच माहिती दिली असल्याने आता अपिलार्थीस परत वेगळी माहिती देण्याची आवश्यकता वाटत नाही, असे उर्मट उत्तर दिले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या चारित्र्याचा कोणताही विचार न करता, अधिनियमातील कलम ७ नुसार विहित मुदतीत प्रतिसाद देणे अपेक्षित आहे. यावेळी अर्जास माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांना आवश्यक वाटत असो अगर नसो, याचा कोणताही प्रश्न येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २६.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद हा पूर्णतया अवैध व गैर असल्याचे सिध्द होत आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही ठोस असा निर्णय दिलेला नाही. अशाप्रकारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती

केवळ जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या नकारात्मक भूमिकेमुळे अपिलार्थीस प्राप्त झाली नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी केलेल्या संदर्भिय तक्रारींवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही व अपिलार्थीच्या वरील तक्रार अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी विविध प्राधिकरणाशी अथवा व्यक्तींशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व तक्रारीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावर संबंधितांनी दिलेल्या अभिप्रायाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी विहीत मुदतीत देणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वर स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी चुकीचा प्रतिसाद देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी सिध्द होत असल्याने जिल्हाधिकारी, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक मारोती बच्चेवार,रा.तगलाईन गल्ली, मुखेड,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४७७
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

१. श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे, : अपिलार्थी
रा.बिलोली,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद उपविभाग बिलोली,
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग),
जिल्हा परिषद,नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी विहित केलेल्या प्रपत्रात त्यांना माहिती देण्यास विलंब लावल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या उपविभागामार्फत पंचायत समिती, बिलोली कार्यालयाच्या इमारतीच्या आधुनिकीकरणाच्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "पंचायत समिती,बिलोली कार्यालय या इमारतीच्या आधुनिकीकरणासाठी एकूण तरतुद किती, कोणत्या योजनेतून काम सुरु आहे, काम कोणत्या एजन्सीमार्फत सुरु आहे, त्या योजनेचे नाव, एजन्सीचे नाव, पत्ता, अंदाजपत्रकाची सत्यप्रत,कामाची निविदा प्रसिध्दीस दिलेल्या

वर्तमानपत्राची सत्यप्रत, काम सुरु झाल्याचा व करारनाम्याचा नंबर व दिनांक, कामाची कालमर्यादा, अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा खर्च कमी अधिक झाला का, झाल्यास किती, सदरील कामाचे देयक अदा झाले आहे काय?" - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तयार असल्याचे कळविले व त्यांच्या कार्यालयातून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने अशाप्रकारची कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.०४.०७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०९.२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर अपील निकाली काढताना जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असूनही अपिलार्थी हे ती माहिती उपलब्ध करुन घेत नसल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे दिसून येते. मध्यंतरीच्या काळात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५२/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे दि. १२.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढण्याच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार असून केवळ अपिलार्थीने माहितीपोटीच्या आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे माहितीची मागणी केली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.१४.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे व ती माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार त्यांना अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास, सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा संपूर्ण तपशील कळविणे त्यांना भाग आहे. तथापि या प्रकरणी अशाप्रकारची कार्यवाही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेली नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी प्रथमतः त्यांच्या दि. १२.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर कळविले असल्याने व अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागवूनही त्यांना व्यक्तिशः माहिती देण्याचा विनाकारण प्रयत्न केला, त्यामुळे आता अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य देय होत आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यास कोणत्याही असद्हेतूने नाकारल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे,रा.क्रांती निवास, बिलोली,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद उपविभाग बिलोली,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग),जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७१६
निर्णय दिनांक ०४-०६-२००९

१. श्री. धोंडीराम हणमंतराव नळेगावे, : अपिलार्थी
रा.संगाचीवाडी पो. शेळगाव, ता.चाकूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,चाकूर, जि.लातूर.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, चाकूर,
जि.लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : तलाठी,सजा शेळगाव,
ता. चाकूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी : मंडळ अधिकारी, चाकूर,
जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.१६.०३.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी तथा तलाठी, शेळगाव यांच्या कार्यपध्दतीवर गंभीर स्वरुपाचे अभिप्राय नोंदविले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.११.२००६ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २०.११.२००६ रोजी प्राप्त झाला, त्याअन्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने हा अर्ज तहसीलदार, चाकूर यांना उद्देशून केला होता, तथापि या प्रकरणी तलाठी हे माहिती अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थीचा

हा माहितीसाठीचा अर्ज दि.२०.११.२००६ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित तलाठी यांच्याकडे पाठवून दिला. यानंतर संबंधित तलाठयाने अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १४.१२.२००६ रोजी पंचांसमक्ष अपिलार्थीस माहिती पुरविली. अपिलार्थीस माहिती पुरविताना संबंधित तलाठयाने दि. १४.१२.२००६ रोजी पंचांच्या समक्ष अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य दिली असल्याचे नमूद केले आहे. ही माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीची सही असलेली कागदपत्रे संबंधित मंडळ अधिकारी यांनी आयोगास दाखविली. तथापि माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने परत तहसीलदार यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज त्यांनी तहसीलदार यांना रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्यापृष्ठ्यर्थ त्यांनी आयोगास रजिस्टर्ड पोस्टाच्या पावतीची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच तहसीलदार,चाकूर जि.लातूर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असून त्यांनी आपला युक्तिवाद आयोगाकडे लेखी स्वरुपात सादर केला असून, या युक्तिवादामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचा पुनरुच्चार केला असून, संबंधितांवर दंड आकारण्यात यावा, अशी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, आज रोजीच्या आयोगाकडील सुनावणीसाठी त्यांनी अपिलार्थीस औरंगाबाद येथे हजर राहण्याचे सांगितले असता अपिलार्थी श्री. धोंडीराम नळेगावे हे बोलण्याच्या अवस्थेत नव्हते व त्यावेळी त्यांनी मद्य प्राशन

केले होते. अपिलार्थीस त्यांनी दि. १४.१२.२००६ रोजी गावातील पाच पंचांसमक्ष ९४ पृष्ठांची माहिती विनामूल्य पुरविली आहे व माहिती मिळाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थी यांची सही घेतली आहे, या संदर्भातील योग्य तो पुरावा उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविला. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात दि. ०३.०६.२००९ रोजी हजर राहिले असता त्यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिले त्यांचे दि. ०३.०६.२००९ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांना दिले असून त्यामध्ये अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने कबूल करुन त्यांचा आयोगाकडील अर्ज निकाली काढण्याची विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, दि.१४.१२.२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचा पुरावा आयोगासमोर आहे तसेच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ०३.०६.२००९ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले आहे त्याचे अवलोकन करता, अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात, तहसीलदार, चाकूर यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, राज्य शासनाच्या महसूल विभागामध्ये काही प्रकरणाच्या माहितीकरिता तलाठी यांची माहिती अधिकारी व मंडळ अधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे.जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमामध्ये ज्या दर्जाचे निर्णय अपेक्षित आहेत, ते पाहता अपिलार्थीच्या अशाप्रकारच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्याकरिता किमान नायब तहसीलदार दर्जाचा अधिकारी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमण्यात यावा, अशी आयोगातर्फे सचिव (महसूल) यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. धोंडीराम हणमंतराव नळेगावे,रा.संगाचीवाडी पो. शेळगाव, ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी,सजा शेळगाव,ता. चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), मंत्रालय,मुंबई-३२ यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५२७

निर्णय दिनांक ०५-०६-२००९

१ श्री. अभय अनंतराव मांजरमकर, : अपिलार्थी
भावसिंगपुरा रोड, प्लॉट नं. २३, संगीता कॉलनी, नंदनवन
कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्राचार्य, एम. आय. टी. अभियांत्रिकी महाविद्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्राचार्य, एम. आय. टी अभियांत्रिकी महाविद्यालय,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : जनरल सेक्रेटरी, ग्रामोद्योगिक शिक्षण मंडळ, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. एम. एम. देशपांडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, संबंधित संस्था माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - " श्री मिलिंद मनोहरराव देशपांडे हे आपल्या कॉलेजमध्ये असिस्टंट प्रोफेसर म्हणून कार्यरत होते, त्यांची अपॉईटमेंट लेटरची छायांकीत प्रत द्यावी " - अशी माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे सर्वजण हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे त्यांनी लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून या युक्तिवादामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी अर्ज करुन एक वर्ष सात महिन्याच्या कालावधीमध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद देण्यात आलेला नाही. त्यामुळे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तुरंत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे व या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना २५००० रुपये इतका दंड आकारण्यात यावा.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर करण्यात आला असून या युक्तिवादामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांची संस्था ग्रामोद्योगिक शिक्षण मंडळ औरंगाबाद तर्फे चालविण्यात येते. ही संस्था मुंबई

ट्रस्ट ॲक्ट १९५० मधील तरतुदीनुसार नोंदणी क्रमांक एफ- ४२९, दिनांक १३-०३-१९७६ आणि सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० मधील तरतुदीनुसार एजीडी-२/७६ या क्रमांकाने नोंदणीकृत झाली आहे. त्यांच्या संस्थेस शासनाकडून संचालक तांत्रिक शिक्षण यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या आदेशानुसार, त्यांनी एम. आय. टी. या महाविद्यालयाकरिता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुका देखील केलेल्या आहेत. त्यांच्या संस्थेस शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नसून त्यांची संस्था पूर्णतः खाजगी स्वरुपाची आहे. ही संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याशी संलग्नीत असून या संस्थेस All India council for Technical Education, New Delhi यांची मान्यता आहे. खाजगी ट्रस्ट संदर्भात मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी दिनांक २८-०४-२००९ रोजी दिलेल्या निर्णयाकडे त्यांनी या निवेदनामध्ये आयोगाचे लक्ष वेधले असून, ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण म्हणून संबोधता येणार नाही अशा अर्थाचे निवेदन आयोगास दिले आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत करुन दिले आहे की, खाजगी विना अनुदानित संस्थांच्या असोसिएशनतर्फे माहिती अधिकार कायदा या संस्थांना लागू न करण्याबाबत त्यांच्या सोसायटीच्या एका सदस्याने मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे एक अपील केले असून सदर अपिलाचा अद्याप-पावेतो निर्णय झालेला नाही, या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळावे अशी विनंती या निवेदनामध्ये अखेरीस केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या महाविद्यालयाकडे माहितीची मागणी केली आहे त्या महाविद्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही, नाकारली नाही अथवा ही माहिती पुरविण्यासाठी लागणारे शुल्क देखील अपिलार्थीस कळविले नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन अपिलार्थीच्या अपील अर्जाकडे दुर्लक्ष केले आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा वरील युक्तिवाद ज्यामध्ये मूळात माहिती अधिकार

अधिनियम २००५ हा त्यांना लागू होत नाही, यापृष्ठ्यर्थ त्यांनी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या दिनांक २८-०४-२००९ च्या ज्या निर्णयाचा आधार घेतला आहे, त्या निर्णयाचे अवलोकन करता असे निदर्शनास आले की, ते प्रकरण श्री. गोविंद रामानंद समर्थ सद्‌गुरु प्रल्हाद महाराज संस्थान, जिल्हा बुलढाणा यांच्याशी संबंधीत आहे. सदर संस्थेवर राज्य शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याचा आधार घेऊन व इतर मुद्दयांचा परामर्श घेऊन मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने हा निर्णय दिलेला आहे. सदर निर्णय या प्रकरणी लागू होणार नाही, कारण अपिलार्थीने मागितलेली माहिती मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या निर्णयात स्पष्ट केल्यानुसार पब्लिक ट्रस्टकडून मागविली नसून, शासनाचे नियंत्रण असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून मागविली आहे, ते महाविद्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नीत आहे जे एक स्वतंत्र शासकीय प्राधिकरण आहे. तसेच या महाविद्यालयाचा कारभार हा संचालक तंत्रशिक्षण यांनी दिलेल्या सूचनेनुसार चालत असतो. या महाविद्यालयास ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्नीकल एज्युकेशन, जे एक स्वतंत्र प्राधिकरण आहे, त्यांच्याकडून मान्यता प्राप्त झाली आहे हे पाहता, हे महाविद्यालय तंत्रशिक्षण विभाग, विद्यापिठ या इतर सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली असल्याचे दिसून येत आहे. अधिनियमातील कलम २ (च) मध्ये " माहिती " या शब्दाच्या व्याख्येचा अर्थ पुरेपूर प्रमाणात स्पष्ट केला आहे. या अर्थामध्ये पुढीलप्रमाणे माहिती या शब्दाचा अर्थ दिलेला आहे. " ..... आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशा कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो, " हे पाहता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीनुसार सुसंगत असल्याचे दिसून येते व तसेच ही माहिती संबंधित महाविद्यालयाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांना देखील मिळविता येण्यासारखी असल्याने ही माहिती प्राचार्य, एम. आय. टी. अभियांत्रिकी महाविद्यालय यांनी अपिलार्थीस पुरविण्यास कोणतीही हरकत नसावी. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे

मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद

दिनांक ०५-०६-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अभय अनंतराव मांजरमकर, भावसिंगपुरा रोड, प्लॉट नं. २३, संगीता कॉलनी, नंदनवन कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, एम. आय. टी. अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी, ग्रामोद्योगिक शिक्षण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : प्राचार्य, एम. आय. टी. अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद)

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५२८

निर्णय दिनांक ०५-०६-२००९

१ श्री. अभय अनंतराव मांजरमकर, : अपिलार्थी

भावसिंगपुरा रोड, प्लॉट नं. २३, संगीता कॉलनी, नंदनवन कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उपायुक्त (प्रशासन), औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी माहिती देण्यासाठी टाळाटाळ करत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद करुन या अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे अर्ज क्रमांक ३७७६ नुसार मनपा शाळेतील केंद्रनिहाय विद्यार्थ्यांची सन २००६-०७ या कालावधीशी संबंधित माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १४१० इतके त्यांच्याकडील लेखा विभागात भरण्याचे व तदनंतर माहिती प्राप्त करुन घेण्याचे त्यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीने यापूर्वीच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती न मिळाल्याने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०३-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक ०६-०५-२००८ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक ०९-०५-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली, तथापि या टप्प्यावर देखील अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील सुनावणीपूर्वीच वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केले, तथापि ही माहिती विलंबाने प्राप्त झाली असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस आता जन माहिती

अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर मान्य केले आहे, मात्र ही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने दिल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करावी असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-११-२००७ रोजीच्या त्यांच्या अर्जाव्दारे काही माहिती मागविली होती. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास दिनांक १६-१२-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे अभिप्रेत होते, मात्र हा प्रतिसाद त्यांनी १२ दिवस इतक्या विलंबाने देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, अपिलार्थीस शुल्क कळविण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर १२ दिवसांनी कळविले, त्यामुळे अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य माहिती पुरविणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य होते व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिली आहे. उपरोक्त प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी स्पष्ट असतांना तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०३-२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळेस ८ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रथम अपील अर्जावरील आदेश प्राप्त होण्याची वाट पाहून तदनंतर ही माहिती पुरविली. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीस पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अभय अनंतराव मांजरमकर, भावसिंगपुरा रोड, प्लॉट नं. २३, संगीता कॉलनी, नंदनवन कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन), औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५२९

निर्णय दिनांक ०५-०६-२००९

१ श्री. मोतीराम गयबू काळे, अपिलार्थी
मु. जानापुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहा,
तालुका लोहा, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास
यंत्रणा, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १७-०६-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास ते त्यांचे दिनांक ०७-०२-२००८ रोजीचे व्दितीय अपील मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. खुद्द अपिलार्थीने

राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे व्दितीय अपील मागे घेतले असल्याने विचाराधीन सदर अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ५२९/२००८, दिनांक ०७-०२-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५३०

निर्णय दिनांक ०५-०६-२००९

१ श्री. सिताराम सी. तुपे, : अपिलार्थी
जे. ई. एस. कॉलेज रोड, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने सदर अपील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयात चालू असलेल्या कॅबीनच्या दुरुस्ती कामाचे कार्यारंभ आदेश, प्रशासकीय मान्यतेच्या प्रती व ज्या एजन्सीला काम देण्यात आले त्या एजन्सीचे नाव, ही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-११-२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस दिनांक ०१-१२-२००७ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आवश्यक असल्याच्या त्यांच्या मागणीचा पुनरुच्चार केला.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस, अपिलार्थीस माहिती न पुरविण्याबाबतची कोणतीही कारणे अथवा त्यांच्या कृतीपृष्ठ्यर्थ कोणतेही समर्थन आयोगासमोर, त्यांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेपूर संधी देऊनही, करता आले नाही. त्यांनी आयोगास अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची प्रत दाखविली व ती अपिलार्थीस आयोगासमक्ष दिली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत सोपे व व्याप्ती मर्यादित होती. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चालू असलेल्या कामासंदर्भात माहिती मागितली होती. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कळविणे त्यांना भाग होते, तथापि मूळात अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन

माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रथमतः मूळात प्रतिसादच दिला नाही. अपिलार्थीने प्रथम अर्ज करतेवेळी त्यांनी अर्जामध्ये नमूद केलेली कामे त्यांच्या कार्यालयात चालू होती किंवा कसे या मुद्दयावर देखील जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कोणत्याही प्रकारे अवगत केलेले नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली आहे, त्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने संदर्भित केलेल्या कामाचे कार्यारंभ आदेश जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २९-१०-२००७ रोजीचे, म्हणजेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जानंतरचे आहेत. यावरुन असे सिध्द होत आहे की, जर अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली कामे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात खरोखरच त्यावेळी झालेली असतील तर जन माहिती अधिकारी यांनी आधी काम व त्यानंतर कार्यारंभ आदेश अशा प्रकारची विसंगत कार्यवाही अवलंबिली असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास मूळात कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-११-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस दिनांक ०१-१२-२००७ पूर्वी माहिती देण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रदीर्घ कालावधीनंतर आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे समर्थन जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर, त्यांना पुरेपूर संधी देऊनही करु शकले नाहीत हे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करणे इष्ट राहील, या निर्णयाप्रत आयोग आला आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त

न झाल्यास, अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर माहिती दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी एकूण २५,००० रुपये इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होतच तीस दिवसाच्या आत सरळ सादर करावा.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सिताराम सी. तुपे, जे. ई. एस. कॉलेज रोड, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५३१

निर्णय दिनांक ०५-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विश्वनाथ बाबुराव भायेकर,<br>नेहरु रोड, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने विचाराधीन अपील त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही, माहिती प्राप्त न झाल्याने केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च २००७ ते दिनांक १०-१०-२००७ या कालावधीशी संबंधित, ग्राहक

जागृती अनुदान व त्या अंतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांबाबत एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मार्च २००७ मध्ये शासनाकडून ग्राहक जागृतीसाठी प्राप्त झालेले अनुदान, त्यामधील खर्च व शिल्लक, ग्राहक जागृतीच्या कार्यक्रमाची आकडेवारी व खर्चाच्या पावत्या आणि अनुदान शिल्लक असल्यास त्याचा विनियोग कसा व कधी करणार - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमा-व्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०१-२००८ रोजी आदेश पारित करुन या आदेशाव्दारे अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आता माहिती प्राप्त झाली असल्याचे नमूद केले, मात्र प्राप्त माहिती ही चुकीची असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे त्यांना उपलब्ध अभिलेख्यावरुन आढळून येत नाही. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्यांनी आता अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २६-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे

आवश्यक ती माहिती पुरविली असून अपिलार्थीने ज्या कालावधीशी संबंधित माहिती मागितली आहे त्या कालावधीमधील माहिती निरंक आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे निदर्शनास येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या तीन मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून भविष्यकाळातील माहिती मागविली आहे व ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. त्यामुळे आजमितीस देखील अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुद्दयावर कोणतीही माहिती देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे अपिलार्थीने शासनाकडून ग्राहक जागृतीकरिता किती अनुदान प्राप्त झाले यासंदर्भात माहिती विचारली आहे. यासंदर्भात अपिलार्थीने शासनाच्या क्रमांक विसउस/का.४(अर्थ)/२००६-०७/ ग्राहक जागृती अनुदान/६४९, दिनांक ०६-०३-२००७ रोजीच्या आदेशाची प्रत आयोगास सादर केली असून त्यावरुन असे दिसून येते की, या आदेशाव्दारे शासनाने बीड जिल्ह्याकरिता एकूण १,४५,००० रुपये इतके अनुदान मंजूर केले होते व या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांना सदर अनुदानाची रक्कम कोषागार कार्यालयातून आहरीत करुन खर्च करण्यासाठी प्राधिकृत केले होते. तथापि जिल्हाधिकारी, बीड यांनी अशा प्रकारची कोणतीही रक्कम शासकीय कोषागार कार्यालयातून आहरीत केली नाही व कोणताही खर्च केलेला नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, ग्राहक जागृतीचा कार्यक्रम हा तालुका स्तरावर घेतला जातो, त्यामुळे तालुका स्तरावर झालेल्या खर्चाच्या पावत्या त्यांच्याकडे उपलब्ध नसतात. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, जर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संबंधित मुद्दा त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित तहसीलदाराकडे पाठवून

अपिलार्थीस त्यांच्याकडून माहिती घेण्यासाठी अधिनियमातील कलम ६ (३) (क) प्रमाणे सूचित करणे आवश्यक होते. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठविणे अभिप्रेत असतांना जिल्हा पुरवठा अधिका-यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केलेली नाही. त्यामुळे आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती देण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व जन माहिती अधिकारी यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०५-२००९ रोजी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने त्यांना चुकीची माहिती मिळाली या त्यांच्या युक्तिवादामध्ये तथ्यांश असल्याचे आयोगास आढळून येत आहे. या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती स्पष्ट स्वरुपात दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या कोणत्या मुद्दयावर माहिती देणे अपेक्षित आहे याचे मार्गदर्शन करण्यात आले. त्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाप्रमाणे त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक तीन वगळता उर्वरित मुद्दयांवरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी मूळात कोणताही प्रतिसाद न दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना अपिलार्थीस १५ दिवसाचे आत माहिती देण्याचे आदेशित करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती न देण्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या कृतीचे कोणतेही समर्थन मूळात अस्तित्वात असू शकत नाही, अशी आयोगाची खात्री झाली आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची कोणतीही दखल न घेऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या

कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक तीन वगळता उर्वरित मुद्दयांवरील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विश्वनाथ बाबुराव भायेकर, नेहरु रोड, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५३२

निर्णय दिनांक ०५-०६-२००९

१ श्री. मोतीराम गयबू काळे, अपिलार्थी
मु. जानापुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा,
तालुका लोहा, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. शरद नागनाथ रुद्रकुंठवार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-११-२००७ रोजीच्या त्यांच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली त्याची माहिती मागविली होती. तसेच कार्यवाही केली नसल्यास ती का करण्यात आली नाही याबाबतची सविस्तर माहिती देखील या अर्जाव्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), लोहा, श्री. एन. जी. झंपलवाड हे आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास आज सादर केली असून या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या अर्जावर त्रयस्थ श्री. शरद नागनाथ रुद्रकुठंवार यांची चौकशी करुन त्यांना लेखी समज दिली असल्याचे नमूद केले आहे. आज रोजी केवळ अपिलार्थीने " सदर परवानाधारकाची माझ्या समक्ष चौकशी केली. चौकशीत माझे समाधान झाले व मला माहिती मिळाली " असे अभिप्राय दिले आहेत. सदर अभिप्राय अपिलार्थीने दिनांक २८-०२-२००८ रोजी दिल्याचे आढळून येत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीस या अपिलासंदर्भात आवश्यक ती माहिती त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर त्यांना माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५३३

निर्णय दिनांक ०५-०६-२००९

१ श्री. बाबु नामदेव गबाळे, : अपिलार्थी
रा. भवानीनगर, कंधार, तालुका कंधार,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार,
तालुका कंधार, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार,
तालुका कंधार, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार,
तालुका कंधार, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही अथवा कोणताही निर्णय दिला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनधिकृत

अकृषिक वापराबाबत एकूण २३ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे व ती नियमाप्रमाणे फी भरुन प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले व तसेच दिनांक २८-११-२००७ रोजी त्यांच्या कार्यक्षेत्रातील मंडळ अधिकारी, कंधार व तलाठी सजा कंधार यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मागवून घेतली. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे निर्णय दिला नाही. तथापि तदनंतर अपिलार्थीस त्यांनी दिनांक १९-१२-२००७ रोजी काही माहिती पुरविली, मात्र प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक १९-१२-२००७ रोजी माहितीपोटीचे शुल्क रुपये १२ इतके स्वीकारुन त्यांना देण्यात आली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी प्रथमतः असे निदशर्नास येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विस्तृत व्याप्ती असलेली माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७, १६, २२ या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण ही माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या

निर्णयाबाबतची कारणे, खुलासे व स्पष्टीकरणे विचारणे आणि अर्जदाराने विचारल्याप्रमाणे अशा प्रकारचे खुलासे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहितीद्वारे करणे हे मूळात माहिती अधिकार अधिनियमातील " माहिती देणे " या प्रक्रियेत अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ७, १६ व २२ या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने या अर्जातील मुद्दा क्रमांक २३ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विशिष्ट स्वरुपाच्या माहितीची मागणी न करता अकृषिक वापराशी संबंधित असलेली उर्वरित माहिती व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे त्याचा स्पष्ट बोध होत नाही. सबब, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ ते ५ पर्यंतची संपूर्ण माहिती दिली आहे. मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भातील माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही, ती माहिती तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे. वास्तविक अशा वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जाची प्रत तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडे पाठवून त्यांच्या या पत्राची प्रत अपिलार्थीस, अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून, पाच दिवसाच्या आत पाठविणे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे गरजेचे होते. या मुद्दयासंदर्भात आयोगास असेही आढळले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये माहितीशी संबंधित कालावधीचा कोणतीही उल्लेख केलेला नाही, त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती अधिनियमातील तरतुर्दीशी सुसंगत आहे. त्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे व ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले

आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ८, ते १५ व १७ ते १९ या मुद्यांवरील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-१२-२००७ रोजी त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क आकारुनही त्यांना अपूर्ण माहिती दिली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये बारा इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये बारा इतके त्यांना याच कालावधीत परत करावे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबु नामदेव गबाळे, रा. भवानीनगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५३४

निर्णय दिनांक   ०५-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. स. कदीर स. सेफ,<br>बार्शी रोड, पाटोदा, तालुका पाटोदा,<br>जिल्हा बीड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, महात्मा फुले माध्यमिक व उच्च<br>माध्यमिक विद्यालय, पारगांव (मोटे), तालुका वाशी,<br>जिल्हा उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सचिव, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट),<br>तालुका जिल्हा बीड | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०६-०९-२००७ रोजीच्या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती न पुरविल्यामुळे व त्यांनी दिनांक १३-११-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट), तालुका जिल्हा बीड यांच्याकडे प्रथम अपील केले होते,

तथापि या अपिलावर सुनावणी न झाल्याने व अपील निकाली न काढल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संस्थेच्या सचिवाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक १३-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. आता शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/ केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले असल्याने, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे, व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. स. कदीर स. सेफ, बार्शी रोड, पाटोदा, तालुका पाटोदा, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पारगांव (मोटे), तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट), तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना, अपिलार्थीच्या दिनांक १३/११/२००७ रोजीच्या प्रथम अपील

अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५३५

निर्णय दिनांक ०५-०६-२००९

१ श्री. दिलीप रामचंद्र माने, : अपिलार्थी
व्दारा, दै. लोकप्रश्न, १६ जलतरणिका, नेहरु रोड,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी,
तालुका जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी, तालुका जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी, तालुका जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - परभणी शहरातील २००६ ते २००७ या कालावधीतील बी. पी. एल., अंत्योदय व अन्नपूर्णा योजनेचे लाभार्थी धान्य व केरोसीन वाटप रजिस्टरच्या प्रती व या योजनेअंतर्गत दरमहा एकूण किती धान्य वाटप केले जाते, बी. पी. एल., अंत्योदय योजनांच्या लाभार्थ्यांची संख्या, स्वस्त धान्य दुकानदारांची नांवे व त्यांच्या दुकानाचे ठिकाण - या मुद्दयावरील माहिती अपेक्षिली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दिली व अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे ती संबंधित दुकानदारांकडून मागविण्यात आली असल्याचे अपिलार्थीस कळविले आणि अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक पाचच्या संदर्भात अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये चार इतक्या रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले. मात्र जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३/११/२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील जिल्हाधिकारी परभणी यांना केले होते. त्यांनी त्यांच्या दिनांक २२/११/०७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलाथीस राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने निर्णयाच्या सुरवातीच्या परिच्छेदामध्ये नोंदविलेले द्वितिय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक पाचच्या संदर्भात अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये चार इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले असता त्यांनी आजतागायत या शुल्काचा भरणा न केल्याने त्यांना या मुद्दयावरील माहिती पुरविता आली नाही. ही माहिती त्यांच्याकडे आजही उपलब्ध असून ती कधीही सशुल्क पुरविण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित पाच मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक १ व २ हे जन माहिती अधिकारी यांच्याशी सरळ संबंधित नाहीत. या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असत नाही. ही माहिती संबंधित दुकानदाराकडे जतन करुन ठेवली जाते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी संबंधित दुकानदारांवर अवलंबून राहावे लागते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना दिली आहे व मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहितीसाठी अपिलार्थीस चार रुपये इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे त्यांनी विहित मुदतीत सूचित केले आहे. परंतु अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केलेला नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस आवश्यक असलेली मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती संबंधित दुकानदाराकडून घेऊन ती अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे हे पाहता, असे सूचविण्यात येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात तपासणीसाठी एक निश्चित वेळ आगाऊ ठरवावी व त्या

तारखेस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जन माहिती अधिकारी यांनी संबंधित दुकानदारांना बोलावून घेऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दाखवून त्यापैकी आवश्यक त्या माहितीच्या प्रती अपिलार्थीने त्यांच्या स्वखर्चाने काढून घ्याव्यात. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे चार रुपये इतके शुल्क भरताच त्यांना उपलब्ध करुन द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या सहमतीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती त्यांना संबंधित दुकानदार व अपिलार्थी यांना पूर्वनियोजित वेळी एकत्र बोलावून वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीप रामचंद्र माने, व्दारा, दै. लोकप्रश्न, १६ जलतरणिका, नेहरु रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी, तालुका जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी, तालुका जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५३६

निर्णय दिनांक ०५-०६-२००९

१ श्री. मोहंमद अन्वरउल्लाह खान पिता बरकतउल्लाह खान, : अपिलार्थी
९-४-४५५, कय्यूम प्लॉट्स,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक वनसंरक्षक (जंकासस), किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या संदर्भात काही माहिती मागितली असता त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६०२० /- इतके जिल्हा कोषागारात भरण्याचे सूचित केले. परंतु या पत्रासोबत आवश्यक तो जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा सही शिक्का असलेला चलन फॉर्म जोडला नाही. त्यामुळे जिल्हा कोषागार कार्यालयाच्या संबंधित लिपिकाने अपिलार्थीचे

शुल्क स्वीकारण्यास नकार दिला, त्यामुळे त्यांनी दिनांक २४-१०-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांना चलन तयार करुन देण्याविषयी पत्र लिहिले. परंतु विहित कालावधीमध्ये त्यांनी अशा प्रकारचे चलन तयार करुन दिले नाही. यासंदर्भात त्यांनी दिनांक २७-११-२००७ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्या अपील अर्जावर दिनांक १०-१२-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नोव्हेबर २००६ ते जुलै २००७ या कालावधी-तील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामाची यादी व मस्टरच्या प्रतीची माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती. अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १७-१०-२००७ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६०२० इतके बँकेत चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्राबरोबर चलनाची प्रत तयार करुन दिली नव्हती. त्यामुळे हे शुल्क भरण्यासाठी अपिलार्थी हे शासकीय कोषागारात गेले असता आवश्यक त्या चलनाअभावी कोषागाराने शुल्क स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे अपिलार्थीने परत जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाचा शिक्का व त्यांची सही असलेले चलन तयार करुन ते अपिलार्थीस पाठविण्याचे सूचित केले. याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-११-२००७ रोजी आवश्यक ते चलन तयार करुन पाठविले, तथापि अपिलार्थीस या चलनाची प्रत न मिळाल्यामुळे ते आवश्यक त्या शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात करु शकले नाहीत व त्यांनी

अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-१२-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा चलनाव्दारे करुन ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, एका दुस-या प्रकरणात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविता असता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त न झाल्याने पुन्हा नव्याने प्रथम अर्ज करण्याचे सूचित केले होते. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने जरी अर्ज केला होता तरी अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही, हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य केला होता. मात्र आता विचाराधीन अपील प्रकरणी जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने जे पत्र पाठविले ते ग्राह्य धरुन अपिलार्थीस सशुल्क माहिती प्राप्त करुन घेण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचे वर्तन अशा प्रकारे विसंगतीपूर्ण असल्याचे अपिलार्थी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त होण्याचे आदेश आयोगाने पारित करावेत अशी त्यांनी विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस कळविले व तदनंतर अपिलार्थीस त्यांच्या विनंतीप्रमाणे चलन तयार करुन त्यांनी दिनांक १३-११-२००७ रोजी अंडर

सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने ते पत्र अपिलार्थीस पाठविले होते. त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने दिनांक १३-११-२००७ रोजी पत्र पाठविल्याचा आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस सशुल्क पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक १७-१०-२००७ रोजी प्राप्त झाला. जन माहिती अधिकारी यांनी त्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला आणि अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक १३-११-२००७ रोजी आवश्यक ते चलन तयार करुन पाठविल्याचा सबळ पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांचे हे पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही, त्यामुळे त्यांनी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे चलनाव्दारे केला नाही. येथे असे नमूद करण्यात येते की, अपिलार्थीस जर त्यांनी मागितलेल्या माहितीची आवश्यकता होती तर त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे बँकेच्या डिमांड ड्राफ्टव्दारे ते या शुल्काचा भरणा करु शकले असते. तथापि हा पर्याय अपिलार्थीने निवडला नाही. अपिलार्थीस चलन पाठविल्याचा सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला असल्याने, अपिलार्थीचा, सदर पत्र त्यांना प्राप्त झाले नाही हा युक्तिवाद, आयोग अमान्य करीत आहे. येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या वर्तनाविषयी विसंगती आयोगाच्या निदर्शनास आणली आहे. तथापि अपिलार्थीच्या या युक्तिवादावरुन या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी मुद्दामहोऊन अपिलार्थीच्या विरुध्द निर्णय दिला हे अपिलार्थीचे म्हणणे आयोगास मान्य करता येणार नाही. कारण प्रत्येक अपिलीय अधिका-याने प्रत्येक अपिलावर दिलेले वेगवेगळे निर्णय हे त्या त्या वेळेच्या परिस्थितीनुरुप व उपलब्ध कागदपत्राधारे दिलेले असतात.

अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे आजही माहिती तयार आहे. त्यामुळे अपिलार्थीस या माहितीची आजही आवश्यकता असेल तर आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे चलनाव्दारे भरुन ही माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्याने ते स्वतःच जबाबदार असल्याचे दिसून येत आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहंमद अन्वरउल्लाह खान पिता बरकतउल्लाह खान, ९-४-४५५, कय्यूम प्लॉट्स, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकासस), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५३८

निर्णय दिनांक ०५-०६-२००९

१ श्री. साईनाथ हनमंतराव भंडारवार, : अपिलार्थी
मु. पो. डोंगरगाव, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी जाणुनबुजून नाकारल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - मौजे डोंगरगाव तालुका किनवट येथील रॉकेल दुकानाकरिता एकूण किती हजार लिटर रॉकेल साठा येतो आणि तो जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दुकानदारास किती किंमतीत दिला जातो. या दुकानदारांनी लाभार्थ्यांना किती किंमतीत दिला पाहिजे व लाभार्थ्यांची नांवासहीत यादी - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः मागितली होती व मागितलेल्या कालावधीचा सन २००७ पर्यंत असा उल्लेख केला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०१-२००८ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि अपिलार्थीस यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाकडून लेखी व तसेच दिनांक ०२-०६-२००९ रोजी सायंकाळी ०४-५० वाजता दूरध्वनीव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. धनतोडे, अव्वल कारकून

यांच्यामार्फत निर्देश देऊनही जन माहिती अधिकारी अथवा जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित व स्वरुप अत्यंत सरळ असे होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनाक १७-०१-२००८ रोजीच्या आदेशाचे देखील त्यांनी या प्रकरणी पालन केल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस केवळ अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीतच नव्हे तर अपिलीय अधिका-याने निर्णय देऊनही न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब सचिव (महसूल) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. साईनाथ हनमंतराव भंडारवार, मु. पो. डोंगरगाव, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५१५
निर्णय दिनांक ०६-०६-२००९

१ श्री. नंदकुमार आसाराम उढाण, : अपिलार्थी
ता.अंबड,जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपील सुनावणीच्या वेळी विहित कालावधी उलटूनही जन माहिती अधिकारी यांना दंडासह माहिती देण्याचा आदेश देण्यास जन अपिलीय अधिकारी यांनी इन्कार केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००६ ते डिसेंबर, २००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे- "जननी सुरक्षा योजनेअंतर्गत २००६ ते डिसेंबर २००७ अखेर अंबड-घनसावंगी तालुक्यात किती गरोदर मातांना लाभ देण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र नावासह व उपकेंद्र देखभाल दुरुस्तीसाठी सन २००६ ते २००७ अखेर किती निधी देण्यात आला व उपकेंद्र बळकटीकरण या

योजनेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असलेल्या उपकेंद्रास किती निधी देण्यात आला"- ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षतः ताब्यात नसल्याने त्यांनी ही माहिती त्यांच्याकडील दि. ३१.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे तालुका आरोग्य अधिकारी, अंबड व घनसावंगी यांच्याकडून मागविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १७.०३.२००८ रोजी पारित केले व अपिलार्थीस पाच दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांचा अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय होण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०६.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे प्रत्यक्षतः उपलब्ध नव्हती. त्यांना ही माहिती, अंबड व घनसावंगी या दोन तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडून प्रथमतः प्राप्त करुन घेऊन तदनंतर ती अपिलार्थीस देणे भाग होते. त्यामुळे त्यांनी प्रथमतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून मागविली. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली नाही. संबंधित तालुका वैद्यकीय अधिकारी, अंबड यांनी त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी,जालना यांना दि.१५.०२.२००८ व तालुका वैद्यकीय अधिकारी, घनसावंगी यांनी त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती दि. २५.०१.२००८ रोजी पाठविली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम

अपील अर्जावर घेतलेल्या दि.१८.०२.२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळी, त्यांच्याकडे उपलब्ध होती व त्यांनी ती अपिलार्थीस विनामूल्य देऊ केली असता, अपिलार्थीने प्रथमतः ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले व त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविण्याची विनंती केली. तदनंतर अपिलार्थीस दि.२२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली असता, अपिलार्थीने पुन्हा माहिती स्वीकारण्याचे नाकारले.

वरील घटनाक्रम,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती, असे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या वेळी माहितीची मागणी केली त्यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी यांची जन माहिती अधिकारी म्हणून त्यांच्या खात्यातर्फे नेमणूक केली गेली नव्हती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांवर पूर्णतः अवलंबून राहवे लागले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी तालुका वैद्यकीय अधिकारी, अंबड यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विहित तरतुदीपेक्षा जास्त कालावधी घेऊन जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी विलंब लावलेला आहे. येथे असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०२.२००८ रोजी व तदनंतर दि.२२.०२.२००८ रोजी माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने माहिती स्वीकारण्याचे नाकारले. अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते.यावरुन असे अनुमान काढण्यात येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये कोणतेही स्वारस्य नाही. मात्र संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०

प्रमाणे शास्ती लावण्याची कारवाई आदेशित करण्यामध्ये त्यांना स्वारस्य आहे. तांत्रिक दृष्टीने जरी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावला असला तरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीचा अपिलार्थीने लागलीच स्वीकार करणे हे या प्रकरणी अपेक्षित होते. तथापि अपिलार्थीने अशाप्रकारची कोणतीही कृती न करुन त्यांच्या माहिती मागण्याच्या हेतूविषयी आयोगाच्या मनात शंका निर्माण केली आहे. अपिलार्थीने अशाप्रकारचे वर्तन इत:पर टाळावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. हे पाहता, या प्रकरणी तालुका वैद्यकीय अधिकारी, अंबड व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचारी हे अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी नि:संशयपणे जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधित तालुका वैद्यकीय अधिकारी,अंबड व अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जबाबदार असणारे त्यांच्या कार्यालयातील संबंधित सहायक/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, त्यांनी आपल्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांपर्यंत अपिलार्थीस देण्याकरिता उपलब्ध करुन ठेवावी. या कालावधीमध्ये अपिलार्थी यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः उपस्थित राहून या कालावधीमध्ये हस्तगत करुन घ्यावी लागेल. या कालावधीनंतर

अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून या अर्जासंदर्भात विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांपर्यंतच्या कालावधीसाठी व्यक्तिशः व विनामूल्य देण्याकरिता उपलब्ध करुन ठेवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधित तालुका वैद्यकीय अधिकारी,अंबड व या प्रकरणाशी संबंधित असणारे त्यांचे सहकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना**
**दिनांक : ०६-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नंदकुमार आसाराम उढाण,मु. खडकेश्वर, पो.ताड-हादगाव,ता.अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५१६
निर्णय दिनांक ०६-०६-२००९

१ श्री. पंढरीनाथ विक्रम आंभोरे, : अपिलार्थी
रा. शेलगाव,ता.बदनापूर,जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय,बदनापूर,
जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,बदनापूर,जि.जालना.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,बदनापूर,जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील निकाली न काढल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०७.२००८ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षतः दि. ३१.०७.२००८ रोजी प्राप्त झाला, त्याअन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून, "शेलगाव येथील स्वस्त धान्य दुकानाच्या, दि. १७.०४.२००१ शासन परिपत्रकाप्रमाणे,तपासणी केलेल्या स्वस्त धान्य दुकानांची व शिधापत्रिकाधारकांची संख्या व यादी" ही सन २००३ ते २००७ या कालावधीशी संबंधित माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या

या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय पारित न केल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०६.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी, तत्कालीन व विद्यमान जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २९.७.२००८ रोजीच्या, त्यांच्या कार्यालयात दि. ३१.०७.२००८ रोजी प्राप्त झालेल्या अर्जावर त्यांनी दि. ०८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन, शेलगाव ता.बदनापूर येथील स्वस्त धान्य दुकानदारास त्यांच्याकडील सन २००३ ते २००७ या कालावधीचे रेकॉर्ड घेऊन त्यांच्या कार्यालयात हजर राहणेबाबत कळविले होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार नाही, सदर माहिती तयार करुन अपिलार्थीस वीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास ते आता तयार आहेत.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यालयातील नायब तहसीलदार कु.विद्या पांडुरंग शिंदे यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे सादर न केल्याने त्यांना या प्रकरणी सुनावणी घेता आली नाही, त्यामुळे ते अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश पारित करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले की, संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे मूळ व प्रथम अपील अर्जास

कोणत्याही प्रकारे कसलाही प्रतिसाद दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम दि. ०८.०९.२००८ रोजी प्रतिसाद दिल्याच्या त्यांच्या युक्तिवादापृष्ठयर्थ आयोगाकडे या पत्राची एक झेरॉक्स प्रत सादर केली आहे. यावरुन असे दिसून येते की, या पत्रावर जन माहिती अधिकारी यांची सही नाही व जावक क्रमांकाचा देखील उल्लेख या पत्रावर आढळून येत नाही. तसेच सदर पत्र बदनापूर तालुक्यातील एका स्वस्त धान्य दुकान मालकास उद्देशून लिहिले असल्याचे दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे, त्यांनी अपिलार्थीस प्रत्यक्षात दि. ०८.०९.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद दिला हा युक्तिवाद आयोगास मान्य करता येत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार नसल्याचे आयोगास अवगत केले. यावरुन असे अनुमान काढणे शक्य आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडे देखील दि. ०८.०९.२००८ रोजी सदर माहिती तयार नसणार. या कथित पत्रावर त्यांची सही नसल्याने ते पत्रच आता अवैध असल्याचे सिध्द होत आहे व या सर्व कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिलेला नाही व आज रोजीही अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार नाही, असे सिध्द होत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचा, त्यांना अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्याने सादर न केल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांना सुनावणी घेता आली नाही, हा युक्तिवाद देखील आयोग अमान्य करीत आहे. माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीचे महत्त्व लक्षात घेता, तहसीलदार या पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्याकडून त्यांच्या कार्यालयात दरमहा अथवा दर आठवडयात किती अपील अर्ज प्राप्त झाले याचा नियमितपणे आढावा घेतला जाणे, याची चौकशी होणे, हे या कायद्याच्या निकोप अंमलबजावणीसाठी गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. केवळ आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांनी कागदपत्रे सादर केली नाहीत म्हणून संबंधित तहसीलदार हे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्याच्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाहीत, ते या प्रकरणी

निश्चितपणे दोषी आहेत, ते ज्या पदावर कार्यरत आहेत ते पद हाताळण्यासाठी त्यांच्या कार्यकौशल्यामध्ये अद्यापही सुधारणा होण्यास भरपूर वाव आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. के.ए.तडवी (सध्या तहसीलदार परभणी या पदावर कार्यरत) यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद जिल्हाधिकारी, जालना व परभणी यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य उपलब्ध असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विहित कालावधीमध्ये तयार न ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी कु. विद्या पांडुरंग शिंदे (सध्या बदनापूर येथे नायब तहसीलदार या पदावर कार्यरत) यांनी या प्रकरणी अशाप्रकारच्या स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस आयुक्त (महसूल), औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त (महसूल),औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी कु.विद्या पांडुरंग शिंदे (सध्या नायब तहसीलदार,बदनापूर,जि.जालना) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.पंढरीनाथ विक्रम आंभोरे,मु.पो.शेलगाव,ता.बदनापूर,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, बदनापूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,बदनापूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हाधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५१७
निर्णय दिनांक ०६-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अशोक शेषराव सांगळे,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य,<br>जालना समाजकार्य महाविद्यालय, रामनगर,<br>जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,<br>जालना. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली पूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे व या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे जास्तीत जास्त शासन लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "त्यांच्या महाविद्यालयाच्या संदर्भात सन १९९३ ते २००७ या कालावधीतील लेखा परीक्षणाच्या प्रमाणित प्रती, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतनपत्रके,महाविद्यालयाचे व्यवस्थापन बदलले असल्यास त्यासाठीच्या कर्मचाऱ्यांच्या संमती व न्यायप्रविष्ट कर्मचाऱ्यांची

यादी व सद्यस्थिती, महाविद्यालयाचे जालना येथून रामनगर येथे स्थलांतर झाल्याचे शासनाच्या आदेशाची प्रत,कर्मचाऱ्यांची यादी, शिक्षक व शिक्षकेतर तसेच रोस्टरप्रमाणे आरक्षण व अनुशेष, तसेच १९९३ ते २००७ पर्यंतचे शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची वर्गवारी यादी व त्यांचे बँकेसह खाते क्रमांक व देय शिष्यवृत्ती रक्कम इ.माहितीच्या प्रमाणित प्रती तसेच या कालावधीचे विद्यापीठ संलग्नीकरण रिपोर्ट अर्जाच्या प्रमाणित प्रती, महाविद्यालय ज्या इमारतीत भरते त्या इमारत मालकाची भाडेचिठ्ठी व दिलेल्या भाडयाच्या तपशीलवार प्रमाणित प्रती", ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २८.११.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.११.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेनुसार जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दि.०४.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे नियमानुसार शुल्क भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने शुल्क न भरल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०६.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. १६.१०.२००७ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातून दि. १०.१२.२००७ रोजी प्रथमतः प्राप्त झाला.

अपिलार्थीने त्यांना उद्देशून लिहिलेला अर्ज मूळात त्यांना प्राप्तच न झाल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जास ते प्रतिसाद देऊ शकले नाहीत, मात्र हा अर्ज त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दि. १०.१२.२००७ रोजी प्राप्त झाला असून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दि. ०४.०१.२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे नियमानुसार शुल्क भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात न केल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार आहे. ते ही माहिती अपिलार्थीस देण्यास तयार आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.१०.२००७ रोजीचा मूळ अर्ज पोस्टाने पाठविल्याप्रित्यर्थ राज्य माहिती आयोगाकडे पोस्टाची पावती सादर केली आहे. या पावतीवरुन अपिलार्थीने दि. १६.१०.२००७ रोजी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना हा अर्ज पाठविल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नाही, हा त्यांचा युक्तिवाद आयोगास मान्य नाही. केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी त्यांचा युक्तिवाद खरा असल्याचे गृहीत धरले तरीही त्यांनी अपिलार्थीस दि. ०४.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद अवैध ठरत आहे. कारण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०४.०१.२००८ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये अपिलार्थीस नियमानुसार शुल्काची पावती फाडल्यास उपलब्ध माहिती देण्यात येईल, असे कळविले आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क किती व या शुल्काचा तदनुषंगीक तपशील दिला नसल्याने हे पत्र अवैध ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०४.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस दिलेला प्रतिसाद अशाप्रकारे अवैध ठरत असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आता विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठवावी. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असूनही, टाळाटाळ केल्याचे अथवा ही माहिती दुष्ट हेतूने अपिलार्थीपासून दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे विनामूल्य पाठवावी.

**जालना**
**दिनांक : ०६-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक शेषराव सांगळे,द्वारा, व्ही. एस.वाघ, यशवंतनगर, अंबड रोड,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, जालना समाजकार्य महाविद्यालय,रामनगर, जालना, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५१८
निर्णय दिनांक ०६-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शामसुंदर साहेबराव वाघ<br>जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष/सचिव, कर्मवीर शिक्षण संस्था,<br>रामनगर, जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून,वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०६.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीचे वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, यांचे प्रतिनिधी आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांना जास्तीत जास्त शासन करावे अशी विनंती केली आहे. त्यांनी या अर्जामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, अपिलीय अधिकारी यांनी आदेश देवूनही त्यांना अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे माहिती न मिळाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना जास्तीत जास्त शिक्षा होणे न्यायोचित व गरजेचे आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे अध्यक्ष/सचिव, कर्मवीर शिक्षण संस्था, रामनगर जालना जिल्हा जालना यांच्याकडे त्यांच्या संस्थेसंदर्भात काही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील

विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, जालना यांच्याकडे दिनांक २६.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. सहायक धर्मादाय आयुक्त यांनी सदर अपिलावर दिनांक ३१.१२.२००७ रोजी आपला निर्णय पारित केला. या निर्णयानुसार त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले. तथापि या नंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत मात्र त्यांचे प्रतिनिधी उपस्थित असून त्यांनी या प्रकरणाची कोणतीही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले आणि पुढील तारीख देण्याची आयोगास विनंती केली. अपिलार्थीच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिलामध्ये केलेल्या लेखी विनंतीप्रमाणे युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांचे दिनांक २६.११.२००७ रोजीचे प्रथम अपील सहायक धर्मादाय आयुक्त, जालना यांच्याकडे केलेले आहे. तथापि सहायक धर्मादाय आयुक्त यांची या प्रकरणी अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली नाही. सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाशी सरळ संबंधित असलेल्या प्रकरणांसंदर्भातच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी म्हणून आपले कर्तव्य पार पाडू शकतात. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकः संकीर्ण/ केंमाअ/ २००७/६३५२७/१५ क्र.(८) ६०३७, दिनांक २६.११.२००७ अन्वये शालेय शिक्षणाशी संबंधित विषयावर अपिलीय अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांची नेमणूक केलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी यांनी प्रथम सुनावणी घेणे या प्रकरणी इष्ट राहील, असे आयोगाचे मत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.जालना यांना असे आदेशित

करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थीच्या दिनांक २६.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य न झाल्यास सदर निर्णय प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसाचे आत ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहेत**.**

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**जालना**
**दिनांक : ०६-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शामसुंदर साहेबराव वाघ, रा. कारभारी निवास, यशवंतनगर, अंबड रोड, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव कर्मवीर शिक्षण संस्था, रामनगर,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना, अपिलार्थीच्या दि.२६.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहायक धर्मादाय आयुक्त, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५१९
निर्णय दिनांक ०६-०६-२००९

१ श्री. भास्कर माधवराव कुलकर्णी, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी , : प्रतिवादी
तहसील कार्यालय, जालना
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, जालना
प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय,जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दि. १०.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन न दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०१.०५.२००५ ते ३१.०५.२००५ या कालावधीतील आस्थापनाविषयक काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये कार्यरत असलेल्या तहसीलदाराचे नाव, या कालावधीमध्ये

संबंधित तहसीलदार यांनी अर्जित/आजारी रजा घेतली आहे काय, असल्यास कालावधी, या कालावधीत सी.टी.सी.केली असल्यास प्रभारी तहसीलदार व्यक्तीचे नाव - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही व अपिलार्थीशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०६.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व ही माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी दि. २६.०२.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली आहे. यासंदर्भात आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तीशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व हे अर्जदाराचे असते अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वेळोवेळी गेले असता

व सुनावणीस हजर राहिले असता, त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, असे आयोगास अवगत केले. तथापि अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे केलेल्या माहितीची मागणी केली होती किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही, कारण यासंदर्भातील कोणताही लेखी पुरावा अपिलार्थी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही. केवळ अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले म्हणजे त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाची व्यक्तीशः जाऊन विचारणा केली, असे सिध्द होत नाही. वास्तविक पाहता, ही माहिती, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी जर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय दिला असता तर, ती अपिलार्थीस फेब्रुवारी, २००८ मध्येच प्राप्त झाली असती व त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसते. त्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी हे जास्त जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. संबंधित जन अपिलीय अधिकारी (श्री. गणेश निराळी, सध्या तहसीलदार,आष्टी,जि.बीड या पदावर कार्यरत) यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची जिल्हाधिकारी, जालना/बीड यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २६.०२.२००८ रोजी पाठविलेल्या कथित माहितीची प्रत आयोगास दाखविली, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास कबूल केले आहे. हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दोन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दोन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर माधवराव कुलकर्णी, रेणुका निवास, मंमादेवी नगर,अंबड रोड,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,जालना जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५२०
निर्णय दिनांक ०६-०६-२००९

१ श्री. प्रमोद जगताप, : अपिलार्थी
रा.परतूर,जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता,
लघुपाटबंधारे जिल्हा परिषद परतुर उपविभाग,
जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून,या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०६.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा दि. १०.०७.२००७ रोजीचा प्रथम अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांना दि. १२.०७.२००७ रोजी प्राप्त झाला, त्याअन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"मार्च, २००६ ते एप्रिल, २००७ पर्यंत आपल्या कार्यालया अंतर्गत कोणकोणती कामे झाली. रो.ह.यो.ची सर्व सविस्तर माहिती देण्यात यावी."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर दि.०८.०४.२००९ पासून कार्यरत असून अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलाशी संबंधित प्रथम अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी.बी.जाधव,उपअभियंता (सध्या निलंबित) यांनी कोणतीही कार्यवाही न करण्याची कारणे ते आज आयोगास सांगू शकत नाही. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय न देण्याची कारणे अशाचप्रकारची असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी, "रोहयोची सर्व सविस्तर माहिती देण्यात यावी" या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळातच देय होणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करताना ती स्पष्ट स्वरुपात करणे आवश्यक आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे "सविस्तर माहिती" हा शब्दप्रयोग वापरला आहे. परंतु 'सविस्तर' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्यावर अपिलार्थीस माहिती अपेक्षित व आवश्यक आहे, याचा बोध यावरुन होत नाही, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होऊ शकत नाही. मात्र उर्वरित माहिती म्हणजे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे मार्च, २००६ ते एप्रिल, २००७ पर्यंत झालेली कामे म्हणजेच कामांची नावे, ही माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती

पुरवावी लागेल. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य द्यावी लागेल.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील परिच्छेदात स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित कनिष्ठ अभियंता ते कार्यकारी अभियंता पर्यंतचे अधिकारी निलंबित झाले असल्याने त्यांना ही माहिती देण्यासाठी काही अडचणी निर्माण होत आहेत. यावर आयोगाने, त्यांना जर संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी मस्टर्सच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन दिल्या नाहीत तर त्या संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाची कारवाई प्रस्तावित करावी, असे सूचित केले.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप इतके सोपे होते की, अपिलार्थीस ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीत देणे त्यांना सहज शक्य होते, तथापि केवळ जन माहिती अधिकारी यांच्या मनातील ईच्छाशक्तीच्या अभावामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही, असा निष्कर्ष काढल्यास ते या प्रकरणी फारसे वावगे आहे, असे म्हणता येणार नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांना देय असलेली माहिती नाकारुन व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवून आपल्या या अशाप्रकारच्या कृतीद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी श्री. डी.बी.पाटील यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येत आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. डी.बी.पाटील) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता जलसंधारण विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांची पातळी कार्यक्षमतेच्या कोणत्या स्तरावर पोहचली आहे, हे दिसून येते. संबंधित जन अपिलीय अधिकारी श्री. उदय पुराणकर (सध्या निलंबित) यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीची व बेपर्वाईची नोंद सचिव (जलसंपदा) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रमोद जगताप,शहर कार्यालय,राष्ट्रवादी कॉंग्रेस,परतूर,ता.परतूर,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,लघुपाटबंधारे जिल्हा परिषद परतुर उपविभाग,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५२१
निर्णय दिनांक ०६-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. हरीभाऊ माधवराव तावरे,<br>मु.पो.चिकनगाव,ता.अंबड,जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)उपविभाग अंबड,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>विभाग जालना | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०६.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०७.२००८रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०१.२००८ ते ३०.०३.२००८ या कालावधीमधील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित, "संपूर्ण तालुक्यातील झालेल्या रोहयोच्या कामावरील एकूण मजूरांची संख्या तसेच त्यांची एकूण हजेरीपत्रके व त्यांचा एकूण झालेला पगार याची माहिती " ही माहिती मागितली

होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र जोडले असल्याचे म्हटले होते.

अपिलार्थीचा हा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.०७.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्याकरिता एकूण रु. ३८,००० इतक्या अनुदानाची कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे रोहयो विभाग जालना यांच्याकडे मागणी केली. जन माहिती अधिकारी यांचे पत्र कार्यकारी अभियंता यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि. ०६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली मागणी कळविली. जन माहिती अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांना दि. २२.०७.२००८ रोजीच्या दिलेल्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली आहे. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २७.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार आहे. तथापि अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागणार आहे. अपिलार्थीस द्यावयास लागणाऱ्या माहितीपोटी त्यांना एकूण रु.३८,०००/- इतका खर्च येणार आहे. या खर्चाची तरतूद त्यांच्याकडे वरिष्ठ कार्यालयाने न केल्याने त्यांना ही माहिती पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील बहुतांश भाग हा मस्टर्सच्या झेरॉक्स प्रतींशी संबंधित आहे. तथापि

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीच्या मुद्यांचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली माहे जानेवारी,२००८ ते दि. ३० मार्च,२००८ या कालावधीतील एकूण मजूरांची संख्या व त्यांना दिला गेलेला एकूण पगार, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे सहज शक्य होते, त्याकरिता त्यांना एका पृष्ठाकरिता जास्तीत जास्त रु.२/- खर्च आला असता, कारण ही माहिती अपिलार्थी व्यक्तिशः घेऊन जाणार होते, तथापि या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस शक्य तितकी माहिती उपलब्ध करुन देण्याचे साधे सौजन्यही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दाखविल्याचे आढळून येत नाही. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील मजूरांची संख्या व त्यांना दिलेला एकूण पगार, ही माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात एवढा साधा सकारात्मक प्रतिसाद देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ माहितीतील मजूरांच्या हजेरीपत्रकांबाबत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांच्या कार्यालयास आवश्यक ती आर्थिक तरतूद उपलब्ध झाल्यास त्यांनी सदरची तरतूद त्यांच्याकडे उपलब्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत प्राधान्याने, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी, या भागाची माहिती विनामूल्य पुरवावी, जर अपिलार्थीस इतका वेळ थांबणे शक्य नसेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अवलोकन करण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील दोन मुद्यांवरील माहिती वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी व मस्टर्सच्या झेरॉक्स प्रती त्यांना आवश्यक ते अनुदान उपलब्ध झाल्यानंतर प्राधान्याने सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात अथवा हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीच्या सहमतीने त्यांना अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्याव्यात.

३. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना**
**दिनांक : ०६-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरीभाऊ माधवराव तावरे, मु.पो.चिकनगाव,ता.अंबड,जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग,अंबड,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५२२
निर्णय दिनांक ०६-०६-२००९

१ श्रीमती इंदुमती सिताराम लहाने, : अपिलार्थी
मु. ताळतोंडी,ता.मंठा,जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता,
लघुपाटबंधारे जिल्हा परिषद परतुर उपविभाग,
जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद,जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती देण्याच्या सूचना प्राप्त झाल्या तरी, माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०२.२००८रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "गावतलाव तळतोंडी क्र.१ कोणाच्या शेतात झालेले आहे त्या शेतकऱ्याचे नाव, गट नं., पाणी साठवण क्षमता किती, मंजूर कामाची रक्कम, मंजूरी कोणी दिली, सदर काम जर मजूरांमार्फत करुन घेण्यात असेल तर मजूरांची संख्या, जर यंत्रामार्फत करुन घेण्यात आले असेल तर क्रमांक , बुडीत क्षेत्रात किती जमीन गेली व तळतोंडी येथे जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयामार्फत केल्या गेलेल्या तळ्यांची संख्या" - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०८.२००८ रोजीच्या कार्यालयीन पत्राद्वारे, अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. २९.०८.२००८ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचे हे पत्र म्हणजे त्यांनी अपिलार्थीसच स्वतःला माहिती घेण्याचे सूचित केले गेलेले एक कोणतेही तारतम्य नसलेले पत्र आहे, असे दिसून येते. या पत्राद्वारे कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीस उद्देशून माहिती घेण्यासाठी सूचना दिल्या व त्याची एक प्रत उपअभियंता, जि.प.ल.पा.परतूर उपविभाग,जि.जालना यांना दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांचे हे पत्र पाहता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही विचार न करता व त्यांची सद्सद्विवेकबुध्दी जागरुक न ठेवता, हे पत्र दिल्याचे दिसून येते.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०६.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिली गेल्याचे आयोगासमोर मान्य केले व ते ही माहिती आता अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देतील, असे आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थीस इतके दिवस माहिती न पुरविण्याचे कारण उपस्थित जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, ते नुकतेच,माहे एप्रिल,२००९ मध्ये रुजू झाले असून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कनिष्ठ व उप अभियंता यांच्याकडे उपलब्ध असणे अपेक्षित आहे, ते कार्यकारी अभियंता यांच्यासह निलंबित झाले असल्याने अपिलार्थीस त्यांना माहिती देण्यास अडचणी येत आहेत.

वरील घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही. कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या तलावासंदर्भात होती, याची माहिती, अधीक्षक अभियंत्याकडे किंवा इतर कार्यालयाकडील संबंधित कामाचे प्रस्ताव, अंदाजपत्रके, वर्क ऑर्डर, निधी वितरण आदेश व तदनुषंगीक कागदपत्रांमध्ये नक्कीच उपलब्ध असणे शक्य आहे, तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रयत्न केला नाही. त्यामुळे अपिलार्थी या कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहिल्या आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित व स्वरुप इतके सोपे होते की, ती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना विशेष परिश्रम घ्यावे लागले असते, अशातील कोणतीही बाब संभवत नाही. केवळ संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या मनातील ईच्छाशक्तीच्या अभावामुळे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळासाठी वंचित रहावे लागले आहे. अधिनियमातील कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक कर्मचारी/अधिकारी यांना माहिती अधिकारी समजावे, अशी तरतुद आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक हे सर्वजण व्यक्तिशः जबाबदार आहेत, अशी आयोगाची खात्री झाली आहे. आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. हे पाहता असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ

सादर करावा. या मुदतीत अपिलार्थीचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे जन माहिती अधिकारी यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. सध्याचे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांना उपरोक्त प्रकरणी एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ सादर करावा.

**जालना** | **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०६-२००९** | **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती इंदुमती सिताराम लहाने,मु.ताळतोंडी,ता.मंठा,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,लघुपाटबंधारे जिल्हा परिषद परतुर उपविभाग, जि.जालना - यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५२३
निर्णय दिनांक ०६-०६-२००९

१ श्री. शिवाजी भाऊराव बनकर, : अपिलार्थी
ता.जाफ्राबाद,जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,जाफ्राबाद,जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांना वेळेत प्राप्त झालेली नाही व प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. अशाप्रकारच्या अभिप्रायाबरोबरच त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी या अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ ते दि. ०४.१२.२००७ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या नकला, चालू,बंद व अपूर्ण कामासह सर्व कामांची नावे, वैयक्तिक लाभार्थी, घरकुल व सर्व योजनेचे लाभार्थीचे नाव,गाव,कामाचे पैसे तारखेसह संपूर्ण माहिती - या

मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः व नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथम दि. ०७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले व तदनंतर परत दि.२४.१२.२००७ रोजी अपिलार्थीस अशाच अर्थाचे पत्र दिले असता, अपिलार्थी हे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः हस्तगत करुन घेऊन गेले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०२.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. या आदेशाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.०२.२००८ रोजी अपिलार्थीस उर्वरित माहिती उपलब्ध करुन देऊन त्यांना माहिती मिळाल्यापृष्ठयर्थ त्यांची पोचसही घेतली. तथापि याही माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०६.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीपासून माहिती दडवून ठेवण्याचा त्यांचा कोणताही उद्देश नव्हता. त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम दि. ०७.१२ व तदनंतर २४.१२.२००७ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना विनामूल्य देऊ केली व तदनंतर परत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी उर्वरित माहिती देखील अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून आले की, अपिलार्थीने या प्रकरणी

व्यक्तीशः माहितीची मागणी केली होती त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व अपिलार्थीवर होते. तरीही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्याकरिता या घटनेच्या प्रत्येक टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती स्वतः होऊन देऊ केली आहे. अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि. २४.१२.२००७ व तदनंतर २१.०२.२००८ रोजी आवश्यक ती उर्वरीत माहिती दिली आहे. अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता सदर माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी ती सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर ही माहिती देखील अपिलार्थीस अपूर्ण का वाटते, याचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत अथवा या संदर्भात अपिलार्थीने कोणताही लेखी युक्तिवाद आयोगास त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत अथवा इतर पत्राद्वारे सादर केलेला नाही. हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दोन वेळा प्राप्त झालेल्या माहितीने त्यांना आवश्यक ती संपूर्ण माहिती मिळाल्याने त्यांचे समाधान झाले असावे, असे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**जालना**
**दिनांक : ०६-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवाजी भाऊराव बनकर, रा. बुटखेडा, पो. अकोला (देव), ता.जाफ्राबाद,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,जाफ्राबाद,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५२४
निर्णय दिनांक ०६-०६-२००९

१ श्री. सुखदेव नामदेव सावंत, : अपिलार्थी
ता.भोकरदन,जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप विभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे जिल्हा परिषद परतुर उपविभाग,
जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद,जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने केले असल्याचे या अर्जामध्ये म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे परतुर व मंठा तालुक्यातील पाझर तलाव,गावतलावाबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामार्फत रो.ह.यो.अंतर्गत व संपूर्ण ग्रामीण रो.ह.यो.अंतर्गत सन २००६-०७ ते २००७-०८ या वर्षात किती गावतलाव व पाझर तलाव मंजूर झाले व त्यावर झालेला गावनिहाय खर्च, खर्चाची नोंद व मस्टर्सच्या छायांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने

अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०६.२००८ रोजीच्या आदेशाप्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय दिला.

"तरी आपणास कळविण्यात येते की, आपणास द्वितीय अपिलात जाण्यास या कार्यालयाची संमती देण्यात येत आहे." जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या चमत्कारिक निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०६.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.
आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना माहिती आवश्यक असल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, ते या पदावर दि. ०८.०४.२००९ पासून कार्यरत आहेत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याकडे असून ते सध्या निलंबित आहेत, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना अडचणी येत आहेत. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अंदाजे ५०० मस्टर्स आहेत. त्याच्या झेरॉक्स प्रती काढण्यासाठी त्यांना बराच खर्च येणार आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे देणे भाग होते. याच मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले असते तर आज जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादामध्ये अपिलार्थीस माहिती देण्याच्या खर्चाचा जो बाऊ आयोगासमोर आज उभा केला तो आज करण्याचे त्यांना कोणतेही

कारण पडले नसते.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कनिष्ठ अभियंत्याच्या ताब्यात आहे व त्यांनी ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केलेली नाही, अशा कनिष्ठ अभियंता यांच्याविरुध्द जन माहिती अधिकारी यांनी काही कार्यवाही केली आहे काय? किंवा त्यांच्या विरुध्द पोलीसांमध्ये तक्रार नोंदविण्यात आली आहे काय, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी आयोगाच्या या प्रश्नांना नकारार्थी उत्तर दिले. यावर विद्यमान जन माहिती अधिकारी हे देखील अपिलार्थीस ही माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे आयोगास दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व गांभीर्य लक्षात घेता ही माहिती अपिलार्थीस पुरविणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. जर या मुदतीत त्यांना संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध झाली नाही तर, त्यांनी कनिष्ठ अभियंता यांच्याविरुध्द या प्रकरणासंदर्भात आवश्यकतेनुसार फौजदारी कारवाई करावी.

या प्रकरणी अपिलार्थीस प्रदीर्घ कालावधीसाठी अपेक्षित माहितीपासून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने व त्यांच्या अशा कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित नसल्याने त्यांना बचावाची एक संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी

जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय हा त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाचे व ते ज्या पदावर कार्यरत आहेत त्या पदाचा कार्यभार संभाळण्यासाठी आवश्यक त्या कार्यकुशलतेचा अभाव स्पष्ट करीत आहे, या आयोगाच्या अभिप्रायाची नोंद सचिव (जलसंपदा) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

२) अपील मान्य करण्यात येत आहे.

३) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

४) जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुखदेव नामदेव सावंत,मु. निंबोळा,पो.सिपोरा (बा) ता.भोकरदन,जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,लघुपाटबंधारे जिल्हा परिषद परतुर उपविभाग,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा),मंत्रालय,मुंबई - ३२ या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ५२५/०८ व ५२६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५२५ व ५२६
निर्णय दिनांक ०६-०६-२००९

१ श्री. मोहन सुखदेव राठोड, : अपिलार्थी
रा. वाडेगाव,ता.मंठा,जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता,
लघुपाटबंधारे जिल्हा परिषद परतुर उपविभाग,
जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०६.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने केले असल्याचे त्यामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे वाडेगाव पांढर्णा ता.मंठा शिवारातील पाझर तलाव, गाव तलाव या कामाच्या इस्टीमेटच्या व रोहयोमधील मजूरांचे हजेरी मस्टर व जमा-खर्चाच्या सत्यप्रतीची जाने.२००३ ते ऑगस्ट, २००७ पर्यंतच्या कालावधीशी

संबंधित माहिती मागितली होती. ही माहिती अपिलार्थीने टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस द्वितीय अपिलात जाण्यास संमती दिली. जन माहिती व अपिलीय यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित असून त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद केला की, ते या पदावर दि.०८.०४.२००९ पासून कार्यरत असून अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात आढळून आला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते तीस दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य देण्यास तयार आहेत. यापुढे त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित कनिष्ठ अभियंता ते कार्यकारी अभियंता पर्यंतचे अधिकारी निलंबित झाले असल्याने त्यांनी ही माहिती देण्यासाठी काही अडचणी निर्माण होत आहेत. यावर आयोगाने, त्यांना जर संबंधित कनिष्ठ अभियंता/उपअभियंता यांनी मस्टर्सच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन दिल्या नाही तर त्यांना संबंधित कनिष्ठ अभियंता/उपअभियंता यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाची कारवाई प्रस्तावित करावी.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी. बी. जाधव यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास वेळेत प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहिले आहे. अपिलार्थीस माहिती न देण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास या प्रकरणी आढळून येत नाही. त्यामुळे केवळ अपिलार्थीस माहिती द्यावयाची नाही या मनोभूमिकेतून

त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नसावी असा निष्कर्ष काढण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी अशाप्रकारे वंचित ठेवले गेल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निश्चितपणे पात्र होत आहेत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्यामुळे त्यांच्यावर एकूण २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता जलसंधारण विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांची पातळी कार्यक्षमतेच्या कोणत्या स्तरावर पोहचली आहे, हे दिसून येते. संबंधित जन अपिलीय अधिकारी (श्री. उदय कुराणकर) हे यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीची व बेपर्वाईची नोंद सचिव (जलसंधारण) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**<u>अपील क्र.५२६/०८:</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यासने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले असल्याचे नमूद केले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, त्यांनी या प्रकरणी त्यांच्या दि. २१.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांच्या कार्यक्षेत्रातील त्यांच्या विभागाने हाती घेतलेल्या वेगवेगळया योजनांतर्गत मौ. वाडेगाव पांढुर्णा,ता.मंठा येथील MIN-6 अंतर्गत किती गावतलाव झाले व त्यावर किती खर्च करण्यात आला, याची अंदाजपत्रके व मोजमापपुस्तिकेच्या प्रती, व तसेच संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेचे संबंधित मस्टरच्या, पेमेंटच्या तपशीलासह माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. ०३.०७.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस संबंधित अर्जदारास दि. २९.०८.२००८ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले व अपिलार्थीस द्वितीय अपिलात जाण्यास संमती दिली. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या चमत्कारिक निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित असून त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद केला की, ते या पदावर दि.०८.०४.२००९ पासून कार्यरत असून अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात आढळून आला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते तीस दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य देण्यास तयार आहेत. यापुढे त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित कनिष्ठ अभियंता ते कार्यकारी अभियंता पर्यंतचे अधिकारी निलंबित झाले असल्याने त्यांनी ही माहिती देण्यासाठी काही अडचणी निर्माण होत आहेत. यावर आयोगाने, त्यांना जर संबंधित कनिष्ठ अभियंता/उपअभियंता यांनी मस्टर्सच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन दिल्या नाही तर त्यांना संबंधित कनिष्ठ अभियंता/उपअभियंता यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाची कारवाई प्रस्तावित करावी.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी

श्री. डी. बी. जाधव यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास वेळेत प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहिले आहे. अपिलार्थीस माहिती न देण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास या प्रकरणी आढळून येत नाही. त्यामुळे केवळ अपिलार्थीस माहिती द्यावयाची नाही या मनोभूमिकेतून त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नसावी असा निष्कर्ष काढण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी अशाप्रकारे वंचित ठेवले गेल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निश्चितपणे पात्र होत आहेत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्यामुळे त्यांच्यावर एकूण २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता जलसंधारण विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांची पातळी कार्यक्षमतेच्या कोणत्या स्तरावर पोहचली आहे, हे दिसून येते. संबंधित जन अपिलीय अधिकारी (श्री. उदय कुराणकर) हे यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीची व बेपर्वाईची नोंद सचिव (जलसंधारण) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची वरील दोन अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.५२५/०८ व ५२६/०८ मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपरोक्त अपील क्र.५२५/०८ व ५२६/०८ या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. उपरोक्त अपील क्र.५२५/०८ व ५२६/०८ या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रत्येकी रु.२५०००/- प्रमाणे एकूण रु.५०,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहन सुखदेव राठोड,रा. वाडेगाव पांढुर्णा, पो.पिंपरखेडा, ता.मंठा,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,लघुपाटबंधारे जिल्हा परिषद परतुर उपविभाग, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंधारण) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५३९

दिनांक ०८-०६-२००९

१ श्री. भास्कर गंभीरराव चव्हाण, अपिलार्थी
व्दारका प्लॉट नं. ५, समतानगर, ता. सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र,
अजिंठा, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे त्यांच्या वकिलासह, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी आज रोजी अपिलार्थीच्या वकिलाने असे म्हणणे मांडले की, वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून एम. एल. सी. केसेसमध्ये किती दिवसामध्ये माहिती पुरविणे बंधनकारक

आहे अथवा याबाबतचे शासनाचे आरोग्य विभागाकडील परिपत्रक पुढील सुनावणीच्या वेळी ते आयोगास सादर करु शकतील.

या प्रकरणी आयोगास सह संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची साक्ष घेणे गरजेचे वाटत आहे. सबब पुढील सुनावणीकरिता सह संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना समन्स पाठवावे. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद हे गैरहजर असल्यामुळे सह संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची साक्ष घेणे आयोगास गरजेचे वाटते.

पुढील सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भास्कर गंभीरराव चव्हाण, व्दाराका प्लॉट नं. ५, समतानगर, ता. सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, अजिंठा, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सह संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५४०

निर्णय दिनांक ०८-०६-२००९

१ श्री. रेवणसिध्द शंकरराव माळकुंजे, : अपिलार्थी
मु. पो. लिंबोणी बाग, गणपती मंदिराजवळ, तांबरी विभाग,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता, संचलन व सुव्यवस्था मंडळ,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, संचलन व सुव्यवस्था मंडळ,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, संचलन व सुव्यवस्था मंडळ,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २६-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती न पुरविता माहिती पुरविल्याचे सांगून त्यांचे अपील जन अपिलीय अधिकारी यांनी एकतर्फी निकाली काढून माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य

माहिती आयोगाकडे केले आहे. आपल्या या अभिप्रायाबरोबर त्यांनी या अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे फेडरल सेक्युरिटी फोर्स ऑफ इंडिया, लातूर यांच्याविषयी एकूण सहा मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधी म्हणून अपिलार्थीने " एक वर्ष " असे नमूद केले आहे यावरुन अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यापूर्वीच्या एक वर्षापूर्वीची माहिती हवी असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - फेडरल सेक्युरिटी फोर्सची नोंदणी कोणत्या कायद्यान्वये झाली, कोणत्या कार्यक्षेत्रासाठी, नोंदणी केव्हा झाली, फेडरल फोर्सच्या संदर्भात संचालक मंडळ किंवा भागीदार यांच्याविषयी संपूर्ण माहिती, फेडरल फोर्सच्या नोव्हेंबर २००७ पर्यंतच्या आर्थिक व्यवहाराचा ताळेबंद, सध्या फेडरल फोर्स मार्फत किती ठिकाणी काम चालू आहे, फेडरल फोर्स मार्फत पुरविण्यात येणारे व सध्या कार्यरत असणारे सेक्युरिटी गार्ड यांची नांवे व पत्ते, पात्रता, त्यांना देण्यात येणा-या सुविधा, वेतन व प्रत्येक गार्डवर मिळणारा फायदा आणि विद्युत वितरण मंडळाबरोबर झालेल्या कराराची सत्यप्रत व प्रोसेसची इत्यंभूत माहिती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १४ इतके त्यांच्या कार्यालयात रोखीने अथवा डिमांड ड्राफ्टने भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात भरणा केल्यानंतर त्यांना दिनांक २०-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०२-

२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस कार्यकारी अभियंता यांनी माहिती पुरविल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, ते फेडरल सेक्युरिटी फोर्स ऑफ इंडिया, लातूर या संस्थेमध्ये सेक्युरिटी गार्ड म्हणून कामाला आहेत, त्यांना संबंधित संस्थेकडून कमी पगार दिला गेल्यामुळे त्यांना संबंधित संस्थेविषयी व त्यांना पगार देतांना त्यांची कमी हजेरी दाखविली गेल्यामुळे त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळणे अत्यावश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीकडून १४ रुपये इतके शुल्क भरुन घेऊन अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००७ रोजीच्या प्रथम पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद चुकीचा आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीस माहितीपोटी पुरविण्यात येणा-या शुल्कापोटीचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविला नाही, जो त्यांनी अपिलार्थीस पुरविणे त्यांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे बंधनकारक आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा दिनांक १८-१२-२००७ रोजीचा अपिलार्थीच्या अर्जास दिलेला प्रतिसाद अवैध ठरत आहे, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे त्यांनी स्वीकारलेले शुल्क रुपये १४ इतके त्यांना परत करावे लागेल

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे व अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मुद्दा क्रमांक २ द्वारे त्रयस्थ पक्ष फेडरल फोर्सच्या संदर्भात मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची होती तसेच ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनींना सुरक्षा रक्षक पुरवितांना संबंधित कंत्राटदार यांची कंपनी ज्या संस्थेकडे नोंदणीकृत आहे त्या संस्थेच्या प्रमाणपत्राच्या प्रती फक्त कंत्राटदाराकडून मागविल्या आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे फेडरल फोर्सच्या आर्थिक व्यवहाराचा ताळेबंद मागितला आहे. आयोगाचे या मुद्दयावर असे अभिप्राय आहेत की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (घ) च्या तरतुदीन्वये अशा प्रकारची माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्ष, फेडरल फोर्स यांना हानी पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच फेडरल फोर्सची ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध देखील नाही. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली नसल्याचे दिसून येत आहे. मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात अपिलार्थीने संबंधित सेक्युरिटी गार्डची नावे, पत्ते, पात्रता व त्यांना कंत्राटदाराकडून देण्यात येणारे वेतन, सुविधा व प्रत्येक गार्डवर मिळणारा फायदा याची माहिती मागविली आहे. या मुद्दयाबाबत फेडरल फोर्सतर्फे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पुरविण्यात येणा-या गार्डची नावे उपलब्ध होऊ शकतात, उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही व ही माहिती फेडरल फोर्सकडून घेऊन ती अपिलार्थीस पुरविल्यास वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम ८ (१) (घ) चा भंग होण्याची शक्यता असल्याने या मुद्दयामधील फक्त संबंधित गार्डची नांवे व पत्ते ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत

आहे. मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २०-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झाली आहे त्यामुळे या मुद्दयावर आयोगाचे कोणतेही भाष्य नाही.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो न दिलेल्या, परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असलेल्या माहितीचे वरील केलेले पृथक्करण पाहता असे दिसून येते की, अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फेडरल फोर्स सेक्युरिटी फोर्स यांचे सुरक्षा पुरविण्याचे लायसन्स, महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम १९६१ नुसार संस्थेचे नोंदणी पत्र या पत्राची प्रत अद्यापपावेतो पुरविलेली नाही. या प्रमाणपत्राच्या प्रतीच्या आधारे जन माहिती अधिकारी यांनी फेडरल सेक्युरिटी फोर्स सुरक्षा एजन्सीला काम दिले आहे. या संस्थेकडे फेडरल फोर्सने केलेल्या नोंदणीच्या आधारे, अपिलार्थीस माहितीचा मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात या प्रमाणपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. अपिलार्थीच्या अपील अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात अपिलार्थीने सेक्युरिटी गार्डची नांवे व पत्ते याची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली आहे. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो पुरविली नाही. ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस याच कालावधीमध्ये पुरवावी लागेल. या दोन मुद्दयावरील स्पष्ट केलेल्या या माहितीशिवाय इतर मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून वरील कारणास्तव देय असणार नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ अंशतः व ५ अंशतः या मुद्दयावरील माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस त्यांचे हजेरीपत्रक संबंधित संस्थेकडून हवे आहे. तथापि या मुद्याचा समावेश त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जामध्ये नाही त्यामुळे अपिलार्थीस त्यांचे उपस्थिती पत्रक हवे असल्याने त्यांना यासाठी जन माहिती अधिकारी

यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेगळ्याने अर्ज करावा लागेल, असे अपिलार्थीस स्पष्ट करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली मुद्दा क्रमांक १ अंशतः व मुद्दा क्रमांक ५ अंशतः ही माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी व याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारण्यात आलेले शुल्क रुपये १४ इतके त्यांना परत करावे.

औरंगाबाद

दिनांक ०८-०६-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रेवणसिध्द शंकरराव माळकुंजे, मु. पो. लिंबोणी बाग, गणपती मंदिराजवळ, तांबरी विभाग, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, संचलन व सुव्यवस्था मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, संचलन व सुव्यवस्था मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५४१

निर्णय दिनांक ०८-०६-२००९

१ श्री. जिवन रामराव उबाळे, : अपिलार्थी
ज्ञानेश्वरनगर, आय. टी. आय. च्या मागे,
नगर रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तलाठी, सजा तरफ गिराम, बीड,
तालुका जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
बीड, तालुका जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : १.श्री. टी. बी. कुंभार,
२. श्री. तुकाराम बाबा कुंभार,
३. श्रीमती चंद्रकलाबाई राजेंद्र चौधरी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न दिल्या

कारणाने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही व्हावी व कलम ७ (६) नुसार त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे . या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत मुख्य प्रवर्तक प्रेरणा को.ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या बीड शहरातील स.न. ६० च्या फेरफारासंबंधी एकूण सहा मुद्याद्वारे काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे व टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावतो श्री. टी. बी. कुंभार फेर नंबर १५०० सर्व्हे नंबर ६२ ची संचिका प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती खोटी आहे. हा सर्व्हे नंबर २४ एकर १० गुंठेचा असतांना सर्व्हे नंबरच्या ७/१२ उता-यामध्ये असलेल्या

क्षेत्रधारकाची यादी पाहता या सर्व्हे नंबरचे एकूण क्षेत्र जवळपास ५० एकर इतके होते. या सर्व्हे नंबर मधील ७/१२ चे उतारे पाहता विकणा-यांची नांवे तसेच ठेवली आहेत तसेच त्यांचे क्षेत्र देखील संबंधित तलाठ्याने तसेच ठेवले आहे त्यामुळे ही माहिती खोटी आहे, असे त्यांचे म्हणणे त्यांनी युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. आपल्या युक्तिवादामध्ये त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले. तथापि त्यांनी प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी कायद्यातील तरतुदींचे जाणुनबुजून विडंबन केल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची व दंडात्मक कार्यवाही आदेशित करण्याचे आदेशित व्हावे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती मागितली आहे ते प्रकरण ज्यावेळी घडले त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. ते या पदावर दिनांक ०१-०७-२००७ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही क्लिष्ट स्वरुपाची असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी विलंब लागला. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ मधील श्री. टी. बी. कुंभार फेर नंबर १५०० सर्व्हे नंबर ६२ ची संचिका गहाळ झाली असल्याने त्यांना ही माहिती देता आली नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या पाठविलेल्या पत्रामध्ये संबंधित कब्जेदार कशा आधारे कब्जेदार झाले आहेत याची माहिती दिली असून त्यांनी आयोगास पुढे असे सांगितले की, सर्व्हे नंबर ६२ मधील त्यांनी दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या पत्रामध्ये संदर्भित केलेले १२ कब्जेदार हे खरेदीखताच्या आधारे / दानपत्र व वारस यांच्या आधारे कब्जेदार झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस त्या सर्व खरेदीखताच्या प्रती ते विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी वरील

परिच्छेदात केलेला युक्तिवाद आयोगास मान्य करता येणार नाही, कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या शासकीय अभिलेख्याची मागणी केली आहे ते शासकीय अभिलेखे, अभिलेख्याच्या " अ " प्रवर्गात मोडत असल्याने, ते जतन करुन ठेवण्याचा कालावधी हा कायमस्वरुपी असल्याने, कोणत्याही परिस्थितीत अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती मिळणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे श्री. टी. बी. कुंभार फेर नंबर १५०० सर्व्हे नंबर ६२ ची संचिका गहाळ झाली असेल तर त्यांनी, ती संचिका जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-यावर होती त्या कर्मचा-यावर त्यांनी फौजदारी कारवाई करावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे त्यांना मिळालेली माहिती खोटी आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. यासंदर्भात अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, मूळ सर्व्हे नंबरचे क्षेत्र एकूण २४ एकर १० गुंठे असतांना त्यातील वेळोवेळी झालेल्या खरेदी संबंधीत तलाठ्याने वजा केल्या नाहीत व सर्व्हे नंबर ६२ च्या ७/१२ च्या उतारा-यावर सर्व कब्जेदारांची नांवे त्यांनी जमिनी विकूनही जशीच्या तशीच राहिली आणि परिणामी व मूळ क्षेत्र २४ एकर १० गुंठे आहे ते आज जवळपास ५० एकर असल्याचे सिध्द होत आहे, ही बाब आयोगास गंभीर वाटते. सबब जिल्हाधिकारी, बीड यांना, या प्रकरणी त्यांनी इतर जिल्हयातील उपविभागीय अधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यामार्फत बीड मधील सर्व्हे नंबर ६२ च्या

झालेल्या अर्जदाराने संदर्भी केलेल्या जमीनीच्या खरेदी विक्री प्रकरणांची ७/१२ च्या नोंदी संदर्भात चौकशी करावी व त्यांना या चौकशीमध्ये दोषी आढळणा-यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक वा इतर कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. ही सूचना त्यांना अधिनियमातील कलम १८ (२) व १८ (३) मधील तरतुदीप्रमाणे आयोगास प्राप्त

झालेल्या, दिवाणी संहिता १९०८ (१९०८ चा ५) अन्वये न्यायचौकशी करता दिवाणी प्रक्रिया न्यायालयाच्या प्राप्त अधिकारानुसार, देण्यात येत आहे. ही चौकशी हे आदेश निर्गमित होताच, तीन महिन्याच्या आत पूर्ण करुन, त्याचा अहवाल चौकशी पूर्ण झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मुद्दा क्रमांक ५ व ६ व्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत नसल्याने व या मुद्दाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दल कारणे व खुलासे अपेक्षित केले असल्याने, या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही.

आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस जिल्हाधिकारी, बीड यांना करण्यात येत आहे व संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही, त्यांच्या अशा प्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घेण्याचेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. वरील निर्णयामध्ये नमूद केलेल्या प्रकरणाची जिल्हाधिकारी, बीड यांनी हे आदेश निर्गमित होताच इतर तालुक्यातील उपविभागीय अधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याच्यामार्फत सर्व्हे नंबर ६२ च्या झालेल्या खरेदी विक्री प्रकरणांची चौकशी करावी व त्यांना या चौकशीमध्ये दोषी आढळणा-यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी. ही चौकशी हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याच्या आत जिल्हाधिकारी बीड यांनी पूर्ण करुन, त्याचा अहवाल चौकशी पूर्ण झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद                ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-०६-२००९                राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जिवन रामराव उबाळे, ज्ञानेश्वरनगर, आय. टी. आय. च्या मागे, नगर रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा तरफ गिराम, बीड, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५४२

निर्णय दिनांक ०८-०६-२००९

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, अपिलार्थी
रा. रामरहिमनगर, घन नं. ९-४-१०६१,
पोस्ट ईतवारा, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, फैजूल उलूम उर्दू प्राथमिक
शाळा, फारुकनगर, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, फैजूल उलूम एज्युकेशन सोसायटी,
विसावानगर, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०२-०६-२००९ रोजीचे वीस रुपये इतके कोर्ट फी तिकिट डकविलेले पत्र आयोगास सादर केले आहे. या पत्रामध्ये त्यांनी आयोगाकडे केलेले, आज रोजी विचाराधीन असलेले त्यांचे अपील क्रमांक ५४२/२००८ हे, ते मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील मागे घेतले असल्याने त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ५४२/२००८, दिनांक ११-०२-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहिमनगर, घन नं. ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फैजूल उलूम उर्दू प्राथमिक शाळा, फारुकनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, फैजूल उलूम एज्युकेशन सोसायटी, विसावानगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक ५४३/२००८ व ५४४/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५४३ व ५४४

निर्णय दिनांक ०८-०६-२००९

१ श्री. घुमरे दत्तात्रय ज्ञानोबा, : अपिलार्थी
मु. पो. पारगांव (बु.) तालुका पाटोदा,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

**अपील क्रमांक ५४३/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, श्री बंकट स्वामी शिक्षण संस्था खडकी (घाट), तालुका जिल्हा बीड या संस्थेने, सन २००५ पासून १७-०९-२००७ पर्यंत

मान्यतेसाठी दिलेल्या नियुक्ती आदेशाची माहिती त्यांना अपु-या स्वरुपात प्राप्त झाली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था खडकी (घाट) या शिक्षण संस्थेने सन २००५ पासून ते १७-०९-२००७ पर्यंतच्या कालावधीमध्ये, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये मान्यतेसाठी दिलेल्या त्यांच्या संस्थेतील नियुक्ती आदेशाच्या प्रती व सन २००५/०६ या शैक्षणिक वर्षात जोगानंद विद्यालय, पारगांव (घु) व २००६-०७ या शैक्षणिक वर्षात श्री बंकटस्वामी विद्यालय, खडकी (घाट) तालुका जिल्हा बीड या शाळेने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या शिक्षक वेळापत्रकाची माहिती मागणी केली. सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस शाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी व संस्थेचे सचिव हे अपिलीय अधिकारी असल्याचे अवगत करुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज, अपिलार्थीने ज्या संस्थांची माहिती मागितली होती त्या संस्थांकडे पाठवून दिले. तदनंतर अपिलार्थीस जोगानंद विद्यालयाने दिनांक १२-१०-२००७ रोजी विनामूल्य माहिती पुरविली व श्री बंकट स्वामी विद्यालयाने दिनांक १२-११-२००७ रोजी अपिलार्थीस ८६ रुपये इतके शुल्क त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन माहिती पुरविली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्याकडे दिनांक २२-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचे प्रथम अपील श्री बंकटस्वामी शिक्षण संस्थेच्या सचिवाकडे सुनावणीसाठी पाठविले व या पत्राची प्रत

अपिलार्थीस दिली. श्री बंकटस्वामी शिक्षण संस्थेच्या सचिवांनी त्यानंतर अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांच्या संस्थेअंतर्गत दोनही शाळांनी माहिती पुरविली असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. त्यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दोन शाळांशी संबंधित असल्यामुळे त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दिनांक २६-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस ही माहिती संबंधित शाळेकडून घेण्यासाठी सूचित केले होते. अपिलार्थीस संबंधित मुख्याध्यापकांनी दिनांक १२-१०-२००७ व दिनांक १२-११-२००७ रोजी माहिती पुरविली असल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली निम्मी माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री बंकटस्वामी शिक्षण संस्थेच्या मान्यतेसाठी दिलेल्या नियुक्ती आदेशाच्या प्रती मागितल्या होत्या. तथापि ही माहिती शिक्षणाधिका-यांनी अपिलार्थीस स्वतः न देता संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती आक्षेपार्ह आहे असे आयोगाचे मत आहे. शिक्षण विभागाच्या बाबतीत आयोगास असा अनुभव आला आहे की, शिक्षण विभागातील बहुतांश जन माहिती अधिकारी हे अर्जदारास माहिती देण्यासाठी टाळाटाळ करतात. त्यांच्या कार्यालयाकडे व त्यांच्या कार्यालयाकडील माहिती देखील अर्जदारास ती देण्यासाठी स्वतः कोणताही प्रतिसाद न देऊन ते संबंधित संस्थेच्या मुख्याध्यापकांना अर्जदारास माहिती देण्याचे सूचित करतात.

तसाच काहीसा प्रकार शिक्षण विभागातील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून होत असतो. आयोगाच्या आतापर्यंत झालेल्या सुनावणीमध्ये एखादा - दुसरा अपवाद वगळता बहुतांश जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याचे आयोगाच्या पाहण्यात नाही. माहिती अधिकार अधिनियमाच्या निकोप वर्धनासाठी शिक्षण विभागातील क्षेत्रीय अधिका-यांमध्ये रुढ झालेल्या अशा प्रकारच्या प्रवृत्तीचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने व माहितीचा अधिकार अधिनियमातील अर्जानुसार मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात अर्जदारास मूळात सकारात्मक प्रतिसाद देण्यासाठी प्रात्साहीत करण्यासाठी सचिव (शालेय शिक्षण) व सचिव (उच्च शिक्षण) यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार )च्या तरतुदीनुसार असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्तरावर शिक्षण विभागातील सर्व क्षेत्रीय अधिका-यांना या संदर्भात मार्गदर्शन करणारे एक परिपत्रक त्वरीत जारी करावे.

आज रोजी विचाराधीन असलेल्या अपील अर्जाची पाहणी करता श्री बंकटस्वामी शिक्षण संस्थेच्या संबंधित विद्यालयांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती अपुरी आहे, असे अपिलार्थीने नमूद केले आहे. तथापि त्यांना प्राप्त झालेली माहिती ही, अपूर्ण कशी आहे हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. यासंदर्भात त्यांनी कोणताही युक्तिवाद लेखी स्वरुपात आयोगास सादर केलेला नाही हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अपील क्रमांक ५४४/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी श्री बंकटस्वामी विद्यालय, खडकी (घाट) या शाळेमध्ये सन २००५ ते २००७-०८ साठी घेतलेल्या संचिका मान्यतेची व डोके मोजणी अहवालाची माहिती न दिल्याने व अतिरिक्त झालेल्या शिक्षकांची माहिती दिशाभूल करणारी दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जोगानंद विद्यालय पारगांव (घु.) तालुका पाटोदा व श्री बंकटस्वामी विद्यालय खडकी (घाट), तालुका जिल्हा बीड या विद्यालयांनी सन २००५ ते २००७-०८ साठी घेतलेल्या संच मान्यतेची व डोके मोजणीच्या अहवालाच्या प्रती आणि या शाळेमधील कायम असलेल्या शिक्षकांची, विद्यार्थ्याअभावी गेलेल्या पदाची व तुकड्यांची अतिरिक्त झालेल्या शिक्षकांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी, मुख्याध्यापक, जोगानंद विद्यालय पारगांव (घु.) तालुका पाटोदा यांना त्यांच्याकडील अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत पाठवून अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. यानंतर अपिलार्थीस संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने त्यांच्या दिनांक १३-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे दिनांक २२-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिका-याने अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे संबंधित संस्थेचे सचिव हे अपिलीय अधिकारी असल्याचे अवगत केले व अपिलार्थीचे मूळ अपील, मूळ अर्जाची प्रत संबंधित संस्थेच्या सचिवाकडे पाठविली. संबंधित संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीच्या अपिलाची सुनावणी घेतली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राअभावी कळण्यास मार्ग नाही. अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १३-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली असल्याने अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढावे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही पूर्णतः त्यांच्या कार्यालयाशी संबंधित होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये संच मान्यता, विद्यार्थ्यांची उपस्थिती अहवाल ही माहिती शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असते. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील माहिती संबंधित संस्थेकडे उपलब्ध असते. आजमितीस अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील दोनही मुद्दयावरील माहिती दिनांक १३-१०-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. तथापि या माहितीपैकी अतिरिक्त झालेल्या शिक्षणाची माहिती दिशाभूल करणारी आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. मात्र ही माहिती दिशाभूल करणारी कशी आहे या संदर्भातील युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी स्वतः अथवा त्यांचे कोणत्याही प्रतिनिधीमार्फत आयोगासमोर उपस्थित

नाहीत. त्यांनी संबंधित मुख्याध्यापकाकडून प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचा कोणताही लेखी अभिप्राय आयोगाकडे आजतागायत पाठविला नाही हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील त्यांना यापूर्वीच संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून माहिती प्राप्त झाली असल्याने फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती प्रत्यक्षतः त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अभिप्रेत असल्याने त्यांनी स्वतः होऊन अपिलार्थीस ही माहिती देणे या प्रकरणी भाग होते, मात्र त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज संबंधित शिक्षण संस्थांकडे पाठवून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी व त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णय देण्यासाठी टाळले आहे असे आयोगाचे मत झाले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली माहिती देखील अपिलार्थीस न देता अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज परत श्री बंकटस्वामी शिक्षण संस्थेकडे पाठवून संबधित शिक्षणाधिका-यांनी आपली जबाबदारी टाळल्याचे व त्याव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब, सचिव (शालेय शिक्षण) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे व या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद त्यांनी घ्यावी असे त्यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. सचिव (शालेय शिक्षण) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. घुमरे दत्तात्रय ज्ञानोबा, मु. पो. पारगांव (बु.) तालुका पाटोदा, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (उच्च शिक्षण), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५४५

निर्णय दिनांक ०८-०६-२००९

१ श्री. रामराव नारायणराव कुलकर्णी, : अपिलार्थी
मु. पो. बर्दापूर, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने " त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची, अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिली गेली असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागाशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" बर्दापूर येथील जमीन स. नं. १६२ क्षेत्र ८ एकर २० गुंठे कूळ कब्जेदार मालक नारायण बळवंत यांनी कूळ कब्जेची रक्कम रु. ७९ पै. ९४ दि. १/७/६५ चलन नं. ९ ने भरणा केली त्याची सत्यप्रत किंवा यासंबंधीचे या कार्यालयाचे अभिलेखावरिल नोंदीचा अभिप्राय किंवा कोषागार कार्यालयाकडून त्यांचे नोंदीचा अभिप्राय यासंबंधीचे नकल मिळणे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अंदाजे ४४ वर्षापूर्वीची असल्याने व या माहितीची नोंद आढळून न आल्याने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-१२-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस या माहितीसंदर्भात त्यांच्याकडे संचिकेच्या क्रमांकाची मागणी केली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या सूचनेचे पालन न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिका-यास अपिलार्थीचा अपील अर्ज दिनांक १४-०१-२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०१-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचा संचिका क्रमांक तीन दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याचे आदेशित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री. नारायण बळवंत यांनी दिनांक ०१-०७-६५ रोजी चलन क्रमांक ९ व्दारे ७९ रुपये ९४ पैसे इतकी रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्यासंदर्भात त्यांच्याकडे काही

ठोस पुरावा उपलब्ध आहे काय ? असे विचारले असता त्यांस अपिलार्थीने नकारार्थी उत्तर दिले. अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या परिचयाचे बीड तहसील कार्यालयाचे सेवानिवृत्त पेशकार यांनी हा संदर्भ अनौपचारिक संदर्भात अपिलार्थीस दिल्याने, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती मागितली असल्याचे सांगितले. त्यांनी आयोगास असेही सांगितले की, या माहितीची त्यांना न्यायालयीन प्रकरणाकरिता आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा त्यांनी त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही त्यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविता आली नाही. यासंदर्भात त्यांनी खालसा झालेल्या इनाम जमिनीची विलेवाट कशी लावावी हे दर्शविणा-या विहित नमुन्यातील जोडपत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस देऊ केली असता अपिलार्थीने ती नाकारली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या जमिनीच्या संदर्भातील जोडपत्र तक्ता-अ चे अवलोकन करता बापुराव नारायणराव, बर्दापूर यांनी ही रक्कम भरल्याचे दिसून येते. ही रक्कम बापुराव नारायणराव यांनी निश्चितपणे कधी भरली याचा या जोडपत्रात उल्लेख नाही व त्याहून जास्त माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली त्यांच्या मूळ अर्जातील माहिती ही ऐकीव माहितीवर आधारीत आहे. नारायण बळवंत यांनी दिनांक ०१-०७-६५ रोजी चलन नंबर ९ अन्वये, कूळ कब्जा रक्कम रुपये ७९ पै. ९४ जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्याचा कोणताही ठोस पुरावा अपिलार्थी यांच्याकडे उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या पुराव्यावरुन जोडतक्ता-अ मधील त्यांच्या कार्यालयात ७९ रुपये ५० पैसे इतकी रक्कम भरल्याचे दिसून येते. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, या प्रकरणात त्यांच्या कार्यालयात भरणा करण्यात आलेल्या पावतीच्या स्थळप्रती जतन करुन ठेवण्याचा कालावधी तीस वर्षाचा असून, त्यांच्या कार्यालयाने या प्रती पूर्वी नष्ट केल्या असण्याची शक्यता आहे. जन माहिती अधिकारी

यांनी केलेला युक्तिवाद, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठ्यर्थ नसलेला कोणताही ठोस पुरावा पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामराव नारायणराव कुलकर्णी, मु. पो. बर्दापूर, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५४६

निर्णय दिनांक ०८-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शेख शाकिर अहमद अ. गफूर,<br>खाजा नगर गल्ली नं. (१३),<br>उस्मानाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी,<br>उस्मानाबाद | प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : मुख्याध्यापिका, शम्सूल उलूम उर्दू हायस्कूल, उस्मानाबाद |
| | त्रयस्थ पक्ष | : शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्याच्या कार्यालयाशी संबधित शम्सूल उलूम उर्दू हायस्कूल, उस्मानाबाद यांच्याकडे शिक्षकास वेळोवेळी देण्यात आलेल्या मान्यतेच्या प्रती व इतर माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने सदर अर्ज शिक्षणाधिका-याकडे केला होता. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीचा अर्ज दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे संबधित शाळेच्या मुख्याध्यापिकेकडे पाठविला व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली. यानंतर संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेने अपिलार्थीस दिनांक ०६-१०-२००७ रोजी अपिलार्थीस काही माहिती दिली. परंतु जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचे अपील सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी, उस्मानाबाद यांच्याकडे केलेले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी, उस्मानाबाद यांनी दिनांक २७-११-२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीच्या गैरहजेरीमध्ये अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी, उस्मानाबाद यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना या माहितीची आवश्यकता असल्याचे आयोगास सांगितले.

संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीकडे उपलब्ध असून केवळ त्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने अपिलार्थी ही

माहिती त्यांच्याकडे मागवित आहेत. अपिलार्थीने शासनाकडे त्यांच्याविरुध्द अनेक तक्रारी केल्या असून या तक्रारीसोबत ही माहिती अपिलार्थीने जोडली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मागितलेली माहिती ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या कार्यालयाशी संबंधित होती. अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयास शम्स उलूम उर्दू हायस्कूल, उस्मानाबादच्या मुख्याध्यापकपदी देण्यात आलेल्या नियुक्ती मान्यतेच्या प्रती व या अनुषंगाने इतर कागदपत्रांच्या प्रती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे मागितल्या होत्या. शाळेच्या मुख्याध्यापक पदाच्या नेमणुकांना शिक्षणाधिकारी कार्यालयातर्फे मान्यता देण्यात येते, त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती ही शिक्षणाधिका-यांनीच त्यांना देणे भाग होते, मात्र या प्रकरणी त्यांनी आपली जबाबदारी झटकून अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेकडे पाठविला व त्यांच्यावर अपिलार्थीस माहिती देण्याची जबाबदारी टाकली. शिक्षणाधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही शिक्षणाधिकारी कार्यालयाशी संबंधित असल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील देखील शिक्षणाधिकारी कार्यालयापेक्षा वरीष्ठ अधिका-याने ठरविणे गरजेचे होते. परंतु या ठिकाणी तसे घडलेले नाही. सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी, उस्मानाबाद हे शिक्षणाधिकारी कार्यालयाचे जन अपिलीय अधिकारी नाहीत, हे पाहता असे आदेशित करण्यात येत आहे की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिका-याने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्यास अपिलार्थी उस्मानाबाद जिल्हा परिषदेमधील या प्रकरणाशी संबंधित नियुक्त केले गेलेले जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे प्रथम अपील अर्ज करु शकतील व त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्यास ते राज्य माहिती

आयोगाकडे अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख शाकिर अहमद अ. गफूर, खाजा नगर गल्ली नं. (१३), उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, शम्सूल उलूम उर्दू हायस्कूल, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५४७

निर्णय दिनांक ०८-०६-२००९

१ श्री. निळकंठ विश्वनाथ शेळके, : अपिलार्थी
मु. पो. डोंगरगाव, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना स्वस्त धान्य दुकानाच्या अे. पी. एल., बी. पी. एल., अंत्योदय व अन्नपूर्णा योजनेतील लाभार्थ्यांच्या नावाची यादी मिळण्याबाबत आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ए. पी. एल., बी. पी. एल., अंत्योदय, अन्नपूर्णा योजनेतील स्वस्त धान्य दुकानाशी संलग्नीत लाभार्थ्यांच्या नावाची यादी मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०१-२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील पेशकार श्री. बनसोड यांच्यामार्फत दिनांक ०४-०६-२००९ रोजी दुपारी ०३-५० वाजता दूरध्वनीद्वारे सूचना देऊनही आज कोणीही उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ११-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असून तिची व्याप्ती अत्यंत मर्यादित आहे. ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फार मोठे श्रम घ्यावे लागले असते अथवा त्यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ प्रमाणाबाहेर

वळवावे लागले असते अशातली कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. एवढे असूनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी अपील करण्यापूर्वी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०१-२००८ रोजी लेखी पत्राव्दारे देखील ही माहिती मिळण्याची विनंती केली होती. परंतु अपिलार्थीच्या या स्मरणपत्रास देखिल जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १७-०१-२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता त्यामध्ये देखील जन अपिलीय अधिकारी यांनी नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी या प्रकरणी जाणीवपूर्वक कसूर केल्याचे दिसून येते असे आपले अभिप्राय या निर्णयामध्ये स्पष्टपणे दिले आहेत हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक हे या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी जबाबदार असल्याचे दिसून येत आहे.

आज सुनावणीसाठी आयोगाच्या कार्यालयातर्फे दूरध्वनीवर निरोप देऊनही जन माहिती अधिकारी अथवा त्यांच्या प्रतिनिधीपैकी कोणीही आज सुनावणीस हजर नाहीत. आपल्या अशा प्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीमुळे व विशेषतः अपिलार्थीस या प्रकरणी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी कोणताही प्रतिसाद न दिल्याने संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस पात्र ठरत आहेत, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न

झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेला विलंब त्यांना मान्य आहे असा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे हे आदेश तात्काळ उपलब्ध करुन देण्याची जिल्हाधिकारी नांदेड यांनी दक्षता घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना २५००० रुपये इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी, आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत सरळ सादर करावा.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. निळकंठ विश्वनाथ शेळके, मु. पो. डोंगरगाव, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी नांदेड यांना निर्णयातील सूचनांच्या अनुपालनास्तव

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७१७

निर्णय दिनांक ०८-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल,<br>रा. समिराबाग, खडकपुराच्या मागे,<br>नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, कुसूमताई चव्हाण प्राथमिक शाळा,<br>ज्ञानेश्वरनगर, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सचिव, सेवालाल शिक्षण संस्था देगलूर,<br>मार्फत मुख्याध्यापक, कुसूमताई चव्हाण प्राथमिक शाळा,<br>ज्ञानेश्वरनगर, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी त्यांच्या दिनांक ०४-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुसूमताई चव्हाण प्राथमिक शाळा, ज्ञानेश्वरनगर, नांदेड यांच्याकडे त्यांच्या शाळेविषयी काही माहिती मागविली असता मुख्याध्यापकाने अर्जदारास माहिती देण्यासाठी जास्तीचे शुल्क आकारल्याचे वाटल्यामुळे त्यांनी दिनांक ०५-०८-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिल अर्जावर

सचिव, सेवालाल शिक्षण संस्था, देगलूर यांनी कोणताही निर्णय न देता अपील प्रलंबीत ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नावाची यादी व त्यांच्या आस्थापनाविषयक इतर अनेक मुद्दयावर शाळा स्थापन झाल्यापासून ते दिनांक ०४-०७-२००७ या कालावधीशी संबंधित माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी कोणीही हजर नाहीत.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. याचबरोबर अपिलार्थीने देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे हा अर्ज खरोखरच केला होता किंवा कसे हे देखील आवश्यक त्या पुराव्याअभावी आयोगास कळण्यास मार्ग नाही. असाच प्रकार अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या त्यांच्या दिनांक ०५-०८-२००७ रोजीच्या कथित अपील अर्जाच्या संदर्भात झालेला आहे. अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज सचिव, सेवालाल शिक्षण संस्था, देगलूर यांच्याकडे केला आहे. हा अपील अर्ज संबंधित सचिवांना प्राप्त झाला किंवा कसे हे आयोगास कळण्यास आवश्यक त्या पुराव्याच्या अनुपलब्धतेमुळे मार्ग नाही. आता शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७ /१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये अशा प्रकरणी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली असल्याने, असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा दिनांक ०५-०८-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज हे आदेश

निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे पाठवावा. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीकडून दिनांक ०५-०८-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

३. अपिलार्थी यांनी, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे त्यांचा दिनांक ०५-०८-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-०६-२००९

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या मागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुसूमताई चव्हाण प्राथमिक शाळा, ज्ञानेश्वरनगर, अंबिका मंगल कार्यालय जवळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, सेवालाल शिक्षण संस्था देगलूर, मार्फत मुख्याध्यापक, कुसूमताई चव्हाण प्राथमिक शाळा, ज्ञानेश्वरनगर, अंबिका मंगल कार्यालय जवळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७१८

निर्णय दिनांक ०८-०६-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, पू. साने गुरुजी प्राथमिक विद्यालय,
गांधीनगर, बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, आंतर भारती शिक्षण संस्था, बिलोली
मार्फत पू. साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, गांधीनगर,
बिलोली, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : १ श्रीमती पेरके शैलजा जयवंतराव,
२ श्रीमती हेमप्रभा माधवराव पाटील,
३ श्री. मठपती विश्वनाथ बसलिंग,
४ श्री. सुरेश शेषेराव सोनकांबळे,
५ श्री. राजुरे बालाजी विश्वनाथ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांच्या शाळेतील पाच शिक्षकांच्या जात व वैधता प्रमाणपत्राबाबत काही माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद दिला. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००७ रोजी प्रथम अपील करुनही त्यांच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेत कार्यरत असलेल्या सह शिक्षिका श्रीमती पेरके श्रीमती शैलजा जयवंतराव, श्रीमती हेमप्रभा माधवराव पाटील, सह शिक्षक श्री. विश्वनाथ बसलींग मठपती, श्री. सुरेश शेषेराव सोनकांबळे व श्री.राजुरे बालाजी विश्वनाथ यांची जातपडताळणी झाल्यासंदर्भात संबंधित समाजकल्याण अधिकारी यांच्याकडून प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्रयस्थ पक्ष बी. व्ही.राजुरे यांच्यासंदर्भात जात पडताळणी प्रमाणपत्र पाठविले व उर्वरित चार शिक्षकांच्या संदर्भात त्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, आंतर भारती शिक्षण संस्था, बिलोली यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थी यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची आवश्यकता असल्याचे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील श्री. राजुरे यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध होते व त्याप्रमाणे त्यांनी ते अपिलार्थीस दिले आहे. मात्र उर्वरित चार शिक्षकांनी त्यांची जात पडताळणी प्रमाणपत्रे अद्याप त्यांच्याकडे सादर केलेली नाहीत. अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहितीची मागणी केली आहे त्या प्राधिकरणास शासनाकडून संबंधित शिक्षकांच्या वेतनासाठी १०० टक्के अनुदान नियमाप्रमाणे प्राप्त होत असते. त्यामुळे या प्राधिकरणावर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आस्थापनाविषयक परिपत्रकांमधील सूचनांचे पालन करणे अनिवार्य आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, या शिक्षण संस्थेस शासनाकडून संबंधित शिक्षकांच्या वेतनाप्रीत्यर्थ १०० टक्के अनुदान प्राप्त होत असूनही शासनाच्या सूचनांचे पालन साने गुरुजी प्राथमिक विद्यालय हे करत नाही. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी या शाळेतील ज्या शिक्षकांनी त्यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रत अद्यापही सादर केली नाही, त्यांच्याकडून शासनाच्या प्रचलीत आदेशाप्रमाणे, ती एका निश्चित मुदतीत प्राप्त करुन घ्यावी. अन्यथा संबंधित संस्थेवर शिक्षण विभागाच्या प्रचलीत आदेशानुसार योग्य ती कार्यवाही त्वरेने करावी.

माहिती अधिकार अधिनियमाच्या कक्षेत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही अर्जदाराला मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती प्राप्त होणे अभिप्रेत आहे. त्याचबरोबर या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य दिली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या उर्वरित माहितीसंदर्भात वरील परिच्छेदात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना आदेश दिले आहेत. या प्रकरणी उर्वरित कर्मचा-यांकडून त्यांची जात पडताळणी प्रमाणपत्रे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस त्यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राची त्यांना आवश्यकता वाटल्यास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार वेगळ्या अर्जाव्दारे या जात पडताळणी प्रमाणपत्राची मागणी अलाहिदा करता येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी या शाळेतील ज्या शिक्षकांनी त्यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रत अद्यापही सादर केली नाही, त्यांच्याकडून ती एका निश्चित मुदतीत प्राप्त करुन घ्यावी. अन्यथा संबंधित संस्थेवर शिक्षण विभागाच्या प्रचलीत आदेशानुसार योग्य ती कार्यवाही त्वरेने करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, पू. साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, गांधीनगर, बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, आंतर भारती शिक्षण संस्था, बिलोली मार्फत पू. साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, गांधीनगर, बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७१९

निर्णय दिनांक ०८-०६-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक, नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार रितसर अर्ज दिनांक १७-०२-२००७ रोजी केला असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०४-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही व त्यांना माहिती देण्यासाठी जाणुनबुजून टाळाटाळ होत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड वन विभागाअंतर्गत सिमेंट पोल पुरविणे व बसविण्यासाठी सिमेंट पोल तयार करण्याच्या अटी व नियमाप्रमाणे प्रत्येक गुत्तेदाराने गुरुगोविंदसिंघ इंजिनिअरिंग कॉलेज यांच्याकडून पोल योग्य आहे याच्या घेतलेल्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती व तसेच नियम व अटीप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र, आयकर प्रमाणपत्र, विक्रीकर प्रमाणपत्राच्या सत्यप्रती, तसेच नांदेड, भोकर, इस्लापूर, किनवट, माहूर, मांडवी, बोधडी, मुखेड, हदगांव व देगलूर या ठिकाणी बसविलेल्या सिमेंट पोलांची व्हिडीओ शुटींग, याची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहिती-पोटीचे शुल्क रुपये २१० इतके त्यांच्या कार्यालयात मनीऑर्डरने अथवा शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस दिनांक १७-०५-२००७ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाले व यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना मूळ अर्जातील माहितीची आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले. तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०९-०३-२००७ रोजीचे पत्र दिनांक १७-०५-२००७ रोजी पोस्टाव्दारे प्राप्त झाल्याचा

आवश्यक तो पुरावा आयोगास दाखविला. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये या कामासंदर्भात केलेल्या व्हिडीओ शुटींगची प्रत त्यांना आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक ०९-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २१० इतके भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे दिनांक ०९-०३-२००७ रोजीचे पत्र त्यांना दिनांक १७-०५-२००७ रोजी प्राप्त झालेले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०३-२००७ रोजी पत्र पाठविल्याचा कोणताही सबळ पुरावा, जसे त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची सत्यप्रत उपलब्ध नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे पत्र त्यांना तीस दिवसाच्या कालावधीमध्ये प्राप्त झाले हे मान्य करण्यात येत नसून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने, वन विभागाकडे मूळ कामामध्ये सुमारे पाच कोटीचा भ्रष्टाचार करण्यात आला असून प्रत्यक्षात काम न करता या कामाचे बील उचलले गेले आहे अशा अर्थाची तक्रार आयोगाकडे केली आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांची वन विभागाच्या कामासंदर्भात काही तक्रार असल्यास, त्यांनी वन विभागाच्या अथवा जिल्हयातील संबंधित पोलीस यंत्रणेशी संपर्क साधून आपल्या तक्रारीची तड लावून घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), नांदेड यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ५४८/०८ व ५४९/०८

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५४८ व ५४९
निर्णय दिनांक ०९-०६-२००९

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
रा. पूर्णा,ता.पूर्णा,जि.परभणी

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, रविंद्रनाथ टागोर कनिष्ठ महाविद्यालय, परभणी | जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, लोककल्याण शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद द्वारा प्राचार्य रविंद्रनाथ टागोर कनिष्ठ महाविद्यालय,परभणी | : प्रतिवादी |
| २. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय,परभणी, जि.परभणी | जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,जगदंबा विद्या प्रसारक मंडळ,द्वारा प्राचार्य,राजर्षी शाहू महाविद्यालय,परभणी, जि.परभणी | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०२.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले क्र.५४८/०८ व ५४९/०८ आयोगाच्या विचाराधीन असून या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एकाच स्वरुपाची असल्याने या दोनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

या दोनही अपील अर्जांपैकी अपिलार्थीने अपील क्र. ५४८/०८ मध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती दिली नाही व जन अपिलीय

अधिकारी तथा सचिव, लोककल्याण शिक्षण प्रसारक मंडळ,औरंगाबाद यांनी अपील स्वीकारले नाही आणि अपील क्र.५४९/०८ मध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती दिली नाही, म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे प्रथमतः दोनही प्रकरणात जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, रविंद्रनाथ टागोर कनिष्ठ महाविद्यालय, परभणी व प्राचार्य, राजर्षी शाहु महाविद्यालय,परभणी यांच्याकडे त्यांच्या दि. २५.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे एकाच प्रकारची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये प्राचार्य रविंद्रनाथ टागोर महाविद्यालय व प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय यांच्याकडे जून २००१ ते जून २००६ या कालावधीमधील माहिती मागितली होती. या दोनही प्रकरणात अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. या दोनही प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कर्मचाऱ्यांचे नाव, शिक्षण,विषय व त्यांची नियुक्ती दिनांक, महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांचे वेतन पत्रक व नियुक्तीपत्रकाच्या प्रती- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या अर्जास दोनही जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.१०.२००७ रोजी सचिव, लोककल्याण शिक्षण प्रसारक मंडळ,औरंगाबाद व सचिव, श्री जगदंबा विद्या प्रसारक मंडळ,परभणी यांच्याकडे संबंधित कॉलेजच्या प्राचार्यामार्फत प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज अपिलार्थीने खाजगी कुरिअर संस्था- इंटरसिटीलॅण्ड कुरीयर मार्फत व तदनंतर रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली असता, सचिव, लोककल्याण शिक्षण प्रसारक मंडळ,औरंगाबाद यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील स्वीकारण्याचे पूर्णतया नाकारले व सचिव, श्री जगदंबा विद्या प्रसारक मंडळ,परभणी यांनी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविलेले अपिलार्थीचे अपील

स्वीकारले. परंतु दोनही अपील प्रकरणी जन अपिलीय अधिकाऱ्यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थी हे माहितीपासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दि.०९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित आहेत. दोनही जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद येथील कार्यालयातून दि.१८.०५.२००९ रोजीच्या सूचनापत्राद्वारे तसेच दि. ०५.०६.२००९ रोजी दुपारी १२.०० वा. अनुक्रमे प्रा. सानप, प्रा.गायके यांच्यामार्फत कळवूनही या दोनही प्रकरणातील जन माहिती अधिकारी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, याची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मूळ अर्जांव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही स्पष्ट स्वरुपाची असल्याने आणि अशाप्रकारची माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ व ९ च्या तरतुदींचा कोणत्याही प्रकारे भंग होत नसल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होणारी व व्याख्येशी सुसंगत आहे.अपिलार्थीचे माहितीसाठीचे दोन्ही मूळ अर्ज खाजगी कुरिअर सेवेमार्फत पाठविले असून या संबंधात अपिलार्थीने संबंधित कुरिअरची पावती आयोगास दाखविली. यावरुन दोनही प्रकरणी अपिलार्थीचे माहितीसाठीचे मूळ अर्ज संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. दोनही महाविद्यालयांना शासनामार्फत कर्मचाऱ्यांच्या वेतनाप्रित्यर्थ अनुदान प्राप्त

होत आहे. त्यामुळे ही दोनही महाविद्यालये अधिनियमातील कलम २ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण होत असल्याने या महाविद्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी जशाच तशा लागू होत आहेत. अपिलार्थीच्या दि. २५.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास दोनही जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ द्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये आढळून येत नाही. सबब दोनही जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी.

वरील दोनही प्रकरणी संबंधित संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीस दि. २३.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय दिला नाही व सचिव, लोककल्याण शिक्षण प्रसारक मंडळ यांनी तर अपिलार्थीचे प्रथम अपीलच स्वीकारण्यास नकार दिला. या दोन्ही संस्थेच्या सचिवांची ही कृती माहिती अधिकार अधिनियमाच्या पावित्र्याचा भंग करणारी आहे. सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद व शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, परभणी यांनी उपरोक्त प्रकरणी या संस्थेच्या सचिवांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील अशाप्रकारच्या बेजबाबदारपणाची व बेपर्वा वर्तनाची यथायोग्यरित्या दखल घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. (हा आदेश त्यांना, माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(८)(क)(चार) मधील तरतुदीनुसार तसेच शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकःसंकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७,दि.२६.११.२००७ अन्वये शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांची आता जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे, त्यानुसार देण्यात येत आहे.)

उपरोक्त दोनही प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब उपरोक्त प्रकरणी संबंधित दोनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी आवश्यक त्या माहितीपासून वंचित ठेवल्यामुळे त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. ५४८/०८ मान्य करण्यात येत आहे.
२. अपील क्र. ५४९/०८ मान्य करण्यात येत आहे.
३. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, रविंद्रनाथ टागोर कनिष्ठ महाविद्यालय,परभणी व प्राचार्य राजर्षी शाहू महाविद्यालय,परभणी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
४. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, रविंद्रनाथ टागोर कनिष्ठ महाविद्यालय,परभणी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी

शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

५. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय,परभणी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड,मुळे गल्ली,पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, रविंद्रनाथ टागोर कनिष्ठ महाविद्यालय,नवा मोंढा, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय,सुपर मार्केट,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

४. सचिव, लोककल्याण शिक्षण प्रसारक मंडळ,औरंगाबाद द्वारा प्राचार्य रविंद्रनाथ टागोर कनिष्ठ महाविद्यालय,नवा मोंढा, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, श्री जगदंबा विद्या प्रसारक मंडळ,द्वारा प्राचार्य राजर्षी शाहू महाविद्यालय,सुपर मार्केट,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५५०
निर्णय दिनांक ०९-०६-२००९

१ श्री.मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी
रा. पूर्णा, जि.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,पालम,
जि.परभणी
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२३.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पालम तालुक्यात सन २००५ व २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत शेतीपिकाचे नुकसानीमुळे शेतकऱ्यांना दिलेल्या अनुदानासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- पालम तालुक्यातील रहाटी, दुटका,गुंज,पारवा या चार गावातील शासनातर्फे अनुदान प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांची गावासह, नाव, पत्ता व गटनंबरसह यादी व अनुदान वाटपासंदर्भात शासनाचे परिपत्रक अथवा निकष यांच्या झेरॉक्स सत्यप्रती,- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २३४/-त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०१.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्काचा भरणा न करता राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे दि. २२.०२.२००८ रोजी द्वितीय अपील केले आहे व जन माहिती अधिकारी यांना त्याप्रमाणे कळविले.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीकडून, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्याचे माहित होताच जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०४.२००८ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ३०.०४.२००८ रोजी संपूर्ण माहिती मिळाल्याचे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाल्याचे आयोगास अवगत केले. अपिलार्थीस विनामूल्य माहिती देय नसताना देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर त्यांना विनामूल्य माहिती दिली आहे व या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले व या सर्व घटना अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्यानंतर घडल्या असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा,ता.पूर्णा,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,पालम,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५५१
निर्णय दिनांक ०९-०६-२००९

१ श्री. अशोक एस.बुधवंत, : अपिलार्थी
जिंतूर, जि.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
लागवड अधिकारी,
सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,जिंतूर, जि.परभणी
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
सामाजिक वनीकरण,परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, जिंतूर यांच्याकडे त्यांच्या दि. २१.०५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती मागितली असता, त्यांना माहिती पुरविली नाही, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी या अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही व त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त होण्यासाठी व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कठोरात कठोर दंडात्मक स्वरुपाची कारवाई करण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जिंतूर परिक्षेत्रातील सन २००५-०६ ते २००६-दि.२१.०५.२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती व या अर्जामध्ये त्यांनी, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने दि. ०८.१०.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०९.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले व त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली. तथापि अपिलार्थीस कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे  राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना तयार करावी लागेल, ही माहिती त्यांनी अद्यापपर्यंत तयार करुन ठेवलेली नाही, असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २१.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना व्यक्तिशः माहितीची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे जरी वादाच्या प्रयोजनार्थ जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीची, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेऊन

जाण्याची वाट पाहत बसले, असे जरी गृहीत धरले तरी आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन त्यांच्याकडे आजपावेतो, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार नसल्याचे दिसून येते. यामुळे असे सिध्द होत आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासंदर्भात कोणतीही सकारात्मक भूमिका या प्रकरणी कोणत्याही टप्प्यावर घेतली नव्हती. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०९.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे सूचना प्राप्त होऊनही आजतागायत अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती सध्याच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे देखील उपलब्ध नाही, ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींना निश्चितपणे छेद देणारी अशी कृती आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. या कृतीस संबंधित जन माहिती अधिकारी व सध्याचे कार्यरत जन माहिती अधिकारी हे सारखेच जबाबदार असल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणत्याही प्रकारे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक प्रतिसाद न देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यपध्दतीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (वने) यांना करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून माहिती हस्तगत करुन घेणे अनिवार्य आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (वने) यांना संबंधित सर्व जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक एस.बुधवंत,गुरुकृपा सदन,भूमि अभिलेख कार्यालयासमोर, आमदार कॉलनी,जिंतूर,जि.परभणी- ४३१ ५०९.

२. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी,सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,जिंतूर, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (वने), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५५२
निर्णय दिनांक ०९-०६-२००९

१ श्री. वसंत व्यंकटराव घोगरे, : अपिलार्थी
प्राथमिक शाळा,गोळेगाव कें.देऊळगाव (दु)
ता.पूर्णा जि.परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, परभणी
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः माहिती उपलब्ध नाही म्हणून माहिती दिली नाही. दि.३१.०१.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या दि.११.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची व अपूरी असून त्यांनी नियुक्त झालेल्या किती शिक्षकांचे निलंबन आदेशाचे पुनर्विलोकन झाले, ही माहिती दुष्ट भावनेतून,जाणूनबुजून दिलेली नाही. अपिलार्थीचे निलंबन हे गोळेगाव येथे झालेले असताना, त्यांचे प्राथमिक शाळा, खरवडा येथून निलंबन झाल्याचे दाखवून त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. अशाप्रकारच्या अभिप्रायाबरोबर या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना योग्य तो न्याय देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२४.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००५ ते जानेवारी २००७ या कालावधीमधील निलंबित शिक्षकांची माहिती, त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या प्रपत्रात देण्याविषयी मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली असून या अर्जासोबत अपिलार्थीने एक प्रपत्र जोडले असून या प्रपत्राच्या नमुन्यात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षिली होती. अपिलार्थीने जोडलेल्या प्रपत्रामध्ये - "अनुक्रमांक, निलंबित शिक्षकाचे संपूर्ण नाव,ज्या शाळेतून निलंबित झाले त्या शाळेचे व तालुक्याचे नाव, निलंबन आदेशाचे पुनर्विलोकन झाले आहे काय, असेल तर 'होय' नसेल तर 'नाही', पुनर्स्थापित पदस्थापनेत देण्यात आलेल्या शाळेचे व तालुक्याचे नाव व संबंधिताच्या विनंतीवरुन शाळा दिली असल्यास क्र.१ व प्रशासनाने दिली असल्यास क्र.२ -या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे विहित प्रपत्रात उपलब्ध नसल्याचे कळविले व तसेच अपिलार्थीस निश्चित कोणत्या शिक्षकाची माहिती पाहिजे, हे नमूद करण्याचे सूचित केले व त्यानंतर अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याची तयारी दर्शविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.१२.२००७ रोजी अंतिम निर्णय घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने विहित केलेल्या प्रपत्रामध्ये दि. ३१.०१.२००८ रोजी त्यांना विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एका विशिष्ट प्रपत्रात त्यांना अपेक्षित होती. तथापि ही माहिती त्यावेळी अपिलार्थीने विहित केलेल्या प्रपत्रामध्ये त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध नाही, असे कळविले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्यांच्या कार्यालयाकडून कोणत्याही शिक्षकाच्या निलंबन आदेशाचे पुनर्विलोकन केले गेले नाही. मात्र निलंबित शिक्षकांची पुनर्स्थापना करण्यात आली व ही माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.३१.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिली असून ती पूर्णतः सत्य आहे. अपिलार्थीचे निलंबन निश्चितपणे खरवडा ता.पूर्णा येथून झाले की प्राथमिक शाळा गोळेगाव येथून झाले, याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगास आज सांगू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका अपिलार्थीने तयार केलेल्या विशिष्ट प्रपत्रात माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, कार्यवाही करणे, अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या प्रपत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, जरी सदरच्या प्रपत्रात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती तयार नसेल तरी ती माहिती त्या प्रपत्रात तयार करुन नंतर ती अर्जदारास देणे, हे मूळात या प्रकरणी अभिप्रेत नाही. मात्र अपिलार्थीने या प्रपत्रामध्ये जे मुद्दे उपस्थित केले, त्या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या अभिलेख्यावर

उपलब्ध आहे, त्या अभिलेख्यांच्या प्रती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे भाग आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या प्रपत्रामधील रकाने पाहिले असता, यामध्ये रकाना क्र.४ मध्ये अपिलार्थीने, "निलंबन आदेशाचे पुनर्विलोकन झाले आहे काय, असेल तर 'हो',नसेल तर 'नाही' " अशा स्वरुपाची माहिती मागितली आहे, जी मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही, कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी ती सुसंगत नाही. असाच प्रकार, अपिलार्थीच्या प्रपत्रातील रकाना क्र. ६ च्या बाबतीत झाल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अशाप्रकारची प्रश्नोत्तराची प्रक्रिया मूळात अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या प्रपत्रातील रकाना क्र. ६ शी संबंधित माहिती देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या प्रपत्रामध्ये माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांच्या प्रपत्रातील रकाना क्र.४ मधील माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नसल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे या मुद्यावर व्यक्त केलेल्या त्यांच्या अभिप्रायाशी आयोग सहमत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये ते, गोळेगाव येथील शाळेतून निलंबित झाले असताना, ते खरवडा तालुका पूर्णा येथून निलंबित झाले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी दाखविले असल्याचे व त्यांना दिशाभूल करणारी व अपूर्ण माहिती दिली असल्याचे म्हटले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या निलंबन आदेशाची व पुनर्स्थापना केलेल्या आदेशाची प्रत त्यांनी पुन्हा तपासून, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच त्यांना अचूक माहिती पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये, -"श्री. सपकाळ एस.एच. यांच्यावरील कार्यवाहीचा दिनांकासहीत तपशील मिळावा"- अशी आयोगाकडे विनंती केली आहे. परंतु श्री. सपकाळ हे कोण आहेत व त्यांच्यावर निश्चितपणे काय कारवाई करण्यात आली, याचा उल्लेख अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात केलेला नाही. तसेच श्री. सपकाळ हे, अपिलार्थीने त्यांच्या मूळ

अर्जाद्वारे ज्या कालावधीशी संबंधित माहिती मागितली आहे, त्या कालावधीत ते निलंबित झालेले नव्हते. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती हवी असल्यास त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे या संदर्भात वेगळयाने अर्ज करुन ती मिळवावी लागेल. अपिलार्थीच्या आयोगाकडील द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी अशी विनंती केली आहे की, केंद्रीय मुख्याध्यापकाकडून दि. ०१.०९.२००७ रोजीच्या पत्रातील बाब क्र. ३ ची माहिती मागवून देण्यात यावी, जी विनंती शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी ते या प्रकरणी जन माहिती अधिकारी नाहीत म्हणून नाकारली आहे. मूळात अपिलार्थीचा विचाराधीन अपील अर्ज, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २४.०९.२००७ रोजीच्या केलेल्या प्रथम अर्जासंदर्भात विचारार्थ आहे. शिक्षणाधिकारी यांच्या दि.०१.०९.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, हे पत्र अपिलार्थीच्या दि. ०२.०८.२००७ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी लिहिले आहे. या पत्राचा विचाराधीन प्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याने अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचन पाहता, जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस त्यांनी दि. ३१.०१.२००८ रोजी दिलेल्या माहितीतील मुद्दा क्र.३ मध्ये तफावत आहे किंवा कसे, हे प्रथम तपासावे लागेल. त्यांनी दिलेल्या माहितीमध्ये तफावत नसेल तर त्यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे अवगत करावे व तफावत असेल तर ती तफावत दुरुस्त करुन अपिलार्थीस त्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत पत्राद्वारे कळवावे.

प्रसंगावशात, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे निलंबन आदेशाच्या पुर्नविलोकनासंदर्भात माहिती मागितली आहे. परंतु निलंबन आदेशाचे पुर्नविलोकन न करता संबंधित शिक्षकांची पुनर्स्थापना करण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. त्यामुळे अपिलार्थीचा निलंबन आदेशाचे पुर्नविलोकन व पुनर्स्थापनेचे आदेश यामध्ये वैचारिक गोंधळ झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित काही माहिती उघड करण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते

की, अपिलार्थीस ज्या सात शिक्षकांच्या संदर्भात पुनर्स्थापना केली असल्याचे त्यांनी म्हटले आहे, त्या शिक्षकांच्या पुनर्स्थापना आदेशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

सदर पुनर्स्थापनेचे आदेश ही सार्वजनिक स्वरुपाची माहिती असल्यामुळे ही माहिती देण्यासाठी त्रयस्थ पक्षाचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्याची आवश्यकता नाही.

या प्रकरणी अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे दुष्ट हेतूने माहिती दडविल्याचे अथवा अपिलार्थीची जाणूनबुजून दिशाभूल केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने व जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नसल्याने, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वसंत व्यंकटराव घोगरे, सहशिक्षक, प्राथमिक शाळा,गोळेगाव के.देऊळगाव (दु.) ता.पूर्णा जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५५३
निर्णय दिनांक ०९-०६-२००९

१ श्री. नारायण लिंबाजी पाटील-गायकवाड, : अपिलार्थी
रा.बांदरवाडङ्कि ता.पाथरी,जि.परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, निम्न दुधना प्रकल्प विभाग,
सेलू, जि.परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
जायकवाडी प्रकल्प मंडळ,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०२.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पैठण डावा मुख्य कालवा कि.मिटर १४५-५७० ते १४५-६९० आणि लांबी (९) मिटर खोदकाम व बांधकामाविषयी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"मुद्दा १ ला : पैठण डावा मुख्य कालवा कि.मिटर १४५-५७० ते १४५-६९० मधील खोदकामाचे देयक १३००२ तेरा हजार दोन रुपयाचे नोंद करुन ठेवले आहे. ते मला कधि देणार आहात.

मुद्दा २ रा : वाढीव लांबी (९) नऊ मिटर पैकी पाच (५) मिटर बांधकामाचे देयक मला दिले आहे. तरी वाढीव लांबी खोदकामाचे देयक मला कधि देणार आहात.

मुद्दा ३ रा : आज मी १९८२ पासुन सदरील प्रकरण अंतीम निकाली काढण्याकरीता सतत प्रत्यक्ष भेटुन किंवा पत्राने प्रयत्न करीत असुनही आपण अधिकारी निष्काळजी का करीत आहात."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित प्रकरण तीस वर्षापूर्वीचे जुने असल्यामुळे व संबंधित विभागाचे कार्यालय बंद झाले असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यास असमर्थता व्यक्त केली. तथापी तत्पूर्वीच अपिलार्थीने विहीत मुदतीत माहिती न मिळाल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३०.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस सशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे युक्तिवाद करुन अपिलार्थीने कोणतीही माहिती मागितली नसून, या अर्जाद्वारे तक्रार केली असल्याचे आयोगास अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीच्या अशाच माहितीकरिता केलेल्या दुसऱ्या संदर्भाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या बिलाची सद्यस्थिती अपिलार्थीस कळविण्याचे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस मूळात कोणतीही माहिती देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अभिप्रेत असलेल्या देयकाच्या तपासणीसंदर्भातील वस्तुस्थिती त्यांच्याकडील अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि. ११.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे स्पष्ट केलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्याकडे माहिती मागितल्यास ती माहिती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पुरविण्याबाबत कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये अर्जदार व जन माहिती अधिकारी यांच्यामध्ये प्रश्नोत्तर स्वरुपात माहितीची देवाणघेवाण अपेक्षित नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही पूर्णतया प्रशासकीय स्वरुपाची असल्याने या प्रकरणी अधीक्षक अभियंता, जायकवाडी प्रकल्प मंडळ,औरंगाबाद यांनी वैयक्तिक लक्ष घालून यासंदर्भातील आपले निर्णय अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत कळवावेत, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात मूळात ही माहिती त्यांना देय नसल्याने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या दि. ०२.०११.२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद देण्यासाठी कोणतीही अडचण नव्हती, तथापि त्यांनी माहिती नाकारण्याचा प्रतिसाद देखील अधिनियमातील कलम ७ द्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाचे

दर्शन होते, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी ४० दिवसांचा विलंब लावल्याचे सिध्द होत आहे. आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी ( श्री. एस.आर.तिरमनवार, सध्या कार्यकारी अभियंता, संकल्प चित्र कालवे विभाग, पुणे) आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या अर्जास अनुज्ञेय कालावधीपेक्षा ४० दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे एकूण रु.१००००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.१००००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**

**दिनांक : ०९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण लिंबाजी गायकवाड, रा.बांदरवाडा, ता.पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, निम्न दुधना प्रकल्प विभाग,सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,जायकवाडी प्रकल्प मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री.एस.आर.तिरमनवार (तत्कालीन जन माहिती अधिकारी), कार्यकारी अभियंता, संकल्प चित्र कालवे विभाग क्र.१ शंकरशेठ रोड,धोबी घाट कॅम्प,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(नोंदणीकृत टपालाद्वारे)

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५५४
निर्णय दिनांक ०९-०६-२००९

१ श्री. नंदकिशोर मेघराज व्यास, : अपिलार्थी
ता.जि. हिंगोली.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी लिपिक, न.प.हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी साक्षांकित करुन दिलेल्या नाहीत व तसेच प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ त्यांनी आपले लेखी निवेदन आयोगास सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी असे आदेशित केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती मिळाली तथापि या माहितीतील जोडपत्र 'ब' मधील मुद्दा क्र.२ व ३ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची आहे. ती सत्य स्वरुपातील माहिती त्यांना प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१९.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित एकूण ३ मुद्दे व ३० उपमुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १८.१२.२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत सर्व माहितीच्या साक्षांकित प्रती विनामूल्य पुरविण्याचे आदेशित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.१२.२००७ रोजी अपिलार्थीस माहिती पाठविली होती, ती माहिती देखील अपिलार्थीस समाधानकारक न वाटल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, सध्याचे जन माहिती व तत्कालीन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीपैकी काही प्रती साक्षांकित करुन दिलेल्या नाहीत, तसेच त्यांच्या मूळ अर्जातील जोडपत्र 'ब' च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही चुकीची आहे. त्यांच्या विधानापृष्ठयर्थ त्यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली यांचे तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांना उद्देशून लिहिलेले दि. ०८.०२.२००७ रोजीचे एक पत्र व नगर भूमापन विभागाकडील दाखल्याची प्रत आयोगास सादर केली आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये हिंगोली नगर परिषदेने दिलेल्या मूळ ठरावाच्या प्रतीबद्दल देखील आक्षेप घेतले असून, ही माहिती चुकीची असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दि. १७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पूर्णतया दिली आहे. ही माहिती त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरुन दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ आक्षेप त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण दोन मुद्यांवर मिळालेल्या माहितीसंदर्भात व दुसरा, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या सर्व प्रती साक्षांकित करुन दिल्या नाहीत, असा आहे.अपिलार्थीस साक्षांकित प्रती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी पूर्वी पुरविलेल्या माहितीपैकी जर काही माहितीच्या प्रती साक्षांकित करुन द्यावयाच्या राहिल्या असतील तर त्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत साक्षांकित करुन द्याव्यात. अपिलार्थीच्या आक्षेपातील दुसरा मुद्दा असा आहे की, त्यांना चौधरी पेट्रोल पंपाच्या बाजूला असलेल्या नाल्याचा सर्व्हेनंबर जन माहिती अधिकारी यांनी चुकीचा कळविला. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी सदरचा सर्व्हेनंबर तलाठयाकडील ७/१२ च्या उताऱ्यावरुन अपिलार्थीस कळविला आहे. तथापि अपिलार्थीस हे मान्य नाही. त्यांच्या युक्तिवादापृष्ठयर्थ त्यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली यांच्या तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयास उद्देशून लिहिलेल्या दि. ०८.०२.२००७ रोजीच्या पत्राचा आधार घेतला आहे. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यवाहीपृष्ठयर्थ आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये चौधरी पेट्रोल पंपाच्या बाजूच्या नाल्याचा कोणताही उल्लेख नाही त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी व संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांनी एकत्रितपणे अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या जागेची पहाणी केल्यास निश्चितपणे त्यांना अभिप्रेत असलेल्या जागेचा सर्व्हेनंबर प्राप्त होऊ शकेल, असे आयोगाचे मत आहे.सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, पूर्वनियोजित

वेळी, पंचांच्या समक्ष अपिलार्थीस अभिप्रेत असलेल्या जागेची पहाणी करावी व तदनंतर त्या जागेच्या मालकीचे अभिलेखे महसूल विभागाच्या सक्षम प्राधिकरणाकडून उपलब्ध करुन त्याची प्रत अपिलार्थीस विनामूल्य द्यावी. अपिलार्थीस जोडपत्र 'ब' वरील मुद्दा क्र.३ द्वारे त्यांना पुरविलेल्या कथित चुकीच्या माहितीबद्दल असे स्पष्ट करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात अपिलार्थीस दिली आहे. जर रजिस्टरमधील वरील नोंदीच जर अपिलार्थीस चुकीच्या वाटत असतील व अपिलार्थीचे याबद्दल काही आक्षेप असतील तर त्यांनी यासंदर्भात संचालक, नगर पालिका, प्रशासन मुंबई यांच्याकडे तक्रार करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व महसूल विभागाचे संबंधित अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत हिंगोली शहरातील चौधरी पेट्रोल पंपाजवळील नाल्याच्या जवळच्या, अपिलार्थीस अभिप्रेत असलेल्या जागेस भेट देऊन त्या जागेच्या मिळकतीची कागदपत्रे महसूल विभागाच्या सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घ्यावीत व त्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती अपिलार्थीस याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात असे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत साक्षांकित करुन विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी, अपिलार्थी व महसूल विभागाचे निर्णयामध्ये नमूद केलेले अधिकारी यांनी पूर्व नियोजित वेळी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ

माहितीसाठीच्या अर्जामध्ये अभिप्रेत असलेल्या जागेस भेट देऊन या जागेच्या मालकी हक्काच्या झेरॉक्स प्रती महसूल विभागाकडून प्राप्त करुन घेऊन त्या अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नंदकिशोर मेघराज व्यास,रा. मारवाडी गल्ली, हिंगोली, ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर पालिका, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५५५
निर्णय दिनांक ०९-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजेंद्र हिरामन कनकुटे,<br>ता.वसमत,जि. हिंगोली. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार<br>तहसील कार्यालय,वसमत,जि.हिंगोली | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, वसमत,जि.हिंगोली | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी गोपनीयतेच्या नावाखाली केलेल्या कार्यवाही अहवालाच्या प्रती अपूर्ण स्वरुपात दिल्या व माहिती विहित नमुन्यात दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनीही कोणतीही कारवाई न केल्याने, अपिलार्थीने विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०२.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे गॅस वितरण पध्दतीतील कार्यपध्दती व त्यावर कथित नियंत्रण करणाऱ्या शासकीय यंत्रणेसंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे नियमाप्रमाणे शुल्क भरुन माहिती हस्तगत

करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने शासकीय कोषागारात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१६/- भरुन माहिती हस्तगत करुन घेतली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस "तात्काळ माहिती नियमानुसार कळविण्यात यावी" असे सूचित केले. या निर्णयापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपिल राज्य माहिती आयोगाकडे सादर केले होते.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी एकूण तीन टप्प्यात अनुक्रमे दि.१५.११.२००७, १६.०२.२००८ व दि.१४.०३.२००८ रोजी माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या सहा मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे, त्यापैकी मुद्दा क्र.३ अंशतः, मुद्दा क्र.५ या दोन मुद्यांसंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित केल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबद्दल अथवा कृतीबद्दल कारणे व स्पष्टीकरण विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीचे समर्थन अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रिया अभिप्रेत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ मधील (अंशतः माहिती) - "गॅस एजन्सीकडून नियमित विक्री,शिल्लक यांचा कोटा आपल्या

कार्यालयाकडून नियमितपणे तपासला जातो काय?" व मुद्दा क्र. ५ मधील- "संबंधित अधिकाऱ्याने लेखी स्वरुपात काढलेल्या कार्यालयीन आदेशाचे एजन्सीमार्फत वेळोवेळी पालन केले जाते काय?" - या दोनही मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती आयोगास दाखविली तथापि या माहितीमधील कोणत्या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस कोणत्या दिवशी दिली, याचा बोध होत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता ही माहिती एकत्रित स्वरुपात विनामूल्य द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१,२, ३ (अंशतः) (तपासणी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याचे पदनाम) व मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती उपलब्ध आहे. मुद्दा क्र. ६ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, गॅस एजन्सीवर त्यांच्या विभागाचे कोणतेही नियंत्रण नाही. अर्जदाराने मागणी केलेले वरील प्रमाणे गॅस एजन्सी चालकाला त्यांच्या कार्यालयातर्फे कोणतेही लेखी आदेश दिले गेलेले नाहीत. अर्थात, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली नाही. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, मुद्दा क्र.३ अंशतः व मुद्दा क्र. ५ वगळता वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती एकत्रितपणे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांच्या दि. १३.११.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, असे दिसून येईल की, याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाप्रमाणे होणारी फी जमा करावी, असे सूचित केले आहे. तथापि या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या माहितीच्या अंदाजित पृष्ठांची संख्या व माहिती पुरविण्यासाठी लागणारा प्रतिपृष्ठ दर हा तपशील व एकूण शुल्क अपिलार्थीस कळविलेले नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (३)(क) चा जन माहिती अधिकारी यांनी भंग केला आहे परिणामी जन

माहिती अधिकारी यांचे दि.१३.११.२००७ रोजीचे अपिलार्थीस लिहिलेले पत्र पूर्णतः अवैध ठरत आहे. सबब या प्रकरणी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देय होत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु. १६/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीने या निर्णयामध्ये आदेशित केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून याच कालावधीत पूर्वनियोजित वेळी व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. ३ अंशतः व मुद्दा क्र. ५ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु.१६/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र हिरामन कनकुटे, अशोकनगर, खंदारबन जवळारोड,वसमत,ता.वसमत,जि.

हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,वसमत,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पूर्णा पाटबंधारे प्रकल्प वसाहत कॅम्पस कारखानारोड,वसमतनगर,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५५६
निर्णय दिनांक ०९-०६-२००९

१ श्री. मोतीराम गयबू काळे, : अपिलार्थी
मु.जानापुरी,पो.वडेपूरी, ता.लोहा,जि. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, : प्रतिवादी
तहसील कार्यालय,अर्धापूर,जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, अर्धापूर, जि.नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,अर्धापूर,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तहसीलदार, नायब तहसीलदार, पुरवठा अधिकारी यांनी केलेल्या दौरा डायरीसंबंधी सन २००२ ते दि. १०.१०.२००७ पर्यंतच्या कालावधीतील माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - केलेले दौरे, गावाचे नाव,तारीख व प्रत्येक दौऱ्याची केलेली व उचललेली बीले यांच्या प्रतींचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३१.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दि. ०८.११.२००७ रोजी

त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२४.०३.२००८रोजी माहिती दिल्याचे व ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीची दि.२४.०३.२००८ रोजीची पावतीची प्रत आयोगास सादर केली आहे. ही प्रत तहसीलदार,अर्धापूर यांनी दि. ०६.०६.२००८ रोजी साक्षांकित केली आहे. तथापि अपिलार्थीचा आज आयोगास फॅक्स संदेश प्राप्त झाला असून यामध्ये असे नमूद केले आहे की, तहसीलदार कार्यालय यांनी माहिती देतो असे म्हणून त्यांची सही कार्यालयातर्फे घेण्यात आली, परंतु त्यांना प्रत्यक्षात माहिती देण्यात आली नाही. त्यामुळे हे अपील त्यांनी मागे घेतलेले नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना तीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये टपालाद्वारे माहितीची मागणी केली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांच्या कार्यालयात दि. ०८.११.२००७ रोजी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्याचे कोणतेही कारण नव्हते. सबब जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावी लागेल. आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले

आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे,रा. जानापूरी, पो.वडेपुरी,ता.लोहा,जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,अर्धापूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,अर्धापूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५५७
निर्णय दिनांक ०९-०६-२००९

१ श्री. शेषराव एकनाथ टेकाळे, : अपिलार्थी
रा.कुपटी (मा),ता.माहूर,जि. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी, किनवट,जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, किनवट,जि.नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०५.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री.सतीश सर्जेराव कुरमे,कु.स्वाती विकास कुरमे व कु. प्रगती विकास कुरमे यांच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या प्रतीसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्रयस्थ पक्षाला जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिल्या गेलेल्या जातीच्या दाखल्याची प्रत व त्यांनी जातीच्या दाखल्यासाठी केलेल्या अर्जाबरोबर जोडलेल्या संपूर्ण कागदपत्रांच्या प्रती, व जन माहिती अधिकारी यांच्या कायालयाकडून त्रयस्थ पक्षाला अप्रगत उन्नत गटाचे प्रमाणपत्र दिले असेल तर त्या प्रमाणपत्राच्या प्रती मागितल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या संचिकेमध्ये आहे, ती संचिका त्यांना सापडत नसल्याचे कळवून अपिलार्थीस माहिती पुरविण्याबाबत असमर्थता व्यक्त केली. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०४.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. २९.०२.२००८ रोजी पाठविल्याचे आयोगास अवगत केले. यापृष्ठ्यर्थ त्यांच्या कार्यालयाच्या क्र.२००८/एमएजी/माअ/सीआर-४ दि. २९.२.२००८ रोजीच्या पत्राच्या प्रतींचे अवलोकन करता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.१.२००८ रोजीच्या त्यांच्या अर्जासंदर्भात दिली असल्याचे दिसून येते. यावर उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्टीकरण दिले की, अपिलार्थीने याच माहितीकरिता एकूण ५ प्रथम अर्ज व त्या अनुषंगाने ५ प्रथम अपिले केली असून प्रथमतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती, परंतु नंतर संबंधितांनी ही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि.२९.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे ही माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. २९.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेली

माहिती त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेषराव एकनाथ टेकाळे,मु.पो. कुपटी (मा.)ता.माहूर,जि. नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७२०
निर्णय दिनांक ०९-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मोहंमद अन्वरउल्ला खान पिता बरकतउल्ला खान, नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर,<br>जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु.११०/- इतके त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व चुकीची माहिती दिली असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यात यावी.

अपिलार्थीच्या दि.१३.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १० मुद्यांवर, "राज्य मार्ग २३० ते देवठाणा, एम.डी.आर. १७

कि.मी.४५/२०० ते ४७/९०० या रस्त्याचे नाबार्ड '९' या योजनेअंतर्गत घेतलेल्या डांबरीकरणाच्या कामासंदर्भात" माहिती मागितली होती. अपिलार्थीचा हा अर्ज प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांना दि.२३.०७.२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१३.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपाटीचे शुल्क रु.११०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित करुन अपिलार्थीस माहिती त्यांच्या कार्यालयातून हस्तगत करण्याचे सुचविले.

या प्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेतली तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व चुकीची माहिती मिळाल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२१.०८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२९.०९.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस वाचनीय स्वरुपाची व सांक्षाकित केलेली माहिती देण्याचे आदेशित केले. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१३.१२.२००७ रोजी माहिती पुरविली आहे. तथापी अपिलार्थीस प्राप्त झालेल्या या माहितीवर त्यांचे काही आक्षेप आहेत, जे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नोंदविलेले आहेत.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीस नक्की कोणती माहिती हवी आहे व प्रत्यक्षात त्यांना कोणती माहिती प्राप्त झाली, हे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे पृथक्करण, तिच्या तांत्रिक स्वरुपामुळे आयोगास करता येत नाही. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती दिली, ही माहिती देखिल आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सबब अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस दि. १३.१२.२००७ रोजी पुरविलेली माहिती व प्रत्यक्षात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी तपासावी व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपेक्षा जर जन माहिती

अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व विसंगत स्वरुपाची माहिती दिल्याचे सिध्द झाले तर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून स्वीकारलेले शुल्क त्यांना तात्काळ परत करावे व अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती परिपूर्णरित्या त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी निर्णयामध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहंमद अन्वरउल्ला खान पिता बरकतउल्ला खान,९-४-४५५,कय्युम प्लॉट्स, नांदेड-४३१६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७२१
निर्णय दिनांक ०९-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि. १८.०४.२००७ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांना माहिती मागितली असता, त्यांनी मुदतीत माहिती न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यास जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे- परभणी जिल्हयातील एकूण घाऊक,अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांच्यावर काळाबाजार केल्याबद्दल १९९० पासून मार्च, २००७ पर्यंत ज्या लोकांवर गुन्हे दाखल झाले आहेत,

अशा सर्व घाऊक,अर्धघाऊक विक्रेत्यांवर गुन्हा नोंदविलेल्या केसेसचे गुन्हा नोंद क्रमांक व पंचनामा व गुन्हा दाखल झाल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांनी त्यांच्यावर कोणत्या प्रकारची दंडात्मक कारवाई केली- याची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी एप्रिल १९९० ते मार्च, २००७ पर्यंतचा आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.३०.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीस माहिती नाकारताना, जन माहिती अधिकारी यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेल्या पत्राचा संदर्भ दिलेला आहे. तथापि यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१५.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०६.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. अपिलार्थीचे अपील नामंजूर करताना जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८(१)(ख)(ज) मधील तरतुदींचा आधार घेतला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देऊनही जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याचे नमूद करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्याकडील कार्यवाही आता पूर्ण झाली असून संबंधितांवर न्यायालयामध्ये खटले चालू आहेत व ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना कोणताही प्रत्यवाय नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे फक्त ज्या विक्रेत्यांवर गुन्हा दाखल झाला आहे, अशा सर्व घाऊक व अर्धघाऊक विक्रेत्यांवर गुन्हा नोंदविलेल्या केसच्या गुन्हा क्रमांक, पंचनाम्याच्या प्रती व केलेली कारवाई एवढीच माहिती मागितली होती. ही माहिती देण्यासाठी कोणत्याही न्यायालयाने जन माहिती अधिकारी यांना प्रतिबंध केलेला नाही आणि ही सर्व कागदपत्रे जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यातर्फे आता न्यायालयात सादर करण्यात आली आहेत व यासंदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. यामुळे आता ही माहिती उघड झाली असल्याने त्यांना आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्यास कोणताही प्रत्यवाय राहिल्याचे दिसून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे देय असलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

अपील क्रमांक :-२७२१/२००७

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल युसूफ,रा.मिलकॉर्नर,बसस्टॅण्ड रोड,नांदेड जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५५८

निर्णय दिनांक १०-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. चंद्रकांत रुस्तुम मोरे,<br>व्दारा, श्रीनाथ जनरल स्टोअर्स, चाणक्य कॉम्पलेक्स,<br>कचेरी रोड, जुना जालना, जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय गोलापांगरी,<br>तालुका जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सचिव, गोलापांगरी शिक्षण प्रसारक मंडळ, गोलापांगरी,<br>तालुका जिल्हा जालना | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना संबंधितांकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त न झाल्याने सदरचे अपील केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००५ ते १०-१२-२००७ या कालावधीशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" शाळेतील मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवापुस्तिका नव्याने तयार करुन मा. लेखाधिकारी (शिक्षण) जालना यांची पडताळणी केलेल्या सेवापुस्तिकांची झेरॉक्स प्रत मिळणेबाबत."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११६० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. हे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०१-२००८ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०१-२००८ रोजी पत्र पाठवून अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११६० इतके भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा का केला नाही असे आयोगाने विचारले असता अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांनी दिनांक २८-१-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे त्यांनी संबंधित संस्थेच्या सचिवाकडे यासंदर्भात संदर्भ केला होता. अपिलार्थीच्या संस्थेस उद्देशून लिहिलेल्या दिनांक २८-०१-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता या पत्राव्दारे अपिलार्थीने नेमके काय म्हणावयाचे याचा बोध आयोगास होत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला. यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या शाळेत वरिष्ठ लिपीक या पदावर नोकरीस होते. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली कागदपत्रे स्वतःच गहाळ केली असल्यामुळे त्यांच्याविरुध्द पोलिसात तक्रार देखील दिलेली आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने शुल्काचा भरणा न केल्याने ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास देण्यासंदर्भात कार्यवाही करणे हे मूलतः अभिप्रेत आहे. या अधिनियमान्वये अर्जदारास त्यांच्या विनंतीप्रमाणे कागदपत्रे तयार करुन नंतर ती अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे नव्याने माहिती तयार करुन तदनंतर ती अपिलार्थीस देण्याविषयी विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत नसल्याने व जन माहिती अधिकारी यांचा वरील युक्तिवाद लक्षात घेता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य

असल्याच्या  निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत रुस्तुम मोरे, व्दारा, श्रीनाथ जनरल स्टोअर्स, चाणक्य कॉम्पलेक्स, कचेरी रोड, जुना जालना, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय गोलापांगरी, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, गोलापांगरी शिक्षण प्रसारक मंडळ, गोलापांगरी, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५५९

निर्णय दिनांक १०-०६-२००९

१ श्री. रामचंद्र विश्वनाथ कंटोले, : अपिलार्थी
रा. कुंभार पिंपळगाव, तालुका घनसावंगी,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, घनसावंगी,
तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी विचाराधीन अपील त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत माहिती प्राप्त न झाल्याने आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०५-२००३ ते ३१-०५-२००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - फी

भरणा-याचे नांव व संपूर्ण पत्ता, फी भरल्याचा दिनांक व रक्कम, मोजणी झाल्याची तारीख, " क " प्रत दिल्याची तारीख व प्रकरण निकाली काढल्याची तारीख - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला हा अर्ज अधिनियमाव्दारे विहित केलेल्या नमुन्यात नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे त्यांच्या कार्यालयात येऊन ती माहिती पाहून जाण्याचे सूचित केले. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-१२-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर करुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि यानंतरही अंदाजे अडीच महिन्याचा कालावधी व्यपगत होऊनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती दिनांक ०९-०४-२००९ रोजी, त्यांनी १४२ रुपये इतक्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पावती क्रमांक ४१०५०९७ या क्रमांकाच्या पावतीने केल्यानंतर, प्राप्त झाली. अपिलार्थीने त्यांना

आवश्यक असलेल्या माहितीपोटी १४२ रुपये इतक्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यासंदर्भात अपिलार्थीने आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला आहे.

प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे असे अभिप्राय आहेत की, त्यांच्या प्रकरणाची सुनावणी न घेता त्यांचे प्रकरण जन माहिती अधिकारी यांनी निकाली काढल्याचे या माहितीमध्ये नमूद केले आहे त्यामुळे ही माहिती त्यांना चुकीची असल्यासारखे वाटते.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे व ही माहिती त्यांच्याकडील ज्या रजिस्टरवरुन अपिलार्थीस द्यावयाची होती त्या रजिस्टरचे आकारमान मोठे असल्याने त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस माहिती पाहून जाण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २०-१२-२००७ रोजीच्या निर्णयानुसार त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०४-२००९ रोजी, त्यांना माहितीपोटी १४२ रुपये इतक्या शुल्काची आकारणी करुन माहिती उपलब्ध माहिती दिली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक ०९-०४-२००९ रोजी सशुल्क पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २०-१२-२००७ रोजीच्या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य अथवा सशुल्क माहिती पुरवावी यासंदर्भात कोणताही उल्लेख केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती पाहता, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी किमान जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत देण्यास हरकत नव्हती. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी अंदाजे सव्वा वर्ष इतका कालावधी घेतला आहे. हा विलंब पाहता जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची कृती समर्थनीय होत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त

प्रकरणी अपिलार्थीकडून माहिती पुरविण्यापोटीचे आकारलेले शुल्क रुपये १४२ इतके त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस परत करावे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर स्वतःचे वैयक्तीक अभिप्राय नोंदवून या माहितीचा स्वतःच्या विनंतीशी संबंध जोडून जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची असल्याचा आयोगाकडे युक्तिवाद केला आहे. तथापि हा युक्तिवाद आयोग मान्य करीत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याप्रमाणे ती अर्जदारास द्यावयाची असते, त्याप्रमाणे त्यांनी कृती केली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीबद्दल काही आक्षेप असतील तर त्यांनी, ह्या आक्षेपांची त्यांच्या वरिष्ठांकडून तड लावून सोडवणूक करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून दिनांक ०९-०४-२००९ रोजी माहितीपोटीचे आकारलेले शुल्क रुपये १४२ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद

दिनांक १०-०६-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामचंद्र विश्वनाथ कंटोले, रा. कुंभार पिंपळगाव, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५६०

निर्णय दिनांक १०-०६-२००९

१ श्री. साहेबराव देवराव पोटभरे, : अपिलार्थी
रा. जंम्बोदिप निवास, नविन भाटवडगांव मंजरथ रोड,
माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,
माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २५-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश दिले नाहीत व आवश्यक ती माहिती न दिल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-१०-२००७ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले होते. सदरचा अर्ज जन अपिलीय अधिकारी

यांना दिनांक २५-१०-२००७ रोजी प्राप्त झाला. मात्र या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही. या प्रकरणी या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगांव यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद

दिनांक १०-०६-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. साहेबराव देवराव पोटभरे, रा. जंम्बोदिप निवास, नविन भाटवडगांव मंजरथ रोड, माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५६१

निर्णय दिनांक १०-०६-२००९

१ श्री. अशोक विठ्ठलराव वाघचौरे, : अपिलार्थी
शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय आणि रुग्णालयाचे
निवासस्थान प्रकार-२ बिल्डींग सुरसा, ब्लॉक क्रमांक ५४,
आय. टी. आय. गेट समोर, तुळजापूर रोड,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय आणि
रुग्णालय, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय आणि
रुग्णालय, उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय आणि रुग्णालय, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना सत्य माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ करुन त्यांनी मागणी केलेल्या माहितीसाठी ४० ते ५० रुपये

एवढा खर्च अपेक्षित असतांना त्यांच्याकडे यासाठी २९०० रुपयांची मागणी केली. सदर शुल्क त्यांच्याकडून भरुन घेतले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी केलेला भ्रष्टाचार लपविण्यासाठी ते माहिती लपवित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या जबाबदारीची टोलवाटोलवी करुन, टाळाटाळ करुन त्यांचे लक्ष दुसरीकडे वेधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या प्रकरणी अपिलार्थीस झालेला मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास याबद्दल त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून नुकसानभरपाई प्राप्त व्हावी व यासंदर्भात त्यांनी काढण्यात आलेले सर्व आदेश रद्द करण्यात यावे, अशी त्यांनी आयोगास या अर्जाच्या शेवटी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या परिसरातील निवासस्थानाची व त्यातील वीज वापरण्यासंदर्भातील माहिती एकूण बारा मुद्दे व त्यातील अनेक उपमुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २९०० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ३०-१०-२००७ रोजी केल्यानंतर जन माहिती अधिकारी अपिलार्थीकडे दिनांक ०३-११-२००७ रोजी व्यक्तिशः माहिती घेऊन गेले. तथापि अपिलार्थीने ती न स्वीकारता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती स्वीकृत न केल्याने

अपिलार्थीस माहिती न पाहता अपील करता येत नाही असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे युक्तिवाद ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर दिनांक ०३-११-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करुन ठेवली आहे. तथापि या माहितीचा स्वीकार अपिलार्थी करत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. त्याप्रमाणे ही माहिती अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-१०-२००७ रोजी केल्यानंतर दिनांक ०३-११-२००७ पासून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी तयार करुन ठेवली होती. मात्र अपिलार्थीने या माहितीचे अवलोकन करुन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा समावेश या माहितीमध्ये नसल्याचे अनुमान काढून जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती स्वीकृत करण्याचे नाकारले व राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या टप्प्यावर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेली माहिती प्रथमतः त्यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी. या माहितीचे

अवलोकन करुन या माहितीतील त्यांना कोणती अनावश्यक माहिती दिली असेल अथवा त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली कोणतीही माहिती पुरविली नसेल अशा प्रकारची माहिती त्यांनी अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय यांच्या निदर्शनास आणावी. अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर उपस्थित केलेल्या त्यांच्या अभिप्रायाचे निरसन अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीचे अभिप्राय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत करावे. वरील प्रकरणी आवश्यकता वाटल्यास अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलवावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये ब-याच प्रश्नावर व उपप्रश्नावर प्रश्नार्थक स्वरुपाची व जन माहिती अधिकारी यांचे खुलासे व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी विस्तृत व्याप्तीची माहिती विचारल्याचे दिसून येत आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील विहित तरतुदींशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक विठ्ठलराव वाघचौरे, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय आणि रुग्णालयाचे निवासस्थान प्रकार-२ बिल्डींग सुरसा, ब्लॉक क्रमांक ५४, आय. टी. आय. गेट समोर, तुळजापूर रोड,

उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय आणि रुग्णालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय आणि रुग्णालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्रमांक ५६२/२००८ व ५६३/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५६२ व ५६३

निर्णय दिनांक १०-०६-२००९

१ श्री. चंद्रकांत विश्वनाथ वारभुवन, : अपिलार्थी
मु. पो. पारगांव (घु.), तालुका पाटोदा,
जिल्हा बीड

२ श्री. संतोष तुकाराम घुमरे,
मु. पो. पारगांव (घु.), तालुका पाटोदा,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पारगांव (मोटे), तालुका वाशी,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट),
तालुका जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी दोनही अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०२-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

दोनही अपिलार्थींनी एकच माहिती संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे एकाच दिवशी मागितली असल्याने, यासंदर्भातील अपील एकाच जन अपिलीय अधिका-याकडे एकाच दिवशी केले असल्याने व यासंदर्भातील दोन स्वतंत्र व्दितीय अपिले एकाच दिवशी आयोगाकडे केली असल्याने या विचाराधीन अपिलांची सुनावणी आयोगातर्फे एकत्रित घेण्यात येत आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थींनी असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झाली नाही व यासंदर्भात त्यांनी दाखल केलेले प्रथम अपील, जन अपिलीय अधिकारी यांनी, गुणवत्तेवर निकाली काढले नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थींनी प्रथमत: त्यांच्या दिनांक ०६-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे " श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट), तालुका जिल्हा बीड " या संस्थेच्या संस्था स्थापनेसाठी वापरलेल्या मूळ घटना, दस्तऐवज ०१ ते शेवटच्या पानापर्यंत सत्यप्रतीत माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संस्थेशी संबंधित असल्याने त्यांना श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट) यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थींनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट) यांच्याकडे दिनांक १३-१०-२००७ रोजी प्रथम अपिले केली. अपिलार्थींच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-११-२००७ रोजी आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती संस्थेकडे उपलब्ध नसल्याने अपिलार्थींची प्रथम अपिले निकाली काढली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थींनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोनही प्रकरणांशी संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.

या प्रकरणापूवी, अपिलार्थी श्री. लहू रामभाऊ घुमरे यांच्या याच माहितीकरिताच्या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ३.६.२००९ रोजी घेण्यात आली होती त्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करतांना असा युक्तिवाद केला होता की, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट), तालुका जिल्हा बीड ही १९६० साली मूळात स्थापन झाली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे संस्थेच्या स्थापन सालाची म्हणजे अंदाजे ४९ वर्षापूर्वीची जुनी माहिती या अर्जाव्दारे मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या संस्थेच्या घटनेसंदर्भात त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाही, कारण मध्यंतरीच्या काळात सचिव पदावरील व्यक्ती बदलल्या गेल्या, सदर संस्था १२ वर्षे कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात होती तदनंतर आलेल्या सचिवांनी सर्व रेकॉर्ड त्यांच्याकडे घेऊन देखील संबंधित सचिवाकडून अद्यापपर्यंत त्यांना पूर्ण चॉर्ज मिळाला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांनी धर्मादाय आयुक्त यांच्याकडे देखील संस्थेच्या मूळ घटनेसंदर्भात विचारणा केली असता धर्मादाय आयुक्तांकडे देखील संस्थेची मूळ नोंदणी संचिका, घटना नियमावली उपलब्ध नसलयाचे त्यांना धर्मादाय आयुक्तांनी दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अवगत केले आहे. आता त्यांच्या संस्थेने दिनांक २८-१२-२००७ रोजी नव्याने घटना तयार केली असून त्या घटनेस त्यांनी धर्मादाय आयुक्तांची आवश्यक ती मान्यता प्राप्त करुन घेतली आहे. अपिलार्थीने नवीन घटनेच्या प्रतीची मागणी केल्यास ती अपिलार्थीस देण्यास ते तयार आहेत. या प्रकरणी ज्या सचिवांनी शाळेचे संपूर्ण रेकॉर्ड स्वतःकडे ठेवले होते त्यांच्याविरुध्द पोलीसाकडे व धर्मादाय आयुक्ताकडे तक्रारी केल्या आहेत, तथापि अद्यापपावेतो सदर रेकॉर्ड अप्राप्त आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, या संस्थेकडेच मूळात त्यांची मूळ स्थापनेच्या सालची घटनेची प्रत उपलब्ध नाही. अपिलार्थीस माहिती उपलब्ध न करुन देण्याचे कारण जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे हे पाहता, आता अपिलार्थीस संबंधित संस्थेकडून त्यांच्या मूळ घटनेची प्रत उपलब्ध होऊ शकणार नाही व नवीन घटनेची प्रत अपिलार्थीने मागणी केल्यास ती देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी तयार आहेत. अशा परिस्थितीत अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील क्रमांक ५६२/२००८ व ५६३/२००८ निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०६-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत विश्वनाथ वारभुवन, मु. पो. पारगांव (घु.), तालुका पाटोदा, जिल्हा बीड.

२ श्री. संतोष तुकाराम घुमरे, मु. पो. पारगांव (घु.), तालुका पाटोदा, जिल्हा बीड.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पारगांव (मोटे), तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी (घाट), तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५६४

निर्णय दिनांक १०-०६-२००९

१ श्री. तुकाराम गणपतराव गवारे, : अपिलार्थी
मु. खामगांव, पो. रेवकी, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : श्री. विलास अच्युत मोटे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. विलास अच्युत मोटे, किरकोळ परवानाधारक यांना कोणत्या आधारे खामगांव या रॉकेल विक्रीचा परवाना दिला ? परवाना दिल्यापासून आतापर्यंत कार्डधारकांची  व रॉकेल वाटपधारकाची  नावासह यादी, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यापैकी कोणीही हजर नाहीत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोग कार्यालयाने दिनांक ०५-०६-२००९ रोजी सायंकाळी ०५-३० वाजता श्रीमती मोरे तहसीलदार यांच्यामार्फत दूरध्वनी संदेश देऊनही ते कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे.  त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत देणे हे जन माहिती अधिकारी यांना बंधनकारक होते. मात्र या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही.  तसेच अपिलार्थीच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेऊन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केल्याचे दिसून येत आहे.  अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने आणि ती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना बंधनकारक

असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व त्याव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणशिवाय वंचित ठेवल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी हे या प्रकरणी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांनी विलंब लावला असल्याचे त्यांना मान्य आहे, असा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाची यथायोग्यरित्या नोंद जिल्हाधिकारी, बीड यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. तुकाराम गणपतराव गवारे, मु. खामगांव, पो. रेवकी, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५६५

निर्णय दिनांक १०-०६-२००९

१ श्री. मुनवर अहमद नईम अहमद, : अपिलार्थी
व्दारा, अब्दुल मज्जीद,
४०, एस. टी. कॉलनी जवळ, कटकटगेट, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
अंजुमन ईशात ए तालीम ट्रस्ट, रोशनगेट, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अध्यक्ष / सचिव, अंजुमन ईशात ए तालीम, ट्रस्ट,
रोशनगेट, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी या अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौलाना आझाद हायस्कूल, औरंगाबाद या शाळेच्या परिसरामध्ये अंजुमन

ईशात ए तालीम ट्रस्टतर्फे बांधण्यात येणा-या शळेच्या बांधकामासंदर्भात व ट्रस्टच्या संदर्भात काही माहिती मागितली होती.

तथापि जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे वकील हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, सदर ट्रस्टला नियमितपणे शासनाचे अनुदान प्राप्त होत असते व त्यावर औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिका-याचे नियंत्रण आहे असे आयोगाच्या निदर्शनास आणले.

जन माहिती अधिकारी यांच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की, संबंधित ट्रस्ट हे माहिती अधिकार अधिनियमातील " सार्वजनिक प्राधिकरण " या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये येत नसल्याने त्यांना माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदी लागू नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी आयोगास मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ च्या संदर्भात दिनांक २८-०४-२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे अगत्याचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने खालीलप्रमाणे आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत.

".......It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore,

is not at all covered by the definition of the public authority............. ................ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any information officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे वरील अभिप्राय पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुनवर अहमद नईम अहमद, व्दारा, अब्दुल मज्जीद, ४०, एस. टी. कॉलनी जवळ, कटकटगेट, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, अंजुमन ईशात ए तालीम ट्रस्ट, पी. टी. आर. नं. एफ-३४, व्दारा, सीमा नर्सिंग होम, रोशनगेट, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, अंजुमन ईशात ए तालीम, ट्रस्ट, पी. टी. आर. नं. एफ-३४, व्दारा, सीमा नर्सिंग होम, रोशनगेट, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५६६

निर्णय दिनांक १०-०६-२००९

१ श्री. शेख नईम शेख लाल, : अपिलार्थी

नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली,

जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा आयुक्त, कृषि विभाग, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र

राज्य, साखर संकुल, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा आयुक्त, कृषि विभाग, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र

राज्य, साखर संकुल, पुणे

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि उप संचालक (कर्मचारी कल्याण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

जन अपिलीय अधिकारी : कृषि सह संचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १८-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपुरी असल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

प्रथम अपील केले होते. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणतीही सुनावणी घेतली नाही व अपिलार्थीस माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे त्यांनी हे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०१-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित अधिका-यांच्या नेमणूका व पदोन्नतीच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक २२-११-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या-कडील दिनांक ०७-१२-२००७ रोजीच्या प्रथम पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गोळा करण्याचे काम चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले व माहिती उपलब्ध होताच ती अपिलार्थीस देण्याचे आश्वासित केले आणि नंतर दिनांक १८-१२-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पाठविली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी घेण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी दोन वेळेस तारखा निश्चित केल्या असता या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिले. त्यामुळे अखेरीस जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची दिनांक २८-०१-२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश पारित केले. तथापि या अपिलावरही जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयाची वाट न पाहता अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक १८-१२-२००७ आणि ३१-०१-२००८ रोजी अशा दोन टप्प्यामध्ये त्यांना पुरविल्याचे आयोगास अवगत केले व या संदर्भातील योग्य तो पुरावा आयोगास सादर केला आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली आहे. आज रोजी सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता त्यांना आवश्यक ती संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख नईम शेख लाल, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि उप संचालक (कर्मचारी कल्याण) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कृषि सह संचालक (आस्थापना) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५६७

निर्णय दिनांक १०-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. उत्तम दगडूजी बगाटे,<br>मु. ईंचा पोस्ट भाडेगांव,<br>तालुका जिल्हा हिंगोली | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>हिंगोली | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>हिंगोली | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून दोन वेळेस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये तफावत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे हिंगोली तालुक्यातील ग्रामसेवकांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तालुक्यातील सर्व ग्रामसेवकांच्या नावांची यादी, राहण्याचे व कार्यालयाचे ठिकाण, जे ग्रामसेवक भाड्याच्या घरात राहतात त्यांना देण्यात येणारे घरभाडे व या ग्रामसेवकांच्या राहत्या ठिकाणी व कामाच्या ठिकाणी संडास बांधलेले आहेत किंवा नाही, सर्व ग्रामसेवकांच्या राहत्या ठिकाणाचा पत्ता - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी १७-१२-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तपशीलवार माहिती प्रपत्रामध्ये आठ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तदनंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि ही माहिती व जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झालेली माहिती यामध्ये तफावत असल्याचे आढळून आल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमत: दिनांक २९-१०-२००७ रोजी व नंतर जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर दिनांक २०-१२-२००७ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे एकूण ५६ ग्रामसेवकांची माहिती

दिली. परंतु या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संबंधित ग्रामसेवकांच्या घरी व कार्यालयाच्या ठिकाणी संडास आहेत किंवा कसे या मुद्यावरील माहितीचा यात समावेश नव्हता. मात्र जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपिलाच्या सुनावणीनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २०-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ग्रामसेवकांच्या कार्यालयाच्या जागी संडास असल्याबाबतच्या मुद्यावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे व ही माहिती ५४ ग्रामसेवकांशी संबंधित आहे. ग्रामसेवकांच्या संख्येतील तफावतीबाबत जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने माहिती मागितली त्यावेळी एकूण ५६ ग्रामसेवक त्यांच्याकडे कार्यरत होते. त्यापैकी दोन ग्रामसेवकांची दुस-या पदावर नियुक्ती झाल्याने त्यांनी राजीनामे दिले व याचे अभिप्राय त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या दिलेल्या माहितीमध्ये समाविष्ट केलेले आहेत. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या दोन टप्प्यांवरील माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २०-१२-२००७ रोजी संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सुरुवातीला जरी एका मुद्दयावरील माहिती दिली नसली तरी जन माहिती अधिकारी यांचा याबाबत अपिलार्थीपासून दुष्ट हेतूने माहिती दडविण्याचा असा कोणताही असद्हेतू होता असे आयोगास निःसंशयपणे आढळून येत नाही. मात्र अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दोन वेळेस पुरविलेल्या माहितीमध्ये तफावत असल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दोन वेळा पुरविलेल्या माहितीमध्ये जरी तफावत असली तरी ग्रामसेवकांच्या संख्येच्या संदर्भातील तफावत जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये स्पष्ट केली आहे. या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. मात्र

सुरुवातीस त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एका मुद्दयासंदर्भात माहिती न दिल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण वाटत आहे. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपूर्ण माहिती दिल्याबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उत्तम दगडूजी बगाटे, मु. ईंचा पोस्ट भाडेगांव, तालुका जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५६८

निर्णय दिनांक १०-०६-२००९

१ श्री. जोगदंड गणेश भुजंगराव, : अपिलार्थी
रा. डॉ. पी. डी. देशमुख हॉस्पिटलसमोर, ईतवारा,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा,
तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा,
तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली असता त्यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने व जाणुनबुजून जास्तीचे शुल्क आकारल्याने अपिलार्थी भयभीत झाले व त्यांची दिशाभूल झाली आणि त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी अपिलाच्या सुनावणीसंदर्भात अपिलार्थीस बोलावून

घेतले. परंतु अपिलाची सुनावणी न घेता ते प्रलंबीत ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित धान्य वितरणाबाबत विस्तृत प्रमाणात व १२ वर्षे इतक्या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या रजिस्टर्ड पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १०१८४ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-१२-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या रकमेचा भरणा न केल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाची वाट न पाहता त्यांचे दिनांक २०-१२-२००७ रोजीचे व्दितीय अपील आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयामध्ये न केल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. मात्र अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक ०५-०१-२००८ रोजी त्यांनी संपूर्ण माहिती विनामूल्य हस्तांतरीत केली. या त्यांच्या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०५-०१-२००८ रोजीचे

पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त झाल्याचे व या माहितीबद्दल त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. हे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती विनामूल्य प्राप्त झाली आहे, त्यामुळे विचाराधीन अपील अर्जावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जोगदंड गणेश भुजंगराव, रा. डॉ. पी. डी. देशमुख हॉस्पिटलसमोर, ईतवारा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५६९

निर्णय दिनांक १०-०६-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक,
कृष्ण विद्यालय, सिंदी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळ, सिंदी
संचलित मार्फत कृष्ण विद्यालय, सिंदी, तालुका उमरी,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्याने व माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळ, सिंदी यांच्याकडे दिनांक २८-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीशी कोणताही

पत्रव्यवहार न करता अपिलार्थीचे प्रथम अपील प्रलंबीत ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कृष्ण विद्यालय, सिंदी, तालुका उमरी, यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित काही माहिती मागविली होती. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्व गैरहजर आहेत.

आयोगास अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जाबरोबर त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या अर्जाची झेरॉक्स व यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-१०-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जाची झेरॉक्स सादर केली आहे. या व्यतिरिक्त कोणतेही कागदपत्रे अथवा इतर पुरावा अपिलार्थीने आयोगास सादर केलेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना अनुक्रमे माहितीसाठीचा अर्ज व प्रथम अपील अर्ज कोणत्या माध्यमाव्दारे पाठविले हे आयोगास आवश्यक त्या पुराव्याअभावी कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज व अपील अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे किंवा कसे हे आयोगास आढळून येत नाही. सबब आवश्यक त्या पुराव्याअभावी, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज संबंधित प्राधिकरणास प्राप्त झाला नाही, असे अनुमान काढण्यात येऊन आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कृष्ण विद्यालय, सिंदी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळ, सिंदी संचलित मार्फत कृष्ण विद्यालय, सिंदी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५७०
निर्णय दिनांक ११-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. जगन्नाथ तुकाराम जगदाळे,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत परिपूर्ण माहिती दिली नाही, दिलेली माहिती अपूर्ण व गोलमाल करणारी आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भात त्यांना सुनावणीची पुनश्च् संधी जन अपिलीय अधिकारी यांनी दिली नाही. त्यांना सुनावणीची नोटीस सुनावणीच्या प्रस्तावित तारखेनंतर प्राप्त झाली. या सर्व प्रकरणामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर सेवाशर्तीनुसार कारवाई करावी व कलम २०(१) नुसार दंडात्मक कारवाई करुन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे, अशी त्यांनी या अर्जाच्या अखेरीस आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. सावंगी (हर्सूल) ता. औरंगाबाद येथील ग.नं.१६१ मधील दि. १८.०७.१९९५ व १९.०७.१९९५ रोजी झालेल्या मोजणीच्या, मोजणी नकाशाची सत्यप्रत व इतर मुद्यावर काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये या मुद्याव्यतिरिक्त, त्यांच्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास उद्देशून लिहिलेल्या दि. २०.०१.२००४, २०.०३.२००४, १२.०४.२००४, २०.१२.२००४, २०.०२.२००७ आणि दि.१८. ०८.२००७ च्या या विषयाबाबत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, त्यांनी वेळोवेळी केलेल्या विनंती अर्जांबाबत कार्यालयाने केलेली कार्यवाही, कार्यवाही न केल्यास त्याची कारणे, अपिलार्थीच्या संदर्भिय प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठ कार्यायलातील आलेल्या पत्राच्या व त्या पत्राच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने पाठविलेल्या उत्तराच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या मोजणी नकाशाची प्रत उपलब्ध होत नसल्याने त्यांना ही नक्कल पुरविता येणार नसल्याचे कळविले. अपिलार्थीच्या अर्जातील इतर माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन संबंधित संचिका पाहण्याचे सूचित केले व त्या संचिकेतील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना पुरविण्याचे आश्वासित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०७.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०१.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या, व त्या नकाशाची नक्कल अपिलार्थीस लवकर पुरविण्याचे सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी

यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या वतीने जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मौ. सावंगी (हर्सूल) ता.औरंगाबाद येथील ग.नं.१६१ ची दि. १८.०७.१९९५ व १९.०७.१९९५ रोजी झालेल्या मोजणीच्या नकाशाच्या नकलेची प्रत त्यांच्याकडे मागितली होती. ग.नं. १६१ च्या मोजणीस अंदाजे १२ वर्षाहून अधिक कालावधी झाला असल्याने आणि त्यांच्या कार्यालयाचे स्थलांतर झाले असल्याने अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांना पुरविणे शक्य झाले नाही. या प्रकरणी संबंधितांनी कसोशीने शोध घेऊनही अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध होऊ शकली नाही. या युक्तिवादाबरोबरच त्यांनी आयोगास अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा एका महिन्याच्या आत शोध घेऊन माहिती देण्याचे आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता,या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी तो प्रतिसाद अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारे सकारात्मक असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली असता अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती न देता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात येऊन संचिका पाहण्याचे सूचित केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली असता, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहण्याचे सूचित करण्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीचे कोणतेही समर्थन असू शकत नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे देखील योग्य त्या प्रकारे अवलोकन केले नसल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३१.०१.२००८ रोजी दिलेल्या

निर्णयानंतर अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी कोणकोणते प्रयत्न केले, हे देखील आज रोजीच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांना आयोगास दाखविता आले नाही. एकंदरित या सर्व प्रकारामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अंगिकारलेला एकूणच दृष्टीकोन उदासीन असल्याचे दिसून येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अशाप्रकारे दिलेल्या प्रतिसादाद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस मुद्दा क्र. 'क' मधील "कोणत्या कारणामुळे कारवाई केली नाही," या मुद्याची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, कारण जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारे त्यांच्या कृती अथवा निर्णयाबद्दलचे स्पष्टीकरण अर्जदारास देणे हे मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीने मुद्दा क्र. 'क' मधील मागणी केलेल्या माहितीच्या या भागापुरती माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी विसंगत ठरते. मात्र उर्वरित तीनही मुद्यांवरील माहिती, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही १२ वर्षांपूर्वीची असल्याने त्यांना ती पुरविता आली नाही, हा युक्तिवाद वादाच्या प्रयोजनार्थ जरी मान्य केला तरी, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही प्रयत्न न केल्याचे सत्य शेवटी उरतच आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा जतन करुन ठेवण्याचा कालावधी १० वर्षे इतका आहे. त्यामुळे या प्रकरणी जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नष्ट केल्याचा एखादा पुरावा जन माहिती

अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असला तर तो त्यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. मात्र अशाप्रकारचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर मात्र त्यांना ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास विनंती केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यास आता तीस दिवसांचा कालावधी देण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसांच्या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयात, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचा पुनश्च् शोध घ्यावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. मात्र या कालावधीत अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध न लागल्यास, संबंधित अभिलेख्यांचे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे त्या सर्व संबंधितांवर फौजदारी अथवा तत्सम स्वरुपाची कारवाई करावी, असेही त्यांना या प्रकरणी सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत मुद्देनिहाय व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणी त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ११-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जगन्नाथ तुकाराम जगदाळे, घर नं. एन-११, बी-१६३/२ हडको, टि.व्ही. सेंटरजवळ औरंगाबाद-४३१००३.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५७१
निर्णय दिनांक ११-०६-२००९

१. श्री. सोमनाथ यादवराव कराळे, : अपिलार्थी
रा. गंगापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपजिल्हाधिकारी, वैजापूर,
उपविभाग,वैजापूर,जि.औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, गंगापूर,जि.औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, गंगापूर,
जि.औरंगाबाद.
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद
त्रयस्थ पक्षः श्री. शंकरलाल नावंदर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी विचाराधीन अपील जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना मान्य नसल्याने केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी, तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची आणि जन अपिलीय अधिकारी यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) श्री. साहेबराव पांडुरंग थोरात यांनी अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दि. ०२.०६.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दि. ०२.०६.२००९ रोजी प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस आता त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. तथापि आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दि. ०१.११.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी सरळ प्रतिसाद न देता त्यांच्या दि. १३.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी संबंधित स्वस्त धान्य दुकानदारास परस्पर अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले व त्यांची एक प्रत अपिलार्थीस दिली व नंतर दि. १०.०१.२००८ रोजी म्हणजेच अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस काही माहिती दिली. या माहितीमध्ये देखील काही मुद्यांवरील माहिती संबंधित स्वस्त धान्य दुकानदाराकडून घेण्याचे सूचित केले आहे. यावरुन असे सिध्द होत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्याकडे विहित मुदतीत उपस्थित झाले होते, असे आयोगास स्पष्ट केले. त्यांच्या या विधानामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतूदीनुसार प्रतिसाद न दिल्याचे अधिक स्पष्ट होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व त्याद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरविल्याबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकार यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सोमनाथ यादवराव कराळे,रा. कराळे गल्ली, गंगापूर, जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, गंगापूर,जि.औरंगाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५७२
निर्णय दिनांक ११-०६-२००९

१. श्री. शेषराव शंकरराव सातपुते, क्रांतीनगर, औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारीः तहसीलदार (संगायो)शहर, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद.
त्रयस्थ पक्षः १.सौ. गंगूबाई विश्वनाथ अंभोरे, २.विश्वनाथ सांडुबा अंभोरे

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, श्री. विश्वनाथ सांडुबा अंभोरे व सौ.गंगूबाई विश्वनाथ अंभोरे हे श्रावण बाळ योजनेचे लाभार्थी असताना या योजनेचा लाभ बँकेत का पाठविला नाही, यासंदर्भातील माहिती त्यांना अद्यापही देण्यात आलेली नाही. त्यांनी बी.पी.एल कार्ड देऊन देखील चलन भरल्याशिवाय तुम्हाला माहिती देता येत नाही, असे सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५-२००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्रावणबाळ सेवा योजनेसाठी

अर्ज सादर करणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या, शासनाने मंजूर केलेला निधी व लाभार्थ्यांची यादी - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने या अर्जामध्ये सौ.गंगाबाई विश्वनाथ अंभोरे व श्री. विश्वनाथ सांडुबा अंभोरे यांचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने मंजूर करुनही त्यांच्या कार्यालयाकडून अद्यापपर्यंत काहीही कार्यवाही झालेली दिसत नाही, असे त्यांचे अभिप्राय व्यक्त केले आहेत. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्यास ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी, नसल्यास तसे अपिलार्थीस कळवावे असे आदेश पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०२.२००८ रोजी विनामूल्य माहिती पुरविली, तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या श्री. विश्वनाथ सांडूबा अंभोरे व सौ.गंगूबाई विश्वनाथ अंभोरे या लाभार्थीचा लाभ बँकेत पाठविण्याबाबतच्या मुद्यावर कोणतेही अभिप्राय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या त्रयस्थ पक्षापैकी श्रीमती गंगूबाई विश्वनाथ अंभोरे यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला असून श्री. विश्वनाथ सांडुबा अंभोरे यांचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे व त्यांना वृध्दापकाळ योजना व श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजना

या दोनही योजनेअंतर्गत दि. २५.०१.२००६ पासून ते आजतागायत नियमितपणे अनुदान वाटप केले आहे. या विधानापृष्ठयर्थ त्यांनी लोकविकास नागरी सहकारी बँक,अपनाबाजार,जालना रोड या बँकेकडे पाठविलेल्या व जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहे जानेवारी,२००९ ते मार्च, २००९ या कालावधीच्या वाटप केलेल्या अनुदानाची प्रत आयोगास दाखविली. यावरुन असे दिसून येते की, श्री. विश्वनाथ सांडुबा अंभोरे यांचा सदर बॅन्केतील खाते क्र. १६७२ असून इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत माहे जानेवारी,२००९ ते मार्च,२००९ या कालावधीचे दोन्ही योजनेचे मिळून रु.१७५०/-इतके अनुदान दिले गेले आहे.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला असता, अपिलार्थीच्या अर्जाबाबत आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास वस्तुस्थिती स्पष्ट केली. यावरुन असे आढळून येत आहे की अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जासंदर्भात माहिती देय आहे. सबब जन माहिती अधिकारी यांनी सन २००५ ते दि.१४.११.२००७ पर्यंतच्या कालावधीतील श्री अंभोरे यांना वितरित केलेल्या अनुदानाचा, त्यांच्या मंजूरी आदेशापासून आजपर्यंतचा संपूर्ण तपशील अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावा.

अशाप्रकारे आता जरी अपिलार्थीस उर्वरित माहिती उपलब्ध होत असली तरी या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही, ही बाब दुर्लक्षित करणे योग्य होणार नाही, असे आयोगास वाटते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीद्वारे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (महसूल) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्षासंदर्भात मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेषराव शंकरराव सातपुते,क्रांतीनगर,जिल्हा कोर्टाच्या पाठीमागे,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (संगायो)शहर,जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५७३
निर्णय दिनांक ११-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दादासाहेब कडूबा काळे,<br>रा. वडोदबाजार,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, फुलंब्री,<br>जि.औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद<br>जि.औरंगाबाद | | |

त्रयस्थ पक्षः श्री. बबन जाधव
श्रीमती सुनिताबाई प्रभाकर जाधव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी स्वतःहून कोणतीही माहिती न दिल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०३.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांनी तहसीलदार कार्यालयाकडे केलेल्या तक्रारी अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील मागितला होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. तसेच या अर्जासोबत

अपिलार्थीने त्यांना ज्या तक्रार अर्जासंबंधाने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे, त्या तक्रार अर्जाची सत्यप्रतही जोडली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच त्रयस्थ पक्ष श्री.बबन जाधव यांचे चिरंजीव श्री. प्रभाकर बबन जाधव उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने ज्या वेळी त्यांच्या कार्यालयाकडे माहितीची मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०३.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी तहसीलदार, फुलंब्री यांच्याकडे पूर्वी दि. १४.०६.२००७ रोजी केलेल्या अर्जावर तहसीलदार कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती अपेक्षिली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या तक्रार अर्जाच्या संदर्भात जर तहसीलदार फुलंब्री यांनी काही कार्यवाही केली असेल तर अथवा यासंदर्भात त्यांनी कोणाशीही पत्रव्यवहार

केला असेल तर किंवा यासंदर्भात त्यांच्या या प्रकरणाशी संबधित अभिलेख्यावर काही अभिप्राय व्यक्त केले असतील तर अशा सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस देणे अपेक्षित होते. किंवा जर अपिलार्थीच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली गेली नसेल तर त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या तक्रार अर्जावर कोणतीही कार्यवाही आजपावेतो केली गेली नाही, एवढी साधी माहिती त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी माहितीसाठीचा मूळ अर्ज केल्यापासून तीस दिवसांमध्ये द्यावयास हवी होती. तथापि एवढी साधी बाबही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विचारात न घेता, अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे विनाकार्यवाही तसाच ठेवला. यानंतरही जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०२.२००८ रोजी आदेशित करुनही व तदनंतर अपिलार्थीने दि. ०५.०३.२००८ रोजी तहसीलदार फुलंब्री यांना स्मरणपत्र पाठवून देखील अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची व त्यानंतर पाठविलेल्या दि. ०५.०३.२००८ रोजीच्या स्मरणपत्राची एवढेच नव्हेतर जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २५.०२.२००८ रोजीच्या आदेशावर कार्यवाही करण्याचे साधे सौजन्यही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविले नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशाप्रकारच्या, अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणतेही उत्तर न देऊन व जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावर कोणतीही कार्यवाही न करुन, स्पष्ट केलेल्या कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभाव स्पष्ट केला आहे.  सबब विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. महसूल,आयुक्त,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दादासाहेब कडूबा काळे,रा. वडोदबाजार, ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री,जि.औरंगाबाद.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५७४
निर्णय दिनांक ११-०६-२००९

१. श्री. राजेंद्र कचरु मोटे, : अपिलार्थी
रा. ता.गेवराई जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
गेवराई,जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी,
माजलगाव,जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुनही माहिती मिळाली नाही,उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे अपील केले त्यांनीही त्यावर निर्णय दिला नाही, त्यामुळे त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना देऊन संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०७.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाच्या देवपिंप्री येथील नालाबंडीगच्या कामासंदर्भात दि. ०१.०१.२००५ ते ३०.०६.२००७ या कालावधीमधील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयांतर्गत मौ.देवपिंप्री येथे

झालेले नाला बंडीग व इतर कामावर झालेल्या खर्चाबाबतच्या हिशोबाच्या पावत्या, रो.ह.योच्या मजूरांचे हजेरीपटाच्या छायाप्रती व प्रत्येक कामावर झालेल्या एकूण खर्चाचा सविस्तर तपशील - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०७.११.२००७ रोजी प्राप्त झाला, तथापि विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावरही निर्णय न झाल्याने व परिणामी अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहावे लागल्याने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापही माहिती प्राप्त झाली नाही. त्यांच्या मूळ अर्जावर कोणतेही पत्र पाठविण्याची तसदी त्यांनी घेतली नाही. ते माहिती मागण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार गेले असता व माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला असता, संबंधित लिपीकाने साहेब रागावतील म्हणून कोणतेही लेखी लिहून दिले नाही. तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून माहिती मिळविण्यासाठी त्यांनी वेळोवेळी प्रयत्न केला तथापि तालुका कृषि अधिकारी हे १५-१५ दिवस ऑफीसला येत नसल्याने त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेणे जिकीरीचे झाले व परिणामी कोणतीही माहिती न मिळाल्याने अखेरीस त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य प्राप्त व्हावी व त्यांनी या प्रकरणी केलेल्या विलंबाबद्दल त्यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावावी, अशी विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस आयोगाच्या कोणत्याही प्रश्नास उत्तर देता आले नाही. आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी मुख्यालयी उपस्थित आहेत, परंतु त्यांनी त्यांच्या प्रतिनिधीस आयोगाकडील सुनावणीस हजर राहण्यास सांगितल्याने ते आयोगासमोर हजर राहिले आहेत, असे त्यांनी आयोगास अवगत केले. या उपर त्यांना कोणतीही माहिती नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, आज रोजी सुनावणीस हजर राहण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि ते सुनावणीस का हजर झाले नाहीत, याचे कारण त्यांना ठाऊक नाही. अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी वेळीच निर्णय का घेतला नाही हे जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता ते देखील आयोगाकडे कोणताही खुलासा करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे."एकूण खर्चाचा सविस्तर तपशील" ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. परंतु सविस्तर तपशील म्हणजे नेमक्या कोणत्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस अपेक्षित आहेत, याचा त्यांनी या अर्जामध्ये खुलासा केला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस मुद्दा क्र. ३ मधील कोणतीही माहिती देय असणार नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या दि. ०७.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जास एक वर्षाहून जास्त कालावधी झाल्यानंतरही कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात आपल्या मनातील ईच्छाशक्तीचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती दिली नाही, तरी फारसे काही बिघडत नाही, अशाप्रकारची मानसिकता सार्वजनिक प्राधिकरणाच्या बऱ्याच अधिकाऱ्यांमध्ये वाढीस लागत आहे. अशाप्रकारची भावना मनात ठेवून जनतेचे कोणतेही उत्तरदायित्त्व स्वीकारण्याची जन माहिती अधिकारी यांची मानसिकता नाही, हे सर्व पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न देण्याचे कोणतेही कारण मुळात अस्तित्त्वात असूच शकत नाही, याची आयोगास खात्री आहे. संबंधित जन माहिती अधिकारी आयोगासमोर हजर नाहीत, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी एक संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून प्रदिर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र कचरु मोटे,रा.गेवराई, ता.गेवराई जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (रजिस्टर्ड टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, माजलगाव जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५७५
निर्णय दिनांक ११-०६-२००९

१. श्री. परमेश्वर लक्ष्मणराव निरगुडे, : अपिलार्थी
अहमदपूर,जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय,
गंगाखेड,जि.परभणी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,गंगाखेड,जि.परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,गंगाखेड,जि.परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ०४.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, या अपील अर्जावर त्यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही व जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घालून अपिलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे पिंपळदरी ता.गंगाखेड येथील स.नं.१९८ मधील जमिनीसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.

२४.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये गट क्रमांकाचा उल्लेख केला नसल्याने त्यांच्या कार्यालयात हजर राहून अपिलार्थीस ७/१२ ची पहाणी करण्याचे सूचित केले व अपिलार्थीचा मूळ अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०२.२००८ रोजी त्यांचा प्रथम अपील अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला व तो जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ०७.०२.२००८ रोजी प्राप्त झाल्याचा आवश्यक तो पुरावा (रजिस्टर्ड पोस्टाची पावती) अपिलार्थीने आयोगाकडे सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज तहसीलदार, गंगाखेड यांना प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व त्यातील गुंतागुंत पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला आदेश पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

५) अपील निकाली काढण्यात येत आहे.

६) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०४.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला आदेश पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. परमेश्वर लक्ष्मणराव निरगुडे,द्वारा प्रा. चौकटे पी.पी.,लक्ष्मी टॉकीजच्या बाजूला,भगनूरेच्या घरासमोर,अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,गंगाखेड,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड,जि.परभणी यांना अपिलार्थीच्या दि.०४.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५७६
निर्णय दिनांक ११-०६-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्रीमती हेमलता प्रफुल्ल पारवेकर,<br>परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,<br>परभणी. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक,भूमी अभिलेख,परभणी | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली असून जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे हेतूतः टाळले आहे. तसेच या प्रकरणी त्यांना विहित मुदतीत माहिती न देता, माहिती देण्याप्रित्यर्थ अवाजवी शुल्क आकारले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१८.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे परभणी येथील घर क्र. १५५३ मशीन नं. १६५०६ च्या मोजणीसंदर्भात एकूण ६ मुद्यांवर काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - निमताना परभणी येथील घर क्र.१५५३ मशिन नं. १६५०६ चा दि. २९.०८.२००६ रोजी जायमोक्यावर केलेल्या पंचनाम्याच्या प्रती, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या फेब्रुवारी, २००६ ते ऑगस्ट,

२००६ पर्यंतच्या मासिक दैनंदिनीच्या प्रती, वरील निमताना प्रकरणाबाबत पंचनामा, पथक नेमणूक, अहवाल, निष्कर्ष व टिपणी याच्या प्रती, निमताना मोजणी झाल्यानंतर मोजणी नक्कल संबंधितांनी देण्यासंदर्भातील शासन निर्णय, अपिलार्थीच्या दि. २९.०३.२००७ च्या अर्जावर केलेली कार्यवाही व नगर परिषद परभणीच्या दि. १६.०५.२००६ रोजीच्या पत्रास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने पाठविलेल्या पत्राची व नकलेची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.११.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०१.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर कोणतीही माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी त्यांच्या प्रतिनिधीसह, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि. ०४.१२.२००७ रोजी रु.३०/- इतक्या शुल्काचा त्यांच्याकडे भरणा केल्यानंतर फक्त दोन मुद्यांवर त्यांच्याकडे माहिती दिली. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०१.२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर दि. २१.०२.२००८ रोजी दोन मुद्यांवर

माहिती दिली व उर्वरित दोन मुद्दे, मुद्दा क्र. ५ व ६ शी संबंधित माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी आवश्यक ती माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्या तआलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या दि. १८.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जरी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्या दि. १२.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद सकारात्मक आहे, असे मानता येणार नाही, कारण जन माहिती अधिकारी यांच्या दि. १२.११.२००७ रोजीच्या या पत्राचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी स्वतः अपिलार्थीस माहिती देण्याची कोणतीही तयारी दाखविली आहे, असे या पत्रामध्ये दिसून येत नाही. या नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०४.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सहा मुद्यांपैकी फक्त दोन मुद्यांवरील माहिती दिली व उर्वरित माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २३.०१.२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर २२ दिवसांच्या विलंबाने दिली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ व ६ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो दिलेली नाही. याचाच अर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून शुल्काची आकारणी करुनही त्यांना अपूर्ण माहिती दिल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती आता विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी दि.०४.१२.२००७ रोजी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रु.३०/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत परत करावे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ व ६ शी संबंधित माहिती आज रोजी तयार असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस आजपावेतो न दिलेली ही माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत सोपे व व्याप्ती मर्यादित होती, तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविली आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.१२.२००७ व दि. २१.०२.२००७ रोजी अशा दोन दिवशी म्हणजेच टप्प्याटप्प्याने दिली आहे व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ५ व ६ शी संबंधित माहिती सुनावणीच्या दिवसापर्यंत जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांची या अशाप्रकारची कार्यशैली त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करते. सबब जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

४) अपील मान्य करण्यात येत आहे.

५) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी तसेच याच कालावधीत त्यांच्याकडून स्वीकारलेले शुल्क रु.३०/- इतके त्यांना परत करावे.

६) जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती हेमलता प्रफुल्ल पारवेकर,'प्रफुल्ल' नानलपेठ, बाल विद्या मंदिर,प्राथमिक शाळेजवळ,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, म.रा.पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५७८
निर्णय दिनांक ११-०६-२००९

१. श्री. मालोजी भुजंगराव जाधव, : अपिलार्थी
ता.वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग,जि.प.हिंगोली
२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, हिंगोली

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग
कार्यालय,जि.प.हिंगोली

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग
कार्यालय,जि.प.हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना यथायोग्य माहिती न पुरवून भ्रष्टाचाराची पाठराखण करुन शासनाच्या विकास निधीचा दुरुपयोग करुन, सिंचनाचा अनुशेष दूर करणेकामी संबंधित अधिकाऱ्याकडून कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. याच अर्जामध्ये त्यांनी पुढे असे नमूद केले आहे की, लघुपाटबंधारे विभागांतर्गत सरोज बंधारे निर्मितीत, झालेल्या नियमांचा

दुरुपयोग, आर्थिक निधीचा दुरुपयोग यासंबंधी सविस्तर माहिती तपशीलासह न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केलेआहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१६.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित मौजे चौंडी बहिरोबा तर्फे सेंदुरसेना तालुका वसमत येथे त्यांच्या विभागामार्फत सन २००६-२००७ व २००७-२००८ साली तयार करण्यात आलेल्या बंधाऱ्याच्या संदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि सदर माहिती दिशाभूल करणारी व अर्धवट स्वरुपाची असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये दि. ०७.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.१६.०१.२००८ रोजीच्या पत्रान्वये नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा खुलासा करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्रास अनुसरुन कोणताही खुलासा केला नाही. मात्र त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०३.२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दि. १२.१२.२००७ रोजी दिलेल्या माहितीची प्रत आयोगास दाखविली. या माहितीचे अवलोकन केले असता, सदर माहिती अपिलार्थीने अपेक्षिलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी ल.पा.विभागांतर्गत सरोज बंधारे निर्मितीत झालेल्या नियमांचा दुरुपयोग,आर्थिक निधीचा दुरुपयोग

झाल्याचे नमूद केले आहे. तथापि या मुद्याचा समावेश त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करताना केलेल्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये समाविष्ट नाही.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या मुद्यावर माहिती विचारली, त्या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती विहित मुदतीत पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात आवश्यक तो खुलासा करण्याची जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १६.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथमतः संधी देखील दिली होती. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १६.०१.२००८ रोजीच्या पत्रास कोणतेही उत्तर पाठविले नाही. याचप्रमाणे अपिलार्थीस आज रोजी आयोगाकडील सुनावणीस उपस्थित राहण्यासाठीचे पत्र दि. २७.०५.२००९ रोजी पाठविले असताना देखील अपिलार्थी हे आयोगासमोर सुनावणीस उपस्थित नाहीत, त्यामुळे अपिलार्थीची प्राप्त माहितीने नेमकी कोणती व कशाप्रकारे दिशाभूल होत आहे हे आयोगास स्पष्ट होत नाही. हे पाहता, अपिलार्थीस प्राप्त माहितीवर आता कोणतेही भाष्य करण्याचे शिल्लक नाही, असे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ११-०६-२००९** — **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मालोजी भुजंगराव जाधव,अनुराधा निवास,बँक कॉलनी,वसमत,ता.वसमत, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग कार्यालय,जि.प.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग कार्यालय,जि.प.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५७९
निर्णय दिनांक ११-०६-२००९

१. श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, : अपिलार्थी
ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम
उपविभाग,तुळजापूर,जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम
उपविभाग,तुळजापूर,जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली, त्यांना माहिती दिली नाही व माहितीच्या कायद्याचे उल्लंघन केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने विशिष्ट प्रकारची कोणतीही विनंती आयोगाकडे केली नसल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद यांना उद्देशून दि. २२.०२.२००८ लिहिलेले रोजीचे पत्र आयोगास दाखविले. या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना सन २००४-२००७ या कालावधीतील श्री. हाळसपूरे, शाखा अभियंता यांच्या कार्यक्षेत्रामधील झालेल्या रोहयो व इतर कामासंदर्भात त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झालेआहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊनही अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या दि.०४.०३.२००८ रोजीच्या विचाराधीन अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही आणि माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर कोणते आक्षेप आहेत, हे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीस आता पूर्णतः माहिती मिळाल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला असून, जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी उपस्थित नसल्याने अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

७) अपील क्र.५७९/०८, दि.०४.०३.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ११-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार,मु.पो.निलेगाव,ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग,

तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५८०
निर्णय दिनांक ११-०६-२००९

१. श्री. माधव अर्जुन भोसले, : अपिलार्थी
रा.सरमकुंडी,ता.वाशी, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
गुरुदेवदत्त हायस्कूल, भूम,जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : (१) श्री. पोपट बांगर

(२) सचिव, लोकसेवा शिक्षण प्रसारक मंडळ, भूम, जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.०५.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजतागायत माहिती उपलब्ध झाली नसल्याने व त्यांना प्राप्त झालेली माहिती, अशाप्रकारे अपूर्ण असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीच्या एकूण तीन मुद्यांपैकी, त्रयस्थ पक्ष श्री. पोपट बांगर, सहशिक्षक यांच्याविषयी व स्वत:विषयी एकूण दोन मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती व तिसऱ्या मुद्यावर संस्थेतील दोनही विद्यालयातील कार्यरत प्राथमिक पदवीधर शिक्षकांची सन २००७-२००८ या वर्षातील माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व सदोष असल्याचे आढळल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांच्याकडे दि.०२.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर निश्चितपणे कोणती कार्यवाही केली, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भात त्यांच्याकडील दि. ०५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली. परंतु अपिलार्थीस त्यावेळी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

अपिलार्थीस खालीलप्रमाणे माहिती आवश्यक असल्याचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

"लोकसेवा शिक्षण प्रसारक मंडळ,भूम द्वारा संचलित दोन्ही विद्यालयातील कार्यरत पदवीधर शिक्षकांची यादीची सत्यप्रत मिळावी (शैक्षणिक वर्ष २००७-२००८)."

अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती, अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर प्राप्त झाली किंवा कसे, हे कळण्यास मार्ग नाही, कारण आज रोजी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांना आयोगाच्या कार्यालयातील दि.२५.०५.२००९ रोजीच्या सूचनापत्राद्वारे कळवूनही, सुनावणीस उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांना अद्यापपावेतो न दिलेली, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित वरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माधव अर्जुन भोसले,मु.पो.सरमकुंडी,ता.वाशी, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री गुरुदेवदत्त हायस्कूल,भूम,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५८१
निर्णय दिनांक ११-०६-२००९

१. श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
अर्धापूर, जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,अर्धापूर,
जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. नासेर खान जाफर खान

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, कालावधी पूर्ण होऊनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. नासेर खान,जाफर खान यांच्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"आपल्या अधिपत्त्याखालील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते नासेर खान जाफर खान यांच्या मूळ संचिकेच्या प्रस्तावाची सत्यप्रत मिळणेबाबत."

अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षतः दि. १५.१२.२००७ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती आवश्यक आहे, याचा बोध होत नसल्याचे कळविले व अपिलार्थीस निश्चित कोणत्या संचिकेची सत्यप्रत हवी याचा खुलासा करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०३.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी अनुपस्थित राहिले, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस दि. ०३.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात आपला निर्णय कळविला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, अर्धघाऊक विक्रेते श्री. नासेर खान जाफर खान यांच्याशी संबंधीत सर्व संचिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवण्यात आल्या असून अपिलार्थीस नेमकी ज्या संचिकेतील माहिती आवश्यक आहे, त्याची अपिलार्थीने प्रत्यक्ष पहाणी करावी, म्हणजे त्यानुसार संबंधित संचिकेतील कागदपत्रांच्या सत्यप्रती त्यांना निःशुल्क उपलब्ध करुन देण्यात येतील.जन अपिलीय अधिकारी यांनी हे पत्र अपिलार्थीस पाठविल्यानंतरही अपिलार्थी हे जन माहिती अथवा अपिलीय अधिकारी यांच्याकडे कधीही उपस्थित न होता, त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रातील अपिलार्थीच्या दि. ०७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे

अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही निश्चित स्वरुपाची नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील, "संचिकेच्या प्रस्तावाची सत्यप्रत----" यावरुन कोणासही कधीही कोणताही बोध होऊ शकत नाही. अपिलार्थीस अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. नासेर खान जाफर खान यांच्या कोणत्या प्रस्तावाच्या संचिकेची सत्यप्रत हवी आहे, याचा देखील अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये उल्लेख केला नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचा विषय कोणता, तो देखील अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये नमूद केला नाही. अशा प्रकारची मोघम माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही तरीही अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची योग्य ती संधी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.०४.२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी दिली होती. तथापि त्याही वेळी अपिलार्थी हे गैरहजर राहिले. एवढे असूनही जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भातील सर्व संचिका अपिलार्थीस विनामूल्य तपासणीसाठी उपलब्ध असल्याचे कळविले, तरीही अपिलार्थी तहसीलदार,अर्धापूर यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. आज रोजी आयोगाकडील सुनावणीच्या वेळी देखील अपिलार्थी हे आयोगासमोर अनुपस्थित आहेत, हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. परंतु अपिलार्थीस सर्व संबंधितांनी वेळोवेळी दिलेली पत्रे आणि अपिलार्थीची जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील अपील सुनावणीच्या वेळेची आणि आयोगाकडील अपील सुनावणीच्या वेळेची अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे स्वारस्य नसावे, असे अनुमान काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ११-०६-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

अपील क्रमांक :-५८१/२००८

प्रत,

१. श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे, संपादक प्रवक्ता, पत्रपेटी क्र.५,मुख्य पोस्ट ऑफीस,नांदेड-१

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,अर्धापूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६८३
निर्णय दिनांक ११-०६-२००९

१. श्री.सुरेश गोविंदराव माळी (पुंड), औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे औरंगाबाद जिल्हयातील मा. उध्दवराव पाटील यांच्या पुतळयासंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००१-२००८ असा आहे. अपिलार्थीचा सदर अर्ज जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी कार्यकारीअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे दि. २२.०१.२००८ रोजी हस्तांतरित

केला. तथापि अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी परत जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे दि. ०४.०४.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये प्रथम अपील केले. यावर दि. ०७.०४.२००८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने परत अपिलार्थीचे प्रथम अपील कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांच्याकडे पाठविले.तथापि या अपील अर्जावर निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०६.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना उद्देशून केलेल्या दि.०४.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली गेली नाही, अथवा यासंदर्भात कोणतेही आदेश सक्षम प्राधिकरणाकडून पारित केले गेले नाहीत. या घटनाक्रमाच्या या टप्प्यावर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊन निर्णय पारित होणे, आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दि. ०४.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपले निर्णय पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०४.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.सुरेश गोविंदराव माळी (पुंड),रा. फाजलपूरा,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद अपिलार्थीच्या दि. ०४.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५८२

निर्णय दिनांक १२-०६-२००९

१ सौ. अनुसया पांडुरंग मोने, : अपिलार्थी
रा. अंबाली निवास, समतानगर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आजपर्यंत आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - दिनांक १६-०७-१९८५ ते ३१-०५-१९९० मध्ये ज्या शिक्षकांनी कुटुंब नियोजनचे काम उत्कृष्ट केल्याबद्दल त्यांना देण्यात आलेल्या आगाऊ वेतनश्रेणीसंबंधी शिक्षकांच्या नावासह व प्रत्येक शिक्षकाने किती केसेस केल्या त्यांची नांवे व पदनाम - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना उद्देशून केला होता. तथापि त्यांनी अपिलार्थीचा अर्ज मूळ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक ०४-०१-२००८ रोजी मूळ प्रतीत पाठविला. परंतु सदर अर्ज गट शिक्षणाधिका-यास प्राप्त न झाल्याने (असे गट शिक्षणधिकारी यांचे म्हणणे आहे) अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती संबंधितांकडून प्राप्त होऊ शकली नाही. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी दिनांक १५-०३-२००८ रोजी निर्णय देऊन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना अपिलार्थीस दिनांक २९-०३-२००८ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि या निर्णयानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या हजर आहेत. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचा आयोगासमोर युक्तिवाद केला.

गट शिक्षणाधिकारी यांनी आयोगासमोर त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये त्यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, आगाऊ वेतनवाढी देण्याची प्रक्रिया

ही जिल्हा परिषद स्तरावरुन होत असून गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कार्यालयाकडून आगाऊ वेतनवाढी देण्याबाबत कोणताही प्रस्ताव अथवा शिफारस देण्यात येत नाही. त्यामुळे कोणत्या शिक्षकाने किती केसेस केल्यामुळे त्यांना आगाऊ वेतनवाढी देण्यात आल्या याची संचिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच अपिलार्थी या जिल्हा परिषद हायस्कूल, चेलीपुरा औरंगाबाद या शाळेत कार्यरत होत्या. त्या पंचायत समिती औरंगाबाद आस्थापनेवर कार्यरत नव्हत्या. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मूळातच सदोष असावी असे त्यांना वाटते.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही शिक्षण विभागाशी संबंधित असल्याचे आयोगास अवगत केले. शिक्षकांना आगाऊ वेतनवाढी देण्यासाठीचा निर्णय कोणत्या स्तरावरुन घेतला जातो असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या प्रतिनिधींना विचारले असता, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने ही कार्यवाही गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या स्तरावर केली जात असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने त्यांना ही माहिती जिल्हा परिषदेच्या योग्य त्या अधिका-याकडून प्राप्त होणे हा त्यांचा हक्क आहे. अपिलार्थीने जरी त्यांचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज चुकीच्या प्राधिकरणाकडे केला असला तरी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार गट विकास अधिकारी यांनी हा अर्ज, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाच्या ताब्यात आहे त्यांच्याकडे, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठविणे भाग होते. त्यांनी हा अर्ज गट शिक्षणाधिका-यांकडे पाठविला. तथापि गट शिक्षणाधिका-यांचे म्हणणे असे आहे की, हा अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही. परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून

विनाकारण वंचित राहिले. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी गट विकास अधिका-यास त्यांच्या दिनांक १५-०३-२००८ रोजीच्या आदेशाव्दारे सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नाही. हा सर्व प्रकार पाहता औरंगाबाद जिल्हा परिषदेचा कारभार, माहिती अधिकार अधिनियम २००५ हा दोन वर्षापूर्वी अस्तित्वात येऊनही कशा प्रकारे चालला आहे त्याचे अवलोकन व्हावे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निश्चित कोणाकडे उपलब्ध असेल याची आयोगाने विचारणा केली असता उपस्थित जिल्हा परिषदेच्या कोणत्याही प्रतिनिधीला आयोगास या प्रकरणी स्पष्ट करुन देता आले नाही. मात्र एकंदरीत हे प्रकरण पाहता गट शिक्षणाधिकारी व गट विकास अधिकारी, पंचायत समिती हे दोघेही आपापली जबाबदारी टाळू पाहत आहेत याची आयोगास खात्री झाली आहे. अपिलार्थीस माहिती मिळवून देणे व त्याव्दारे सार्वजनिक प्राधिकरणाच्या कारभारात पारदर्शकता आणणे यासाठी राज्य माहिती आयोगाची स्थापना झाली असल्याने या प्रकरणी अपिलार्थीस माहिती मिळवून देणे हे आयोग प्रथम कर्तव्य समजतो. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत त्यांनी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जर ही माहिती देण्यासंदर्भात आवश्यक ती नस्ती त्यांना आढळून आली नाही तर, या नस्तीची जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-याकडे होती व ही नस्ती ज्या कर्मचा-याच्या हातून गहाळ झाली त्यांच्यावर त्यांनी फौजदारी कारवाई करावी.

या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी गट विकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, हे निःसंशयपणे जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित गट विकास अधिकारी, व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित गट विकास अधिकारी, व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. अनुसया पांडुरंग मोने, रा. अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५८३

निर्णय दिनांक १२-०६-२००९

१ श्री. अभयकुमार बलिराम यादव, : अपिलार्थी
लोकप्रश्न कार्यालय, रहेमानगंज,
रामचंद्र आर्य चौक, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, परतूर,
तालुका परतूर, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २६-१२-२००७ रोजी सुनावणी ठेवली असता त्यावेळी अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-१२-२००७ पर्यंत माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले होते. तथापि यानंतरही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ०१-०४-२००६ ते २२-०६-२००७ पर्यंतच्या कालावधीतील काही माहिती तीन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतला किंवा कसे यासंदर्भात आयोगास कोणतीही कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत, मात्र अपिलार्थीच्या आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-१२-२००७ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले होते, असे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी अपिलार्थीस यासंबंधात कोणताही पत्रव्यवहार केला नाही. किमान आज रोजी सुनावणीच्या दिवशी तरी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे किंवा कसे यासंदर्भात त्यांना आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार नसल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, या प्रकरणाच्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीशी दूरध्वनीवर

आज दिनांक १२-०६-२००९ रोजी चर्चा करुन त्यांना ही माहिती दिनांक १५-०६-२००९ पर्यंत देण्याचे त्यांनी आश्वासीत केले आहे. अपिलार्थीस अद्यापपर्यंत माहिती का दिली नाही याचा खुलासा करतांना त्यांनी असे स्पष्ट केले की, अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी ते शाखा अभियंता या पदावर कार्यरत होते व त्यांच्याकडे उपविभागीय अधिका-याचा अतिरिक्त कार्यभार सोपविला गेला होता. जादा कामाच्या व्यापामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असूनही ती, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीच्या समर्थनार्थ जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जो युक्तिवाद केला आहे, तो आयोगास मूळात मान्य नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व तिची व्याप्ती पाहिली असता ही माहिती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण असावी असे, या माहितीचे स्वरुप व तिची व्याप्ती पाहता, आयोगास आढळून येत नाही. मूळात अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्यासाठी त्यांच्याकडे ३० दिवस इतका कालावधी उपलब्ध होता. परंतु त्यांनी या कालावधीमध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क देखील त्यांना कळविले नाही. एवढेच नव्हे तर आज रोजी सुनावणीपर्यंतच्या कालावधीत म्हणजे अंदाजे पावणे दोन वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही तयार नसल्याचे आयोगास सांगितले आहे व तसेच अपिलार्थीशी बोलणे झाल्याप्रमाणे दोन दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. जी माहिती, जन माहिती अधिकारी अपिलार्थीस पावणेदोन वर्षात देऊ शकले नाहीत ती माहिती ते दोन दिवसात कशी देऊ शकणार याची आयोगास माहिती

नाही. त्यांचे अपिलार्थीशी दूरध्वनीवरुन काय बोलणे झाले याचा तपशील कळण्यास आयोगास मार्ग नाही. या सर्व बाबींचा विचार करता जन माहिती अधिकारी यांच्यावर, त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या बेपर्वाईबद्दल अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे कारवाई करणे जास्त संयुक्तीक राहील, अशी आयोगाची खात्री झाली आहे.

जन माहिती अधिकारी यांना बचावाची पुरेपूर संधी देऊनही ते अपिलार्थीस माहिती न देण्याकरिता त्यांनी लावलेल्या कालावधी संदर्भात कोणतेही समर्थन करु शकले नाहीत. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे कारवाई करणे जास्त संयुक्तीक राहील याची आयोगास खात्री आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी लावलेल्या विलंबाबाबत, विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती त्यांना लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी नियमितपणे शासकीय कोषागारात करतील, असे पहावे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी या शास्तीचा भरणा संबंधित जन माहिती अधिकारी हे नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील याची दक्षता घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अभयकुमार बलिराम यादव, लोकप्रश्न कार्यालय, रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ५८४/२००८, ५८५/२००८ व ५८६/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५८४, ५८५ व ५८६

निर्णय दिनांक १२-०६-२००९

१ श्री. अलताफ अहेमद सानी पिता शेख अमीर, : अपिलार्थी
रा. घर नं. ९-६-१००६, चुनाभट्टी, खुसरोनगर, देगलूर नाका,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड,
तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष अपील क्रमांक ५८४/०८ १ श्री. अब्दुल हमीद अब्दुल नबी,
२ श्रीमती नवाजबी अब्दुल हमीद,
अपील क्रमांक ५८५/०८ १ श्री. शिवलाल शंकरलाल सोनी,
अपील क्रमांक ५८६/०८ १ श्री. आर. एन. ढाणकीकर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०३-२००८ रोजी नोंदविलेली तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-१२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जांव्दारे प्रथम माहिती मागविली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०१-२००८ रोजी प्रथम अपिले केली. या तीनही अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०२-२००८ रोजीच्या पत्रानुसार दिनांक २५.२.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. या सुनावणीस अपिलार्थी हे हजर होते. मात्र जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर राहिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. अब्दुल हमीद अब्दुल नबी, श्रीमती नवाजबी हमीद, श्री. सोनी व धनलक्ष्मी ट्रेडिंग कंपनी प्रोप्रा. आर. एन. ढाणकीकर यांना पुरविण्यात आलेल्या रॉकेलच्या कोटयासंदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षांकडे त्यांच्या दिनांक २९-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मागितली. परंतु याच वेळी विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक ३१-०१-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक ०६-०२-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि त्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही. तदनंतर दिनांक २५-०२-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती परंतु सुनावणी झाली नाही. तदनंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड यांना त्यांच्याकडील दिनांक ३०-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे विचाराधीन तीनही त्रयस्थ पक्षांनी त्यांना समक्ष माहिती दिल्याने व ती माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याने अपिलार्थीचे माहितीसाठीचे अर्ज निकाली काढण्याची विनंती करणारे

पत्र लिहिले. अशा प्रकारे अपिलाथीने या प्रकरणी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी आवश्यक ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याने त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्याची विनंती केली मात्र त्यानंतर सुरुवातीच्या परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितिय अपील केले आहे. अपिलार्थीचे या प्रकरणी अशा प्रकारचे वर्तन केवळ विसंगतच नाही तर ते संशयास्पद देखील असल्याचे आढळून येत आहे.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीचे अशा प्रकारचे विसंगत व संशयास्पद वर्तन आणि आजच्या सुनावणीसाठीची अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता आणि तसेच अपिलार्थीने तीनही अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांकडून त्यांना माहिती मिळाल्याचे तहसीलदार, मुदखेड यांना दिनांक ३०-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कबूल केले असल्याने अपिलार्थीची विचाराधीन तीनही अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ५८४/२००८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ५८५/२००८ फेटाळण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक ५८६/२००८ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अलताफ अहेमद सानी पिता शेख अमीर, रा. घर नं. ९-६-१००६, चुनाभट्टी, खुसरोनगर, देगलूर नाका, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ५८७/२००८ व ५८८/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५८७ व ५८८

निर्णय दिनांक १२-०६-२००९

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. रामरहिमनगर, घर नं. ९-४-१०६१, पो. ईतवारा,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष अपील क्रमांक ५८७/०८
१ श्री. बामणे वसंत माधव अप्पा,
२ श्री. गंगाधर नागनाथ महाजन,
३ श्री. व्यंकटेशन हनमनलु कुंचनवार,
४ श्री. अरुण बापुराव लोकमनवार,
५ श्री. सुरेश देवाजी यमेवार,
६ चेअरमन गोदावरी मनार को.ऑप. डिपार्टमेंट कंझ्युमर स्टोअर्स

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थींची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०३-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली असता विहित मुदतीत त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक ३१-०१-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिले केली. तथापि त्यांच्या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न देऊन व अपिलार्थींची सुनावणी प्रलंबीत ठेवल्या कारणाने त्यांनी ही अपिले आयोगाकडे केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जांव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपील क्रमांक ५८७/०८ शी संबंधित प्रथम अर्जाद्वारे देगलूर तालुक्यातील सहा अर्धघाऊक विक्रेत्यांना करण्यात आलेल्या रॉकेल वाटपाच्या संदर्भात काही माहिती विचारली होती व अपील क्रमांक ५८८/२००८ च्या संदर्भातील प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितल्याचे दिसून येते. या दोनही अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९९५ ते ३०-११-२००७ या आर्थिक वर्षाच्या कालावधीतील माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या दोन वेगवेगळ्या मूळ अर्जास एकाच पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये १,५६,००० इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे त्यांना सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०१-२००८ रोजी प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन

अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्या दिनांक १५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस शुल्क भरण्याचे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-१२-२००७ रोजी कळविल्याचे नमूद करुन अपिलार्थीचे अपिले फेटाळली. यानंतर अपिलार्थीने दिनांक २७-०३-२००८ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष (पाच) हे हजर आहेत.

उपरोक्त दोनही अपिलासंदर्भात अपिलार्थी यांनी त्यांचे दिनांक १२-०६-२००९ रोजीचे लेखी निवेदन आयोगास पाठविले असून त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या दोनही प्रकरणांशी संबधित इत्यंभूत माहिती त्यांना दिनांक ११-०६-२००९ परस्पर प्राप्त झाली आहे तरी सदर प्रकरण निकाली काढण्यात यावीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांना त्रयस्थ पक्षाकडून परस्पर प्राप्त झाली असल्याची कबुली त्यांनी आयोगास दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कळविले आहे. मात्र या शुल्काचा भरणा अपिलार्थीने केला नाही. विस्तृत स्वरुपाची माहिती मागवूनही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा का केला नाही हे आयोगास अवगत करुन देण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेले शुल्क माहितीच्या व्याप्तीशी सकृतदर्शनी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत त्यामुळे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्याचे उत्तरदायित्व अपिलार्थीवर होते. विस्तृत स्वरुपाची

माहिती मागवून माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क देण्याची वेळ आली असता अपिलार्थीने त्या शुल्काचा भरणा केला नाही व आपले उत्तरदायित्व पार पाडले नाही. त्यामुळे आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ५८७/२००८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ५८८/२००८ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, रा. रामरहिमनगर, घर नं. ९-४-१०६१, पो. ईतवारा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ५८९/२००८ व ५९०/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५८९ व ५९०

निर्णय दिनांक १२-०६-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ अपील क्रमांक ५८९/२००८
जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कापसी (गुंफा), तालुका लोहा, जिल्हा नांदेड

२ अपील क्रमांक ५९०/२००८
जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल, कहाळा (खुर्द), तालुका नायगांव, जिल्हा नांदेड

३ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, श्री संत बाळगीर महाराज शिक्षण संस्था, कापसी (गुंफा), मार्फत, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल, कहाळा (खुर्द), तालुका नायगांव, जिल्हा नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी उपरोक्त दोनही प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती मागितली असता विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री संत बाळगीर महाराज शिक्षण संस्था, कापसी (गुंफा) यांच्याकडे नोंदणीकृत टपालाव्दारे अपील अर्ज पाठविले असता संबंधित अपिलीय अधिका-याने त्यांच्या रजिस्ट्रा परत केल्या कारणाने अपिलार्थीने सदरची अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या दोन मूळ अर्जाव्दारे दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे कार्यरत असलेल्या एकूण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची यादी, त्यांचा नेमणूक दिनांक, सर्व कर्मचा-यांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्यासाठी नियमानुसार वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीच्या सत्यप्रती, दिलेल्या जाहिरातीनुसार मुलाखतीस आलेल्या उमेदवारांची यादी इत्यादी तपशीलवार व एकसारखी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री संत बाळगीर महाराज शिक्षण संस्था यांच्याकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी प्रथम अपिले केली. मात्र संबंधित अपिलीय अधिका-याने अपिलार्थीचा अपील अर्ज स्वीकृत न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक ५८९/२००८ शी संबंधित जन माहिती अधिकारी व अपील क्रमांक ५९०/२००८ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

मुख्याध्यापक, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कापसी (गुंफा) यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा कथित दिनांक ३१-१०-२००७ रोजीचा अर्ज त्यांना दिनांक १२-११-२००७ रोजी प्राप्त झाला. या अर्जास त्यांनी दिनांक ३०-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी त्यांना एकूण ४९१ रुपये इतका खर्च आला आहे. त्यांच्या या विधानाप्रीत्यर्थ त्यांनी आयोगास सदर खर्चाचे बील सादर केले आहे.

मुख्याध्यापक, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल, कहाळा (खुर्द) यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा अर्ज त्यांना दिनांक २६-११-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-१२-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी १०० रुपयाच्या वर खर्च लागणार असल्याने ते शुल्क भरुन त्यांनी मुख्याध्यापकास समक्ष भेटून अर्जदाराने माहिती प्राप्त करुन घ्यावी असे त्यांना पत्र लिहिले होते. तथापि अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी कधीही हजर झाले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुख्याध्यापक, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कापसी, तालुका लोहा यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत विनामूल्य माहिती प्राप्त झाली आहे. तथापि ही वस्तुस्थिती असूनही,

अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करतांना त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे असत्य विधान केले आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळून लावण्यात येत आहे. मात्र श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल, कहाळा (खुर्द), तालुका नायगांव शाळेच्या मुख्याध्यापकाने जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी तो चुकीचा आहे. कारण अधिनियमातील कलम ७ (३) (एक) प्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस कळवितांना या शुल्काचा संपूर्ण तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविणे त्यांना अनिवार्य आहे. तथापि संबंधित मुख्याध्यापकाने अपिलार्थीस त्यांनी निश्चित किती शुल्काचा भरणा करावयाचा हे न कळविता फक्त १०० रुपयाच्या वर खर्च अपिलार्थीस माहिती देण्यासाठी येणार असल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांचे हे पत्र मोघम स्वरुपाचे आहे. यामुळे त्यांचे दि. १४.१२.२००७ चे प्रथम प्रतिसादाचे पत्र अवैध सिध्द होत आहे. सबब मुख्याध्यापक, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल, कहाळा (खुर्द), तालुका नायगांव यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने द्यावी लागेल. हे पाहता, मुख्याध्यापक, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल, कहाळा (खुर्द), तालुका नायगांव यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील क्रमांक ५९०/२००८ मान्य करण्यात येऊन व अपील क्रमांक ५८९/२००८ फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ५८९/२००८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ५९०/२००८ मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल, कहाळा (खुर्द), तालुका नायगांव यांनी अपिलार्थीस उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कापसी (गुंफा), तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल, कहाळा (खुर्द), तालुका नायगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री संत बाळगीर महाराज शिक्षण संस्था, मार्फत, श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल कहाळा (खुर्द), तालुका नायगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५९१

निर्णय दिनांक १२-०६-२००९

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, अपिलार्थी

रा. एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन)

उपविभाग, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

जिल्हा परिषद (सिंचन), औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १७-११-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून या प्रकरणी अपिलार्थीने विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ५९१/२००८, दिनांक २०-०८-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, रा. एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन) उपविभाग, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (सिंचन), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ५९२/२००८ व २७२२ /२००७**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/५९२ व २७२२/०७

निर्णय दिनांक १२-०६-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जी. एस. रायबोळे,<br>मुख्य संपादक, साप्ताहिक " धुमाकूळ," किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता (दक्षता पथक),<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | प्रतिवादी |
| | प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | उपजिल्हाधिकारी,<br>रो.ह.यो., नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०२-२००८ व दिनांक २८.१२.२००७ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने कोणत्याही स्वरुपाची विशेष विनंती केली नसून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

**<u>अपील क्रमांक ५९२/२००८</u>**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. विजयराव शिंदे, आमदार, बुलढाणा यांनी तालुका कृषि अधिकारी, किनवट यांच्यामार्फत केल्या गेलेल्या जलसंधारण व इतर विकास कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या तक्रारी संदर्भात सन २००५ ते २००७ या कालावधीतील माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या मुळ अर्जामध्ये - श्री. विजयराव शिंदे, आमदार यांनी केलेल्या तक्रारीवर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत - या मुद्दयावर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०२-२००८ रोजी अपिलार्थीस दिनांक ०५-०२-२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि हा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही, ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरित प्राप्त होणे अपेक्षित आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अखेरीस आयोगास

अशीही विनंती केली की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी कसूर केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न दिल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती न दिल्याचे आयोगासमोर मान्य केले. तसेच आता ही माहिती अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-१०-२००७ रोजीच्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०२-२००८ पर्यंत माहिती देण्याचे दिनांक ०१-०२-२००८ रोजी आदेशित करुनही त्यांनी अपिलार्थीस आजतागायत कोणतीही माहिती दिली नाही. आजच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, श्री. विजयराव शिंदे, आमदार बुलढाणा यांनी केलेल्या तक्रारीसंदर्भात त्यांच्या कार्यालयाने, कृषि विभागाच्या किनवट येथील कार्यालयातून चौकशीची कोणतीही कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने, त्यांनी संदर्भीय तक्रारी संदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने श्री. विजयराव शिंदे, आमदार, बुलढाणा यांच्या तक्रार अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून येत आहे. आमदारांनी केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नव्हती तर संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, श्री. विजयराव शिंदे यांच्या अर्जावर त्यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नाही हे कळविण्यामध्ये कोणतीही अडचण नव्हती. तथापि एवढी साधी माहिती देखील अपिलार्थीस, ती, अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असूनही अपिलाथीस देण्याचे सौजन्य देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दाखविले नाही. आपल्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतून जन माहिती

अधिकारी यांनी  कलम ७ (१) मधील तरतुदीचे पालन केले नसल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे.  त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे  त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.  सबब सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. टाकसाळे, सध्या उपविभागीय अधिकारी, वैजापूर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहेत.

**अपील क्रमांक २७२२/२००७**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणत्याही स्वरुपाची विशेष माहितीची मागणी केली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये ॲडव्होकेट रायबोळे यांच्या दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या कृषि विभागातील भ्रष्टाचारासंदर्भात दिलेल्या निवेदनावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेऊन त्यासंदर्भात निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना अपिलार्थीस दिनांक १०-१२-२००७ पर्यंत माहिती देण्याचे आदेशित केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०६-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी वरील अपील क्रमांक ५९२/२००८ प्रमाणेच या प्रकरणी युक्तिवाद केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी दिनांक ०४-१०-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याच्या ऐवजी कार्यकारी अभियंता (रोहयो) जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. उपस्थित

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेची रचना समजावून घेतली असता उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांची माहिती अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे व कार्यकारी अभियंता (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड हे त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती पुरविण्यासाठी सहाय्य करणारे आहेत, असे आयोगास आढळून आले आहे. या प्रकरणी आयोगास पुढे असेही अवगत करुन देण्यात आले की, अपिलार्थीने ॲडव्होकेट श्री. जी. एस. रायबोळे यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. ॲडव्होकेट श्री. जी. एस. रायबोळे यांच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे, कृषि विभागाच्या संबंधित कार्यालयाने आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन न दिल्याने अद्यापपावेतो कोणीतीही चौकशी करण्यात आलेली नाही. जर अपिलार्थीने माहितीची मागणी करतेवेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नव्हती तर त्यांना अपिलार्थीस तसे कळविण्यास कोणताही प्रत्यवाय नव्हता. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी व संबंधित कार्यकारी अभियंता यांनी अधिनियमातील कलम ७ (८) प्रमाणे साधे उत्तर देखील देण्याची तसदी घेतली नाही. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. टाकसाळे, सध्या उपविभागीय अधिकारी, वैजापूर या पदावर कार्यरत) व कार्यकारी अभियंता (श्री. फुले, सध्या बुलढाणा येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घ काळाकरिता वंचित ठेवल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. या दोनही अधिका-यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सचिव (महसूल) व सचिव (जलसंपदा) यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहेत.

अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत कार्यकारी अभियंता यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-०६-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक " धुमाकूळ, " किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, रो.ह.यो., जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.